म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
. क्र. 9383

श्री सद्गुरुवेनमः

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची
अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ॥ १ ॥
श्री समर्थ

# माझे विचार

लेखक

र्षोत्तम सुत

REFBK-0011488

मत दोन रुपये

अनुक्रम 32307 वि निबंध
क्रमांक 9363 नों. दि. 6.3.

श्री सद्‌गुरुवेनमः

— ० —

आत्मबुद्धि निश्चयाची। तेचि दशा मोक्षश्रीची
अहमात्मा हें कधींचि। विसरों नये ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 99809

# माझे विचार

REFBK-0011488

लेखक

पुरुषोत्तम सुत

प्रकाशक--
**सी. पी. पन्हाळकर**
मु. पो. पंचवटी घ. नं. ४२४२, जि. नासिक

**गणेश चतुर्थी शके १८८३**
दि. १४।९।१९६१
सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

आवृत्ति १ ली
किंमत २ रुपये
ट. खर्च निराळा

मुद्रक--
**नारायण दामोदर चंद्रात्रे**
विज्ञान प्रेस, २२१९, नासिक.

# अर्पण पत्रिका

ज्यांच्या प्रेरक शक्तीनें मी आज हा
ग्रंथ वाचक सुहृदांचे हातीं देत
आहे त्या सद्गुरु
**श्री. माधवनाथ महाराजांचे**
चरणीं हा ग्रंथ
अर्पण करीत
**आहे.**

ॐ शांतिः शांतिः शांतिः !

— नम्र सेवक —
**नाथलहरी तात्या**



श्री सद्गुरु माधवनाथ महाराज

# दोन शब्द

प्रथम ज्ञात असे विवेक जनास प्रणाम करून लिहिण्याचें धाडस करितों. आज वाचकांपुढें "माझे विचार" हा ग्रंथ वाचावयास येणें म्हणजे श्री सद्‌गुरु माधवनाथांचा कृपा-आशिर्वादच होय. खरोखर लेखकाचे ध्यानींमनीं ही गोष्ट नव्हती! फक्त आलेले अनुभविक विचार एके ठिकाणीं ग्रथित असावे हाच विचार १९३९ मध्यें होता. आणि ग्रंथ छापून लेखक हा गाढा विद्वान आहे. अगर मानसन्मान व्हावा हा मुळीं विचार नाहीं व नव्हता. सन १९३९ मध्यें अठरा प्रकरणें लिहून तो प्रारब्धकर्मामुळें बावीस वर्षें तसाच पडून राहिला. लेखकावर अनेक संकटें आलीं दुःखही भोगावें लागलें. नंतर सन १९५९ मध्यें हें कर्मचक्र सुलटें झालेबरोबर आणखी पुढील भाग लिहिण्याचें काम हातीं घेऊन श्रीसमर्थ सद्‌गुरुनाथांना वंदन करून लेखन लिहावयास घेतलें. तें १९५९ पासून तों जानेवारी १९६० अखेरीस लेखणी खाली ठेवली व एकूण प्रकरणें ५० पुरी करून श्री नाथचरणीं सादर केली. अस्तु ग्रंथांतील विचार हे साध्या व्यवहारातले असे आहेत ते गाढ्या विद्वान पंडिताप्रमाणें नाहींत! करितां वाचकांनीं तिरस्कारानें न पहातां त्यांतील हेतु व रस ग्रहण करण्याविषयीं लेखकाची नम्र प्रार्थना आहे.

हा ग्रंथ छापावा म्हणून अनेक सुज्ञात लोकांकडून, शिक्षकांचे कडून तसेंच संस्कारी लोकांचे आग्रहाचे मत झाल्यानें ग्रंथ छापून काढिला आहे.


विज्ञान प्रेसचे चालक चंद्रात्रे बंधु यांनीं आपुलकीनें हा ग्रंथ छापून दिला.

लेखकाची विनंती कीं, हा ग्रंथ विद्यार्थिवर्ग शिक्षकवर्ग तसेंच सांसारिकांना मार्गदर्शक होऊन ईश्वराचे सान्निध्य घडो व जीवनाचे साफल्य होवो, हीच वाचकवर्गास नम्रतेची सूचना करितो.

ॐ तत्सत्

शके १८८३,
भाद्रपद गणेश चतुर्थी,
ता. १४-९-१९६१

आपला
नाथलहरी तात्या



श्री नाथलहरी तात्या

अनुक्रम 32327 दि
क्रमांक ....9363...... नों० दि ...

# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १) | नवें वर्ष | १ |
| २) | निरहंकार वृत्ती | ४ |
| ३) | वेळेचें महत्त्व | १० |
| ४) | ,, ,, भाग २ रा | १४ |
| ५) | मनःशुद्धि | २० |
| ६) | ईश्वराचें सान्निध्य | २७ |
| ७) | श्रद्धा | ३५ |
| ८) | उपासना | ४१ |
| ९) | आपले सहवासी व शेजारी यांचें संबंधीं थोर विचार | ४७ |
| १०) | आपलें कर्तव्यकर्म | ५४ |
| ११) | आचाराचें महत्त्व | ६२ |
| १२) | विचार-सत्यता | ७१ |
| १३) | थट्टेचे हिताहित परिणाम | ७६ |
| १४) | उच्चार-सत्यता | ८० |
| १५) | आपला रत्नहार आर्यतत्त्वें | ८७ |
| १६) | तळमळ असणें | ९२ |
| १७) | पवित्रता | १०४ |
| १८) | नैतिक धैर्य | ११७ |

# शुद्धिपत्र

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २ | प्रयन | प्रयत्न |
| ११ | कतव्य | कर्तव्य |
| ,, | कायकर्त्या | कार्यकर्त्या |
| ,, | दिनचये | दिनचर्ये |
| ,, | प्र माणें | प्रमाणें |
| १२ | कत्येकास | कित्येकांस |
| १३ | वषे | वर्षे |
| ४० | अज्ञश्चाश्रश्वानश्च | अज्ञश्चाश्रद्दधानश्च |
| ८३ | गुंडा | बंडा |
| ९० | हाणार | होणार |
| ९२ | दाखविण्यासा | दाखविण्यासाठीं |
| ९४ | परानें | परीनें |
| १०४ | ज्ञान | ज्ञात |
| ,, | बालता | बोलता |
| ,, | यण | येणें |
| १०७ | कर्त्तये | कर्तव्यें |
| १०९ | र्म | धर्म |
| ,, | पाहिज हो | पाहिजे हो |
| १११ | ब | बरें |
| ११२ | मनशुद्धा | मनशुद्धी |
| ११४ | यांत | त्यांत |

पा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

॥ श्री ॥

# माझे विचार

## प्रकरण १ ले

## नवें वर्ष

ता. ३१ डिसेंबर १९३८

माझ्या विश्वबंधूनो, तुमचे पुढे जे विचार मांडीत आहे, त्याचा विचार करून त्यांतून योग्य अयोग्य वाटल्यास आचरणाचा धडा गिरविण्यास घ्याल, अशी खात्री वाटून ते मी मांडण्याचें धाडस करतो.

नव्या वर्षापासून आपण सर्वांनी उत्साहानें व नियमानें पवित्र आचरण करण्याचा निश्चय करावा. आपल्या ठाम समजुतीप्रमाणें पुढे कसे वागावयाचे, भविष्यकाळीं आपले आचरण कसे ठेवावयाचे हे अगोदर ठरविल्यावाचून नुसत्या जीवित्वाचा, अल्पावधीची व अशाश्वतेची खात्री होऊन न होऊन आपले असे काय मोठे कल्याण होणार? नित्य सुखाचा जेथें अखंड अनुभव घ्यावयास सांपडतो, अशा परलोकींच्या अत्यंत जीवित महत्त्वाचा आपण विचार करीत असतां इहलोकांच्या मायापसाऱ्यांचा आपल्या मनावर एवढा जबरदस्त पगडा बसावा हें खरोखर थोडे विलक्षण नाहीं कां वाटत!

इहलोक सोडून परलोकीं जाण्याची वेळ आली असतां आज ज्या वासनांवर आपली आपण भूक भागवीत असतो, ज्यांचेवर आपले विचार इतके उत्कंठेनें गढून जातात, त्यांना मग स्थळ कोणते? याचा क्षणभर विचार करा! देवाच्या येथील नुसतें निमंत्रण येण्याचा उशीर, कीं, मनुष्य वित्त. द्रव्य, इत्यादि सर्व टाकून एका क्षणांत चालता होतो. पण आपला आत्मा मात्र अविनाशी व अमर असतो. म्हणून आजपर्यंत तुम्ही जो कांही प्रयत्न केला असेल, त्याहीपेक्षां अधिक नेटानें नित्य आणि दिव्य वस्तूसाठी ज्यांचा जडदेहाशीं संबंध न पोहोचतां केवळ आत्म्याशींच संबंध पोहोचतो, अशा अध्यात्मिक वस्तूच्या प्राप्तीसाठीं आचरण करण्याचा तुम्ही आज नव्या वर्षापासून निश्चय करा. ऐहिक गोष्टींचा अभिलाष कमी करून पारमार्थिक गोष्टींचा—तत्त्वांचा अभिलाष अधिक धरण्याचा तुम्ही निश्चय करा. पारमार्थिक गोष्टी म्हटल्या म्हणजे शुचिता, पावित्र्य, सत्य, विकाररहित प्रेम हे दैवी गुण होय. ते तुम्हाला व मला सारखेच दिव्य आहेत. आपल्या या जन्माबरोबर त्यांचा अंत होत नसून ते चिरकाल टिकणारे आहेत. मानवी स्वभावांत अथवा प्रकृतींत दिव्यांश असल्यामुळें हे दैवी गुण मनुष्याला संपादन करण्याजोगे आहेत.

पण त्यांचा योग्य विकास होण्यास मनुष्याला सदाचाराचा मार्ग पत्करला पाहिजे व ईश्वरभक्तीनें वागलेच

पाहिजे देवाशीं अनन्य भक्तीनें राहून संसाराविषयी विरक्त राहिलें पाहिजे. हिंदुस्थानांत व अन्यत्र धर्माचार्य, संन्याशी आणि योगी लोक संसाराचा विसर पाडून ऐहिक मायापाशांतून आपणाला सोडविण्याचा, सौख्य, संपत्ती व समाज यांच्यापासून अलिप्त राहण्याचा जो प्रयत्न करीत आले आहेत, त्याचे तरी कारण हेंच. इहलोकींच स्वर्गातील नित्य सुखाचा अनुभव घ्यावयास सांपडावा, एवढ्यासाठींच त्यांचे विरक्त आचरण असते. जोपर्यंत या जगांत वास करावयाचा आहे, तोपर्यंत परमेश्वरानें आपणांला आपापल्या स्थितीत पहारेकऱ्यासारखे कर्तव्य बजावण्यासाठीं जन्म दिलेला आहे, असें मानून नव्हें तर समजून घेऊन जगांतून आपण विरक्त होतां कामा नये.

संसारांतील आपल्या कर्तव्याचरणाला सामर्थ्य व सतेजता देण्यासाठीं मधून मधून एकांतवास, ध्यान, नि परमेश्वरभक्ति ही अवश्य बाणलीच पाहिजे.

आणि अशा रीतीनें संसारांत राहूनहि परमेश्वराची भक्ति अनन्य हेतूनें आपणांस करतां येईल.

तसेंच क्षणभर आपण ईश्वराजवळ एकटे आहोंत असें वाटेल, जगांत राहून अशा तऱ्हेचें आचरण जर आपण करूं लागलों तर, सर्वसंग परित्याग करणाऱ्या संन्याशाइतकेंच आपण जगाशीं विरक्त राहूं? इतकेंच नाहीं तर संन्याशापेक्षां

इहलोक सोडून परलोकीं जाण्याची वेळ आली असतां आज ज्या वासनांवर आपली आपण भूक भागवीत असतो, ज्यांचेवर आपले विचार इतके उत्कंठेनें गढून जातात, त्यांना मग स्थळ कोणते? याचा क्षणभर विचार करा! देवाच्या येथील नुसतें निमंत्रण येण्याचा उशीर, कीं, मनुष्य वित्त, द्रव्य, इत्यादि सर्व टाकून एका क्षणांत चालता होतो. पण आपला आत्मा मात्र अविनाशी व अमर असतो. म्हणून आजपर्यंत तुम्ही जो कांही प्रयत्न केला असेल, त्याहीपेक्षां अधिक नेटानें नित्य आणि दिव्य वस्तूसाठी ज्यांचा जडदेहाशीं संबंध न पोहोचतां केवळ आत्म्याशींच संबंध पोहोचतो, अशा अध्यात्मिक वस्तूंच्या प्राप्तीसाठीं आचरण करण्याचा तुम्ही आज नव्या वर्षापासून निश्चय करा. ऐहिक गोष्टींचा अभिलाष कमी करून पारमार्थिक गोष्टींचा–तत्वांचा अभिलाष अधिक धरण्याचा तुम्ही निश्चय करा. पारमार्थिक गोष्टी म्हटल्या म्हणजे शुचिता, पावित्र्य, सत्य, विकाररहित प्रेम हे दैवी गुण होय. ते तुम्हाला व मला सारखेच दिव्य आहेत. आपल्या या जन्माबरोबर त्यांचा अंत होत नसून ते चिरकाल टिकणारे आहेत. मानवी स्वभावांत अथवा प्रकृतींत दिव्यांश असल्यामुळें हे दैवी गुण मनुष्याला संपादन करण्याजोगे आहेत.

पण त्यांचा योग्य विकास होण्यास मनुष्याला सदाचाराचा मार्ग पत्करला पाहिजे व ईश्वरभक्तीनें वागलेच

पाहिजे देवाशीं अनन्य भक्तीनें राहून संसाराविषयी विरक्त राहिलें पाहिजे. हिंदुस्थानांत व अन्यत्र धर्माचार्य, संन्याशी आणि योगी लोक संसाराचा विसर पाडून ऐहिक मायापाशांतून आपणाला सोडविण्याचा, सौख्य, संपत्ती व समाज यांच्यापासून अलिप्त राहण्याचा जो प्रयत्न करीत आले आहेत, त्याचे तरी कारण हेंच. इहलोकींच स्वर्गांतील नित्य सुखाचा अनुभव घ्यावयास सांपडावा, एवढ्यासाठींच त्यांचे विरक्त आचरण असते. जोपर्यंत या जगांत वास करावयाचा आहे, तोपर्यंत परमेश्वरानें आपणांला आपापल्या स्थितीत पहारेकऱ्यासारखे कर्तव्य बजावण्यासाठीं जन्म दिलेला आहे, असें मानून नव्हें तर समजून घेऊन जगांतून आपण विरक्त होतां कामा नये.

संसारांतील आपल्या कर्तव्याचरणाला सामर्थ्य व सतेजता देण्यासाठीं मधून मधून एकांतवास, ध्यान, नि परमेश्वरभक्ति ही अवश्य बाणलीच पाहिजे.

आणि अशा रीतीनें संसारांत राहूनहि परमेश्वराची भक्ति अनन्य हेतूनें आपणांस करतां येईल.

तसेंच क्षणभर आपण ईश्वराजवळ एकटे आहोंत असें वाटेल, जगांत राहून अशा तऱ्हेचें आचरण जर आपण करूं लागलों तर, सर्वसंग परित्याग करणाऱ्या संन्याशाइतकेंच आपण जगाशीं विरक्त राहूं? इतकेंच नाहीं तर संन्याशापेक्षां

देखील आपलेकडून अधिक चांगलें कार्य घडून येईल, हें निश्चित समजावें. कारण अशा वैराग्याचे फळ आपल्या संसारांतील कर्तव्यांत अगर बाह्य वर्तनांत स्पष्टपणे उघड दिसतें व त्यामुळें शेजाऱ्यांना आनंद व सुख लाभल्यावांचून रहाणार नाहीं व अशा आचारविरक्तीमुळें आपण ईश्वरभक्त आहोत हें सहज जनतेच्या नजरेस येऊन तुमचे तेज झळकू लागेल व तुमचे हातून सत्कार्यें त्यांच्या नजरेस पडतील.

व जीं सत्कार्यें करण्यास परमेश्वर आपणांस मदत करीत असतो, त्यालाही भूषण वाटेल. असो माझे विचार अल्प मतीनें मांडले असून आचरणांत गोष्टी शक्य तितक्या आणण्याचा प्रयत्न केल्यास ईश्वर यश देईल अशी माझी खात्री आहे. आणि आजचा लेख संपूर्ण करितो.

" ॐ तत्सत् "

## प्रकरण २ रे

# निरहंकार वृत्ती

ता. १जानेवारी १९३९

प्रिय मित्रांनो, मागील विचारांत नव्या वर्षांत काय व कसें आचरण ठेवावें, याबाबत अंशत: कां होईना विचार सुचविले. आतां व्यवहार किंवा परमार्थ घ्या, त्यांत अहंकारी वृत्ती नरजन्मास कशी घातकी होते, याबद्दल विचार करण्याचे योजिलें आहे.

मित्रांनो, जर आपण आपल्यापुरताच विचार करू लागलो तर मात्र या वरील रहाणीनें आपणांस रहातां यावयाचें नाही. कारण आपल्या स्वतःचा विचार मनांत न येऊं देतां, आपल्या वासना, लालसा व विचारतरंग यांना बाजूला करून, त्यांच्यावरती मनोजय मिळवून आपणांला आपलें आचरण ठेविलेंच पाहिजे. परोपकारासाठीं व परमेश्वरासाठीं नि विश्वात्मक वृत्ती रहाण्याकरितांच आपणांस ही वृत्ती धारण करणें जरूरीचे नाहीं कां वाटत ?

या निरहंकार वृत्तीच्या उच्च कर्तव्याविषयींच आज दोन शब्द लिहावे असें मला वाटतें व तेंही तुमच्या कर्तव्याच्या संदर्भानें लिहावे अशी माझी इच्छा आहे. आपल्यासाठीं व आपल्या पुरताच विचार करून राहूं नका. इतरांचाही विचार करा. परमेश्वराला स्मरून त्याच्यासाठींही आपलें आचरण ठेवण्याची दक्षता असावी, नि बाळगावी.

(१) स्वतःसाठीं, आप्पलपोटेपणानें वागूं नका. स्वतःवर आसक्ती ठेवून केवळ स्वार्थैक बाजूनें राहूं नका. स्वतःच्या शरिराचे व त्यांतील इंद्रियांचे नीच व लोभमूलक छंद किंवा कोडकौतुक पुरविण्यासाठीं दिवसचे दिवस घालवूं नका. ढिलाई व आळस धरूं नका. आळसासारखा शत्रू नाहीं. मत्सर, द्वेष, वाईट स्वभाव व त्यासारखे दुष्ट मनोविकार मनांत येऊं देऊं नका. सदोदित हात धुवून पाठीस लागणारे मोहपाश कोणते

असतात हें आपणांस सांगावयास नकोच! त्यांच्या पाशांत कांहीं झालें तरी सांपडावयाचें नाहीं! एवढा मनोजय त्यांचे-वर मिळविण्याचा प्रयत्न क्षणोक्षणीं करीत असावा.

(२) भूतदया व परोपकारानें वागा, दुसऱ्यासाठीं झीज सोसा, ती योग्य प्रसंगी जाणून करण्याची सुबुद्धि असावी. स्वार्थ व परार्थ साधेल असा त्यांत विवेक असावा. लोकांचे हिताकडे लक्ष असून त्यांत अनहित न होईल अशी काळजी घ्या. शाळेंतील इतर बांधवांबाबत कळकळ ठेवून सर्वांशी प्रेमानें, चांगुलपणानें व सौजन्यानें वागा. तेणेंकरून त्यांना संतोष वाटेल, आणि तुम्हांसही सुख लाभेल. लोकांना आनंद वाटेल म्हणून तसें बोलणें किंवा वागणें वागावयाचें नाहीं, तर तें आपलें कर्तव्य म्हणून वरील आचरण ठेवणें जरूर आहे. मन उदार ठेवा नि संकुचितपणा सोडून द्या. निव्वळ डबक्यां-तील बेडकाप्रमाणें आपली वृत्ती धरून राहूं नका. त्यामुळें आपणांस ज्ञान, विश्वात्म प्रेम, परमेश्वराचे व्यापक स्वरुप, तेज वगैरे गोष्टी कळणार नाहींत? लोकांची स्थिति आहे, त्या-पेक्षां अधिक चांगली घडवून आणण्याची खटपट करा. हें पहा. तुमच्या कल्याणाचा मार्ग दाखवून देण्यास शिक्षकवर्ग सदैव तत्पर आहे. करितां त्यांचेविषयीं कळकळ, सौजन्य, आदरयुक्त आचरण ठेवीत जा? आपणांस ज्ञानदान देणारे, तसेंच वडील लोक यांचे गुणाकडे लक्ष देऊन ते अंगी बाणावे

व त्यांचेशी कृतज्ञताबुद्धीनें वागण्याचा निश्चय करून आचरण ठेवावें.

(३) परमेश्वराला स्मरून वागा, तो सर्वत्र विश्वव्यापी आहे, असा त्याचेविषयीं विचार मनांत राहूं द्या ! त्याच्या दृष्टीनें कोणतीहि वस्तू अति मोठीहि नाहीं व लहानहि नाहीं. तुम्ही त्याचेवर श्रद्धा व भार ठेवून वागा. तो तुम्हांस खात्रीनें सहाय्य केल्यावांचून रहाणार नाही. प्रेमळ पिता जसा आपले पुत्रावर प्रेम करतो, तसेंच तोही करील हें पक्कें समजा. विवेकबुद्धीच्या द्वारें जो कोणी बोलत असतो, म्हणजे हें बरें, तें वाईट, हें करावें तें करूं नये असा अंतर्यामांतून जो ध्वनी निघत असतो, तो ईश्वराचाच असतो. ईश्वराचे पवित्र साम्राज्य आपल्या हृदयांत वास करीत आहे, पण त्याचे आदेश ऐकावयाचे म्हणजे बाह्य देखाव्याला जरा क्षणभर बाजूला ठेवलेच पाहिजे व त्याच्या सन्निध थोडा वेळ एकटे बसून पहा म्हणजे सहज समजूं लागेल. हीच सर्वांत श्रेष्ठ निरहंकार वृत्ती होय. अशा आचरणांच्या वृत्तीनें संसाराच्या नगरींत राहून जो परमेश्वराच्या निकट वसत असतो तोच संत नि खरा संन्याशी हे ध्यानीं बाळगावें, ।। संसार साधुनि जेणें परमार्थी झिजविला देह । तोचि नर भला रे भला वदताती वेद ।।

।। नरकरणी करे सो नर का नारायण हो जाय ।।

।। मरावें परी कीर्तिरुपे उरावे ।। इत्यादि उक्तींचा अर्थ

लक्षांत घेऊन देही विदेही स्थिति बागण्याची शिकस्त करावी.

गोष्ट १ ली.

## संन्याशाचा अहंकार

एकदां एक तपस्वी संन्याशी महाराजांनी आपले तपाचे जोरावर–सामर्थ्यावर जलसिद्धी प्राप्त करून घेतली होती. आपले सामर्थ्य इतर सामान्य लोकांचे नजरेस यावें नि आपला मोठेपणा जगांत होऊन लोकांनीं आपले पायांपाशीं यावें. तसेंच लोकांकडून द्रव्यलाभही व्हावा अशा प्रकारची आकांक्षा धरून ते एका मोठ्या शहरीं आले. तेथें एक नदी होती. त्या नदीवर आपले रोजचे नित्य नैमित्तिक पूजाअर्चा जप वगैरे करून आपले बिऱ्हाडी जात असत. हे महाराज एके दिवशीं. आपले अनुयायांसह नदीवर गेले व म्हणाले कीं मीं एक चमत्कार तुम्हांस दाखवितों. त्याप्रमाणे एक नारळ घेऊन तो नदींत फेकला व त्यास सांगितलें "बेटा! नीचे जाव," "उपर आव" "मेरे पास आव" इत्यादि हुकूम करतांच त्या नारळानें तसें करावें. हा प्रकार बरैच दिवस चालू होता. कीर्ति पसरूं लागली. या संन्याशी महाराजास दिवसेंदिवस अहंकार वाढूं लागला. याच शहरांत श्री सद्गुरु समर्थ माधवनाथ महाराज फिरतां फिरतां या गांवी मुक्कामास होते. नाथांचे कानावर इतर लोकांनी संन्याशी महाराजांची कीर्ति

घातली. श्रीनाथ हंसले व म्हणाले आज आपण नदीवर त्यांचे दर्शनास जाऊं! त्याप्रमाणें ते गेले. सर्व प्रकार पाहून श्री नाथांनीं त्याच नारळास म्हटलें "बेटा! नदीके जलसे पांच कदम उपर ठैरना! और फिर मेरे पास आना." ही वाणी ऐक-तांच तो नारळ त्याप्रमाणें करून श्रीनाथांचे जवळ पायापाशीं आला. हा चमत्कार पाहून सर्व लोक चकित झाले. संन्याशी यानें मान खालीं घातलीं व श्रीनाथांचे चरणावर मस्तक ठेवून क्षमा मागून म्हणाला "मला पतिताला पावन करून आत्मलाभाचा, ब्रह्मानंदाचा मार्ग द्यावा. मला माझे कृतीचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे, गेलेले आयुष्य फुकट गेलें, तरी श्रीनाथांनी पदरांत घेवून नरदेहाचे सार्थक्य करून आपले चरणीं ठेवावें." अशा प्रकारें त्यास खरा पश्चात्ताप झालेला पाहून श्रीनाथांनीं आपले बिऱ्हाडीं नेऊन त्यांस आत्मोपदेश देऊन, सत्यमार्गाचे दर्शन करवून पुनित केले. या गोष्टी वाचून वाचकांना जें योग्य दिसेल तें घ्यावें. इतकें नम्र भावानें सांगून हा लहानसा लेख येथें पुरा करुं या.

।। ॐ तत्सत् ।।

卐

## प्रकरण ३ रें

# वेळेचें महत्व

ता. २।१।३९

### भाग १ ला

प्रिय बंधूंनो तुमचे जवळ जोंपावेतों द्रव्यसंचय असतो तोंपावेतों काळ किती गेला त्याची कल्पनाही तुमचे मनावर नसते. आणि तास नी तास रिकामपणांत, टवाळपणांत, कुचेष्टा, निर्देत, वैषयिक गोष्टींत किती तरी वेळा नष्ट होत असते व त्यामुळें आपलें आयुष्य झपाट्यानें क्षीण होत जाऊन तें वय जेव्हां निघून जातें तेव्हां कोठें जागे होतां, अशी स्थिति शेंकडा ऐंशी टक्के तरी आपले देशांत चालू आहे. इतर देशांकडे, सुधारलेल्या साम्राज्यशाहीकडे नजर टाका, म्हणजे आपण किती काळ, शक्ति फुकट घालविली याचें प्रत्यंतर पटेल.

" बैल गेला नी झोपा केला " मग काय अर्थ आहे बरें? बघा. गेलेली संपत्ति उद्योगानें परत मिळवितां येते, विसरलेलें ज्ञान पुनरावृत्तीनें प्राप्त करतां येतें, क्षीण झालेलें शरीर आरोग्य व औषधी योजनेनें दुरुस्त होईल, पण गेलेली वेळा परत मिळणें शक्य आहे कां? याचें उत्तर नाहीं. ती कायम या जन्मांतून गेला ती गेली. फिरून कोणत्याही उपायानें परत फिरणें शक्य नाहीं. तरी मित्रांनो वेळेचें महत्त्व लक्षांत घेऊन राहिलेलें वय उद्योगांत घालवाल तर किती चांगलें होईल?

अनुक्रमांक 32327 दि. 1961
क्रमांक 9363 नों. दि.



आपल्या काळाच्या उपयोगाच्या अत्यंत व नित्य अशा महत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें असतां दररोज अंथरुणावरून उठल्यावर प्रात:काळच्या वेळीं "आजचा दिवस अप्रतिम रीतीनें मला कसा जाईल व कसा घालवितां येईल ?" याबावत ज्याचा त्यानें आपल्या मनाशीं पूर्ण विचार करण्यांत पांच मिनिटें कां होईना वेळ घालवून आपणांस उत्तम असा विचार देखील करतां येत नाहीं, याचें कारण संवय नसणें आणि त्याचा विचार नसून आलस्य हेंच मुख्य कारण आहे.

प्रत्येक क्षण हा मौल्यवान आहे व प्रत्येक क्षणास कर्तव्य हे आहेच! क्षणाला नवीन सुसंधि प्राप्त होत असते. ती दवडली कीं, पुन्हां संधि परत येत नाहीं. याची हजारों उदाहरणें आपल्या व परदेशच्या राष्ट्रांतील कार्यकर्त्या पुरुषांकडे पहा म्हणजे नजरेस येतील व ज्यांनीं वेळेचें महत्त्व जाणलें व दिनचर्येप्र माणें रोजनिशा भरून जगांत दाखले ठेवून पारलौकिकास पोहोंचले.

अशीं उदाहरणे श्री छत्रपति शिवाजी, रामदास स्वामी, मोरया गोसावी, अकबर, श्री एकनाथ, लो. टिळक, गांधी, बॅ. सावरकर, पंडित नेहरू, बेंजामिन फ्रँकलीन, मुसोलिनी, हिटलर इ. मंडळींची उदाहरणें पाहिली, ऐकलीं म्हणजे त्यांच्या एकाकणाची बरोबरी करतां येणार नाहीं. त्यांनीं कुटुंबासाठीं, व्यक्तीसाठीं, राष्ट्रासाठीं, स्वराज्य नी स्वातंत्र्यासाठीं किती

किती साहासी, धाडसी, सततोद्योगी झाले नी केले व आतांही होत आहे, यांकडे लक्ष दिल्यास आपल्या नजरेस काय दिसते व आपण कोणत्या कार्यांत किंती वेळ घालवितों, कालाचा अपव्यय करितों, आणि काय काय सार्थक्य करून ठेवलें हें आपलें मनच तुम्हांस साक्ष दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

तुम्ही आपल्या दिवसांचे भाग पाडा, आणि होईल तितकें करून आधिक नियमितपणा ठेवा. त्याप्रमाणें आचरणासही सुरवात करा. तुम्ही रोजनिशी ठेवा, तींत रोज आपण काय केलें, काय राहिलें याची थोडक्यांत हकिगत लिहून ठेवीत जा व तसें घडलें किंवा नाहीं, याचा विचार करून, वाईट झालें असल्यास पुन्हां तसें होणार नाहीं, याबद्दल ईश्वराजवळ प्रार्थना करा व पुन्हां दोष होणार नाहीं याची काळजी घ्या म्हणजे झालें.

सारांश वाचनास व लिखाणास कोणता तरी वेळ ठरवून त्या प्रमाणें वागत जा? लेखन नी वाचन ही सरकारी असो अथवा खाजगी असो, त्यांस उत्तरें काळजीपूर्वक देत असा. कोणाचेही मोहाला अगर तो माझा म्हणून कसें उत्तर देऊं असें न करतां जे स्पष्ट, सत्य असेल तें अत्यंत प्रेमानें, विनयाने समजूत घालून त्यांना उत्तर द्यावें. नाहीतर स्पष्टोक्ति मध्यें सत्यता जरी असली तरी कित्येकांस ते म्हणणें अगर सांगणें उद्धटपणाचें किंवा अहंकाराचे वाटतां कामा नये. सर्वत्र

अधिकारी, समवयस्क अगर मित्र यांचे प्रकृतिधर्मांप्रमाणें व कमीअधिक ज्ञानमहिमान्वयें त्यांस तसें वाटणें साहजिक असतें. करितां जें बोलावयाचें, लिहावयाचें तें स्थिति, मूर्ती, प्रकृति वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार करून बोलत जा. नाहीं तर करावयाचा होता गणपती नी झाला मारुति आणि मारुतीनें शेपटाचे विक्राळ रूपानें टाकावें जखडून, असें मात्र करुं नका. फसूंही पण नका.

सरते शेवटीं मला असें सांगावेसें वाटतें कीं, सर्व गोष्टी यथाक्रम कराव्यात, तसेंच आपलें घरांतील मांडणीहि क्रमवारच व्यवस्थित असावी. प्रत्येक वस्तू जेथल्या तेथेंच ठेवीत जा व ती व्यवस्थित स्थितींत राखण्याची खबरदारी घ्यावी. ह्या टापटिपीनें आपला वेळ वस्तू सांपडण्यास जास्त न जातां, जेथें आपण हात घालून वस्तू काढूं तेथें ती नेमकीच सांपडली पाहिजे.

जेव्हां आपणांस इहलोक सोडून जाण्याची पाळी येईल तेव्हां आपण आपला वेळ वाया दवडिला नाहीं, आपलें कर्तव्य करण्यांतच आपण आपलें आयुष्य घालविलें असें जर आपणांस वाटेल तर तेवढ्या आठवणीनें आपणांस किती आनंद होईल म्हणून सांगूं. उलट पक्षीं, ज्या संधि आपण हातच्या घालविल्या, जे दिवस आणि जीं वर्षे वृथा जाऊं दिलीं, जेथें लोककल्याणाची किंवा आपल्या कुटुंबाची कामें करितां आली

असती, असे जे प्रसंग स्वार्थैक दृष्टीनेंच आपण साधले, जेव्हां खरोखर ईश्वरभक्ति व त्याचेच कार्य करण्यांत वेळ घालवितां आला असतां तेव्हां जो वेळ आपण आपल्या स्वार्थांत व पापाचरणांत, लोभ नी मोहांत घालविला, त्या सर्व काळाकडे व प्रसंगांकडे जर आपण नजर टाकली तर ते गतकालावलोकन किती दुःखद होईल याचा विचार करा.

आपल्या हांतून घडलेल्या प्रमादांची दुरुस्ती करण्यास मग वेळ मिळत नाहीं व तो विचार फार उशीरानें मनांत येतो. तेव्हां त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. मग आपणास पुढील कवीचे उद्गार खरे वाटूं लागतील व निरंतर खेदच करीत बसाल.

चित्तीं उपजविती खेद । बोलतां लिहितां जे जे शब्द ।।
तयामाजि अत्यंत दुःखप्रद । असें झालें असतें हें ।।

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण ४ थें

# वेळेचें महत्त्व

## भाग २ रा

कांहींही न करी कधीं, परि, सदा बैसे रिकामा घरीं ।।
आयुष्य व्यय जो करी, पशुपरी रात्रंदिनीं भूवरीं ।।
कीर्ति सुंदरी त्याप्रति, वश कधीं होणार नाहींच ती ।।
प्रेमाचा सुकटाक्ष लभ्य न तिचा त्या मंदभाग्याप्रती ।।

प्रिय बंधूंनो ज्यांच्यांत स्वावलंबन आहे, आत्मसंयमनाची ज्यांना संवय आहे, स्वकर्तव्याची ज्यांना चाड आहे, देहाचे सार्थक कशांत आहे, हें जे जाणत आहेत आणि मरणाचे ज्यांना रात्रंदिवस स्मरण आहे, ते आपल्या वेळेचा व्यय कसा करतात, याचा विचार येथें केल्यास तो निकामी ठरेल असें मला वाटत नाही.

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः। असें गीता-वचन आहे. गुण आणि कर्म यांच्या भेदाप्रमाणें मी चार वर्णांची उत्पत्ती केली आहे, असें त्यांत म्हटलें आहे. चार वर्णाचा धर्म म्हणजे साधारणतः आयु:क्रम निरनिराळा सांगितला असून तो ज्या काळांत सांगितला आहे, तेव्हांचा काळ व परिस्थिति सांप्रतच्या काळापेक्षां व स्थितीपेक्षां फारच भिन्न होती. चालू काळांत जातीधर्म, रुपरेखा व आयुष्यक्रम वदल-लेला आहे. एक शूद्र वर्णाखेरीज करून उद्योगधंद्याच्या मानानें बाकी तीनहि वर्ण अगदीं एक झालेले आपण पहात आहोंत ! फार काय परकीयाशीहो मांडीशी मांडी लावून वसल्याखेरीज गत्यंतर नाहीं. पण ज्याअर्थी तीनही वर्णांतील बहुतेक सर्वच लोक व्यवसाय करुं लागले आहेत. व्यवसायाखेरीज कोणाचेंही पाऊल पुढें पडणें शक्य होत नाहीं. त्याअर्थी सर्वच व्यवसाय-बंधू होत चालले आहेत, तेव्हां अशा स्थितींत मुख्य गोष्ट "वर्तनक्रम" तो कोणी कसा करावा हें ढोकळ मानानेंच सांगणें बरें वाटते !

अलिकडे प्रत्येकाचे हातांत, खिशांत घड्याळ सारखें टिक् टिक् आवाज करून कानीं कपाळीं ओरडत असतें, कीं बाबारे! काळ चालला, काळ चालला, जागा हो जागाहो ! याप्रमाणें उद्देश असतां आयुष्याचा सद्व्यय करणें कित्येकांचे हांतून सिद्धीस जात असेल व वर्तनक्रम सुधारत असेल हें परमेश्वर किंवा आपलीच मनोदेवता यांना माहित !

असो, "सकाळीं निजून उठतांनाच मनाला पहिला प्रश्न" आज आपले हांतून कोणता उद्योग व सत्कृत्य होण्यासारखें आहे ?

खालील गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. त्या आपण आचरणांत आणल्यास हिताचें होईल असें मला वाटतें?

१ ) आहार नियमित नी बेताचा असावा

२ ) भाषण हितकर, परिमित व मधूर असावें, परंतु प्रसंगीं कठोर पण ठेवावें.

३ ) ज्या वेळीं जें करावयाचें तें त्याच वेळीं करणें महत्वाचें आहे.

४ ) विनाकारण खर्च न करणें व प्रसंगविशेष करणे भाग पडल्यास शिल्लक ठेवून राखणें.

५ ) वेळेचा दुरुपयोग न करणें.

६ ) विश्वासघात न करतां, मोकळ्या मनानें, बुद्धीनें वागणें.

७) दुसऱ्याचें नुकसान न करणें. झाल्यास, त्याचा फायदा करण्याचें कृत्य असावें.

८) अतिप्रसंग न करणें व दुसऱ्यानें जरी आपलें नुकसान केलें तरी प्रसंगीं तें विसरून जाण्यांत मोठेंपणाच असतो.

९) शरीर, मन, व वस्त्रें स्वच्छ असावींत.

१०) हलक्या गोष्टीनें मनास दुखवूं नये व जी हानी, नुकसान व्हावयाची तिचा वरचेवर खेद करीत बसूं नये.

११) परमेश्वरास नित्य भजणें व त्याची भीति बाळगणें.

१२) एकाकी कोणाशींही वचनबद्ध होत जाऊं नका.

१३) केव्हांही निष्कारण परनिंदेला बळी पडूं नका.

१४) सत्संग सहवासाची कांस धरा.

१५) दिनचर्येंत आपण किंवा आपलें काम उत्तम होय.

१६) सततच दैवावर हवाला न ठेवितां प्रयत्नांत कसूर करूं नका.

१७) कैफी किंवा मादक पदार्थांचें सेवन शरीरास घातक, कुटुंबास घातक, समाजास, ज्ञातीस घातक व त्यामुळें घराचा नाश, राष्ट्रनाश होतो. करितां त्याचे आहारीं जाऊं नका.

१८) सद्वर्तन सर्वांत श्रेष्ठ आहे. त्याचें अवलंबन करावें.

१९) आपलें काम व त्याचें रहस्य आपले जवळच ठेवा.

२०) ऋण काढून सण करणें अत्यंत गैर असून तें पापाचें गृह होतें व मानवप्राणी यांचा सहसा उत्कर्ष होण्यास आड येतेंच.

२१ ) दैवाची अनुकूलता दिसली तरी घाईनें श्रीमंत होण्याची हांव धरूं नका. कारण कालमानाची गति विचित्र आहे.

२२ ) प्राप्तीपेक्षां केव्हांही खर्चाचें मान कमी करीत जावें.

२३ ) तरुणपणांत उद्योग केलाच पाहिजे, उद्योगानेंच तुम्हांस द्रव्यसंचय करतां येईल. तरी विवेक नी उद्योगाची संवय ठेवा.

२४ ) लोभ नी मोह यांकडे मनाचा ओढा असतां कामा नये.

२५ ) "थेंबें थेंबें तळें साचें" याप्रमाणें व्यवहार दक्षतेनें करावा.

२६ ) सदाचार, सत्संग, सत्बुद्धी नी सभ्यपणा हे पुण्यमंदिराचे खांब असून यावर सर्व जीवनकलेची इमारत आहे.

२७ ) बिघडविल्याखेरीज आपलें वर्तन बिघडत नाहीं.

२८ ) दुसऱ्यानें आपणांस उणेपणानें लेखिलें तरी त्यांना आपण आपल्या सद्वर्तनानें व सौजन्यानें लाजवावें.

२९ ) निजतांना दिवसाचे कामाचा विचार करून झोपावें.

३० ) आळसास थारा देऊं नये. आपलेकडून चांगलें काम होत नसल्यास त्याचा विचार करून पुन्हां पुन्हां चांगलेंच करून दाखवीन अशी मनाची तयारी ठेवीत जा. आणि मनाची व बुद्धीची उत्तम कार्य होण्यासंबंधीं संवय लावून घ्या. मोकळा सांपडलेला वेळ सुविचारांत घालवण्याचा अभ्यास ठेवावा.

३१ ) प्रत्येकानें आत्मसंयमी बनण्याची, सुसंगतीची संवय बालपणापासून ठेवावी.

बांधवहो ! चालू काळ नुसत्या बडबडीचा नसून तो कृति करून दाखविणेंचा आहे. आपलें आचरणांत शास्ता नी शिस्त असावी व ती शिस्त आपण आपलें चांगलें होणेंसाठीं लावून घेण्यांत व आपलेंच मन आपला शास्ता ठेवून परमेश्वरास साक्ष ठेवून वागा.

दुसरा आपणांस वळण देईल व तो शासन करील न करील असल्या विचारांनी चालावयाचें नाहीं. जें तुम्हीं कराल तेंच फळास येईल, याचा विचार मनाशीं करीत जाणें हिताचें होणारें आहे.

वेळेचा उपयोग किती किंवा महत्त्व किती याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें. याचा तुमचे आचरणांत उपयोग होत असल्यास जरूर करून घ्यावा. एकाएकीं सर्वच गोष्टी आचरणांत येतील असें नसून त्यापैकीं हळुहळू आचरणांत आणून त्याचें सिंहावलोकन केल्यास खात्रीनें मला वाटतें, आपणां सर्वांचें वर्तनक्रमांत सुधारणा झालीच पाहिजे.

।। ॐ तत्सत् ।।

卐

## प्रकरण ५ वें

# मन:शुद्धि

ता. ३।१।१९३९

यन्मसा ध्यायति तद्वाचा वदति यद्वाचा वदति तत् ।
कर्मणा करोति यत् कर्मणा करोति तदभि संपद्यते ।।

मित्रांनो संसारांत कोणी सुखी तर कोणी दु:खी, कोणी विद्वान तर कोणी मूर्ख, कोणी ज्ञानी तर कोणी अज्ञानी, कोणी श्रीमंत तर कोणी दरिद्री, कोणी निरोगी तर कोणीं रोगी, कोणी दाता तर कोणी भिकारी, इत्यादि द्वंद्वप्रकार कितीतरी आहेत. याचें कारण काय असावें असा प्रश्न पुष्कळांपुढें येत असेल नाहीं कां ?

प्राचीन ऋषींचें अगर अर्वाचीन संत, सत्पुरुष महात्मे यांचें या बाबतींत असें मत आहे कीं, नव्हें तर ठाम सांगणें आहे कीं, संसारी प्राण्यांना ज्या भिन्न अवस्था दिसून येतात, त्यास परमात्मा कारण नाहीं. स्वत: आनंदरुप असून त्यानें या स्वनिर्मित जगताला शांती व सुखाचें धाम बनविलेलें आहे. यामुळें त्यापासून दु:ख कसें उत्पन्न होईल ? ईश्वर हा न्याय-स्वरुप असून सर्व प्राण्यांस समदृष्टीनें पाहातो. त्याचे ठिकाणीं कोणाहीबद्दल राग, द्वेष मत्सर, लोभ, मोह नाहीं. म्हणून तो विनाकारण कोणाला दु:ख किंवा सुख देत नाहीं. तसेंच अनी-तीच्या किंवा अवनतीच्या सागरांत बुडवीत पण नाहीं. तर

ह्या सर्व गोष्टी आमच्या कर्मफलानुसार होतात. मात्र त्या कर्मफलानुसार परिणाम जे जे घडतात, ते तो साक्षीरुपानें पहात असतो. मनुष्यप्राणी ज्याप्रमाणें किंवा ज्या प्रकारचें चांगलें अगर वाईट कर्म करील त्याच प्रकारें त्याला फळ मिळतें. हें सर्वत्र चांगले ओळखूनच आहेत, म्हणून या कामीं परमेश्वरास नांवे ठेवण्यास मुळींच जागा नाहीं. उदाहरणार्थ एकादा मॅजिस्ट्रेट किंवा जज्जसाहेब यांचेपुढें आरोपी उभा असतां अगर दावे आले असता, सरकारनें जे जे नियम व कायदे केले, त्या नियमाप्रमाणें तो आरोपी दोषी, ठरतो तद्वत् या कर्मफलांचा न्याय असतो.

सृष्टी निर्माणकर्त्यानें कांहीं गोष्टींत मनुष्य प्राण्यांस स्वतंत्रता दिली आहे. परमेश्वर क्रूर, अन्यायी, दुष्ट नसल्यामुळें तो ती परत घेत नाहीं. मात्र त्या स्वतंत्रेचा दुरुपयोग करून मनुष्यजीव दुष्कर्मास प्रवृत्त होतो. तदनुसार त्या त्या कर्मांचे परिणाम भोगतो. उदाहरणार्थ शेतकरी आपल्या जमिनींत जीं जीं बीजें पेरतों त्याच जातींचीं फलें त्यास मिळतात असें सर्वांचे अनुभवास आहेना? तसेंच कर्मफलांचा परिणाम चांगला अगर वाईट कां मिळणार नाहीं बरें? म्हणून जगांत उन्नति, अदनती, सुख, दुःख, श्रीमंत, भिकारी, धनको, ऋणको इ. फलें पहाण्यांत हरघडी येत आहेत तीं सर्व कर्मफलेंच होत, हें विसरून जाऊं नका. आणि तीं मिळणारी कर्मफलें

कोणींहि टाळूं शकत नाहीं. मग तो सुष्ट कीं दुष्ट, राजा, रंक, साधू, असाधू, सात्विक, तामसी इ. असलेले जीवात्मे यांस तीं कर्मफलें यथानुक्रमें भोगल्याविना गत्यंतरच नाहीं.

ज्याप्रमाणें अग्नि व पाणी यांचे धर्म पहातां, भाजणें, रक्षा करणे व पाणी हें अग्नीची प्रखरता नष्ट करून शांतता देणें, हें जसें आहे तद्वत्च पापरुपीं अग्नीनें भाजून जाल! व पुण्यसंचयानें शांतता प्राप्त होऊन निरामय व्हाल? याचसाठीं आपला वर्तनक्रम उन्नत अशा प्रकारचा असून त्याचे जोडीला हरघडी मन:शुद्धीच्या नियमांचे पालन करणें इष्टच आहे. आणि तें आपण पाळणें हें कर्तव्य आहे.

आतां मन हें नेहमीं कांहीं तरी चिंतन करीत असतें. तें चिंतन वाणीद्वारें, कर्मद्वारें बाहेर पडून कर्म नाम पावतें. आणि आपणांस भोगावी लागणारीं फळें जीं सुखदु:खें त्याचें कारण बनतें. यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, या जगांत आम्हांस सुख, दु:ख, उन्नति, अवनती, इ. ज्या निरनिराळ्या अवस्था भोगाव्या लागतात, त्या निव्वळ आमच्या स्वनिर्मित कर्मावर आहेत. कर्म चांगलें होणें हें मनाच्या पवित्रपणावर आहे. मनाच्या शुद्धतेचें खरें कारण सत्यसेवन होय. असें मनु महाराज म्हणतात. करितां मन शुद्ध करण्याचें साधनांनींच आपलें सर्वांचें कल्याण होईल.

## – अभंग १ ला –

चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती ।
व्याघ्रही न खाती सर्प तया ।।
विष तें अमृत आघात तें हित ।
अकर्तव्य नीत होय त्यासी ।।
दु:ख तें देईल सर्व सुख फळें ।
होतील शीतळ अग्निज्वाळा ।।
आवडेल जीवा जिवाचिये परी ।
सकळां अंतरीं एक भाव ।।
तुका म्हणे कृपा केली नारायणें ।
जाणिजे तें येणें अनुभव ।।

वरील अभंग श्री तुकाराम महाराजांनी दिलेला असून तो आपले कल्याणाचा नी अनुभवाचा दिलेला आहे व तो आचारद्वारें घाणल्यास कल्याणच होणार नाहीं कां? आचार, विचार, उच्चार ह्या त्रयीची आपणांजवळ वाण असल्यामुळें चित्ताची शुद्धि कशी बरें होणार? मानवप्राण्यांजवळ सौजन्य, प्रेमळपणा, सहशीलता, लीनता, विवेक नी मानवधर्म इ. गुण अंगीं नको काय? ह्या वरील गुणांचा संग्रह असला तर चित्त-शुद्धी लवकर होण्यास मदत कां होणार नाहीं बरें?

## – अभंग २ रा –

चित्त शुद्धि निर्मळ भागिरथी ।

दया क्षमा यमुना सरस्वती ।।
असिपदीं एकत्र जेथें होती ।
स्वानुभव स्थान हे गुप्तस्थिती ।।
सत्बुद्धिचे घातलें शुद्धासन ।
वरी शांती सद्गुरु कृपा पूर्ण ।।
शम दम आंगी विभूति उधळण ।
मुखीं उच्चारीं केशव नारायण ।।
बोध पुत्र जन्मास आला जेव्हां ।
आशा म्हातारी मरोनी गेली तेव्हां ।।
भक्ति बहीण धांवोन आली गांवा ।
आतां संध्या करूं कैचि केव्हां
सर्व कर्मे ती झाली ब्रह्मार्पण ।
ऐसें ऐकतां निवती साधूजन ।।
जन नव्हें अवघाचि जनार्दन ।
एका जनार्दनी लाधली ही खुण ।।

वरील अभंगांत चित्तशुद्धी झाली असतां कशा प्रकारें आपण सहज ईश्वर सान्निध्य प्राप्त करुं शकतो, याची कल्पना आली आहेच ! यापुढें ईश्वराबाबतच्या गोष्टींचा विचार करावयाचा व त्या त्या गोष्टी आचरणांत ठेवावयाच्या नी नंतर स्वानुभवापुढें त्या उच्चारांत आणणें असें प्रत्यही होत गेल्यास किती आनंदांत जाऊन, आपण ईश्वर सान्निध्यांत

राहूं बरें? असो यापुढें त्याचे सान्निध्य कसें लाभवावें या-संबंधीं विचार करुं या!

।। ॐ तत्सत् ।।

## भवव्याप–फटका

टाक टाक या दूर भयंकर भवव्यापाला तूं झटकन् ।
मर्मी समज गा उमज काळ हा मुखांत टाकिन गटकन् ।।
खोटा नाटा करिसी धंदा पोटासाठीं किती जनीं ।
लाज सोडूनी व्याज मिरविसी अहंपणा किती मनीं ।।
नाना परिचे धर्म स्थापिसी वर्म कळेना तुज कांहीं ।
खंडण मंडण करिसी बहुपरी, ज्ञान नसे गा तुज तिळही ।।
सुधारणेचे पिसें लागलें, दिसे धर्म आपला खुळा ।
भक्ष्यांभक्षीं भेद न उरला, उगीच वरवर माळ गळा ।।
वैधव्यसागरीं बुडते अबला, काढूं तिजला वर बघसी ।
भवसागरीं तूच बुडाल्या, कांस कुणाची बा धरिशी ।।
बेटा बेटी आप्त सोयरे, यांचा तुजसीं किती ळळा ।
काका, मामा येई न कामा, फांसा जेव्हां पडेल गळा ।।
हें माझें तें माझें म्हणसी, ओझें वाहसी उगा शिरीं ।
देह गेहही नाहीं तुझें, मोह सोड बा समज धरीं ।।
मुंड मुंडुनी दंड घेतला म्हणूनी तूं कां संन्याशी ।
वेष तुझा क्लेश मूळ गा, मोहत्याग ना जरि करिसी ।।
काम क्रोध मद मोह दंभ मत्सर रिपूंनीं बा तुजला ।

पूर्ण जिकुनि भ्रमीं पाडुनी विसर पाडिला तुझा तुला ।
टाक टाक या दूर भयंकर भवव्यापाला तू झटकन् ।।
नाम मुखानें जपशी परी तो, काम अंतरी तव वसतो ।
स्मरणी हाती धरिली परि, तू तरणी अंतरी गा स्मरतो ।।
क्षणिक पांथिक तरु छायेसी येती जाती चार दिशा ।
पुत्र पौत्र वा बंधू दारा, क्षणिक् पसारा हाही तसा ।।
स्वधर्म भारी कठीण तरी, तो तारी वारी भवापद ।
स्वल्प जरी परधर्म दिसे, गा कल्पवरी तो भयप्रद ।।
स्थावर जंगम जें जें दिसते, जाईल तें तें विलयासी ।
क्षेत्र तरि हे पात्र लयासी, क्षेत्रज्ञचि बा अविनाशी ।।
काष्ट लोष्ट सम कांचन मानी, तुष्ट असावें सदा मनीं ।
उंच नीच हा भेद नसावा. शत्रु मित्र तूं सम जाणीं ।।
सोडी आशा सर्व परिची, तोडी पाश मायेचे ।
चंचल मन तव स्थीर करोनी, सार्थक करि नरजन्माचें ।।
कर्मफलाची आंस जोंवरी, खास तोंवरी नच मुक्ति ।
सुखदु:खाची पर्वा जोंवर, सर्वांठायीं आसक्ति ।।
चित्तशुद्धी तू करी झडकरी, बुद्धी तव बा स्थीर करी ।
ऐहिक सुखाला भुलू नको, मन ब्रह्मस्वरुपीं लीन करी ।।

( १ )

## – आतां काय करुं ? –

आतां काय करुं ? म्हणून करितां कांहो सदा काळजी ।।

ऐसा मंत्र जपाल नित्य तरि तो, ग्रासील कीं काळ जी ।।
सारा आळस झाडुनी, स्वर्मनिचा आनंद चित्तीं धरा ।।
प्रेमें यत्न करा तुम्हांस मग तो, देई प्रभू आसरा ।।

( २ )

ही सारी प्रभुनें तुम्हांस दिधलीं पहाल सृष्टि तरी ।।
समीप अपुल्या विवेक करूनि फेकाल दृष्टी जरी ।।
आहे काय उणें इथें सुमनुजा ऐसेंच वाटे तुम्हां ।।
यत्नें वश्य तुम्हांस होय लटके बोले न जाणा रमा ।।

( ३ )

ठेवा ईश्वर अंतरामधिं सदा, वागा स्वकीयोद्यमीं ।।
यत्नें सर्व मिळेल इच्छित तुम्हां कांही पडेना कमी ।।
ठेवूनी मनि काळजी जपुनिया उद्योग तो चालवा ।।
बुद्धीनें व्यवसाय योग्य हुडका आलस्य तो घालवा ।।

मानवी प्राण्यांत जी स्वतंत्रता दिली, ती बुद्धिदात्री भगवतीच होय. आणि याबरोबर विवेक होय. याच जोडीनें कल्याण होणारें आहे.

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण ६ वें

# ईश्वराचें सान्निध्य

ता. ५।१।३९

तो देव एकच असून सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं गूढ

भरलेला आहे. तो सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा आहे. तो सर्व कर्मे पाहणारा आहे. तो सर्व ठिकाणीं वास्तव्य करीत असतो. तो साक्षी, ज्ञाता, अनन्य व सगुण निर्गुण रूपानीं नटलेला तुम्हांस पहावयास मिळेल, ज्या ज्या रीतीनें तुम्ही त्याजकडे पहाल तशा रूपानें तो तुम्हांस प्राप्त होईल ! असें श्वेताश्वतरोपनिषध ११-६ मंडल मध्यें दिलेलें आहे.

प्रत्यही आपण एकमेकांस भेटतों व आपल्या सभोंवतालच्या हरएक वस्तूविषयीं, त्याचा संबंध असणाऱ्या सर्व पदार्थांविषयीं बोलतो, आणि तें असें बोलतों कीं, जणूं काय तेवढ्याच साऱ्या वस्तूंचा आपल्या जीवनदशेशीं संबंध असतो. पण वास्तविक पहातां सर्वकाल ह्याहूनही अधिक महत्वाच्या अशा इतर वस्तू असतात. त्या वस्तू पारमार्थिक आहेत, इहलोकींच्या नाहींत ! अदृश्य आहेत. परलोकीं आपल्याशीं संबंध घडतो. ज्या जीवाला अंत म्हणून ठाऊक नाहीं त्यांच्याशी त्याचा संबंध पोहोचतों हें यावेळीं लक्षांत असूं द्यावें !

जीवनदशा श्रेयस्कर होणें तरी काय ? याचा विचार नी अर्थ आपापले बुद्धिप्रमाणें समजून येत आहेच ! व ती, स्थिती आपणां सर्वांकरितां एकच आहे. परमेश्वराचे खरोखर आपण आभार मानावयास पाहिजे कीं, आपले परस्पर धर्म किंवा आचार रीति कितीही भिन्न असली तरी सत् व असत् कोणते याच्या अर्थांबाबत आपलें सर्वांचें एकमत आहे. जेव्हां

आपली स्थिती अधिक चांगली व्हावी असें आपण म्हणतो, तेव्हां त्याचा अर्थ असा कीं, तुम्ही काय अथवा मी काय ! हें सर्वांस सारखेंच आहे, आपले मतभेद थोडा वेळ बाजूला ठेवून परमेश्वराचे कृपेनें सर्वांना सामान्यतः एकसारख्याच गोष्टी लागू आहेत त्याचा आपण विचार करूं या !

या जगांत परमेश्वर अगर एक महान् शक्ति आहे एवढी गोष्ट तर आपणां सर्वांस सारखीच मान्य आहे. नव्हें तर अशी खात्री आहे. त्याचे नांव मग कोणी परमेश्वर ठेवो, अगर ईश्वर समजो, किंवा सृष्टींत एक बलवान शक्ति मानो ! पण अखिल चराचर वस्तूंना निर्माण करणारा एक शक्तिमान् पवित्र विधाता आहे व त्याचे साम्राज्य त्रिभुवनावर आहे. एवढेंच नव्हें तर तो विधाता पितृवात्सल्यतेनें पालनही करितो असें पण आपण मानितो. जें जें म्हणून चांगलें, शुद्ध, पवित्र आणि सत्य आहे, त्या सर्वांचे प्रभवस्थान तोच आहे. तो एकटाच पूर्ण असा आहे. आपल्या ठिकाणीं जेवढा चांगुलपणा आहे. त्याचें तो पालन करून अंगिकार करतो व जेवढा वाईटपणा भरला आहे, त्याचा तो प्रतिकारही करितो. हा सामान्य विचार आपलें लक्षांत आला आहेच !

आपणांपैकीं प्रत्येकाचें ठिकाणीं काहीं तरी दिव्यांश हा आहेच अशी आपली समजूत आहे. हा दिव्यांश म्हणजे आपल्या अंतर्भागीं वास करणारी सद्सद्विवेक बुद्धि अथवा

प्रकाश होय. जगांत कोठेंही जा, तेथें ही प्रकाशरूपीं ज्योती वास्तव्यानें आहे. म्हणूनच आपण व जगत् एकमेकांना पहात आहोंत. कर्तव्याच्या मार्गावर उज्वल प्रकाश पाडून त्याच मार्गाचा अवलंब करण्यास प्रत्येक मनुष्यास प्रेरणा करणारा हाच ज्ञानदीप असतो पण आपणांस ठाऊक आहे कीं,

वरील बुद्धीच्या शिवाय मनुष्यमात्राचें ठिकाणीं एक पापी स्वभाव अथवा प्रवृत्ति वास करीत असते, हा स्वभाव मनुष्याला आपल्या वासनानुरूप स्वच्छंदानें वागावयास व क्षणभंगूर जगतांतील अहंकाराला म्हणजे मिथ्या अहमिकेला बळी पडण्यास प्रवृत्त करीत असतो. आणि ह्या ऐहिक लौकिकांचा पाठलाग करण्याच्या भरीस पडल्यामुळें ईश्वराकडे आपलें मन लागेनासें होतें व सद्विवेक बुद्धीचा म्हणजे अंतर्यामांतून निघणाऱ्या देववाणीचा ध्वनी आंतल्या आंत गुदमरून बाहेर पडेनासा होतो. म्हणून मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, होता होईल तों आपली चांगली बुद्धी अगदीं निष्कलंक, तेजस्वी, शुद्ध, दिव्य ठेवण्याचा आपण प्रयत्न केल्यास स्तुत्य नाहीं कां होणार ?

ह्या सर्व गोष्टी विचारांत नी आचरणांत आणल्यास ह्या क्षणभंगुर जगांतील मायापाशामुळें ईश्वरापासून आपण पाठमोरे होणार नाहीं. उलट त्या सान्निध्यांत आपणांस आपला जीवनव्यापार चालवितां येईल ! ईश्वराच्या सान्निध्यानें

नुसती भावना जरी करतां आली तरी तेवढ्यानें आपली पापाचरणाकडे फारशी प्रवृत्ती होणार नाहीं. भावना कां होईना, पण ती जर करतां आली तर त्यांतही आपलें केवढें हित होणार आहे ? हें जरा क्षणभर विचार करा व ह्या सान्निध्याची कल्पना मनांत आणा. ह्याहून अधिक आश्चर्ययुक्त उदात्त असें अन्य कांही असूं शकेल काय ? याचा अर्थ तुमच्या लक्षांत आला काय ? तर नाहीं.

ज्याप्रमाणें पिता आपल्या मुलाला हातीं धरून मार्ग दाखवितो, त्याप्रमाणें, चांगुलपणा, ज्ञान नी सामर्थ्य हीं ज्याच्या ठिकाणीं अमर्यादपणें वास करीत आहेत, असा सर्वश्रेष्ठ ईश्वर आपणांस सहाय्यक होऊन मार्ग दाखविण्यास सदैव तयार असतोच. अनेक संतांचीं उदाहरणें पहा, किंवा पायीं तीर्थयात्रा करणाऱ्या वारकरी भक्तिमान यात्रेकरुंस विचारा म्हणजे अनुभवास येऊन ईश्वर खरोखरच सदैव आपलेसाठीं तयार आहे कीं नाहीं हें समजेल !

जें जें प्रत्येक कर्म आपल्या हांतून, मनानें. कायेनें, वाचेनें, घडतें, त्यात परमेश्वरास वांटेकरी करतां येईल ! तसेंच जो प्रत्येक आचार, विचार, उच्चार होतो, तो त्याच्याकडून होत असतो हें विचारानें ध्यानीं येईल ? वरील म्हणण्यांत माझा इतकाच हेतू आहे कीं, आपल्या यच्चयावत् विचारांत, आचारांत, उच्चारांत आपणांस ईश्वराला आपल्या सान्निध्यांत

ठेवतां येईल. आणि असें झाल्यावर आपण पापापासून अर्थातच दूर, राहूं शकतों. त्याच्या सान्निध्याची ज्या वेळीं विस्मृति होते, त्या वेळींच पापाचरण घडतें. मला सांगण्यास वाईट वाटतें कीं, ही विस्मृति किती वारंवार होत असते, आपण त्या सर्वसाक्षी प्रभूला खरोखरच स्मरत असतो असें तुम्हांस वाटतें काय? ईश्वर अगदीं आपल्या जवळ आहे, तो पाठीशीं उभा आहे, आपलें सर्व भाषण तो ऐकत आहे, एवढी आठवण ठेवून जर आपण आपलें आचरण करीत गेलों तर पापाचरण करण्यास कधींही आपलें धारिष्टच होणार नाहीं. याबाबत तुम्हांस खात्री नाहीं कां वाटत? ईश्वराचें लक्ष्य आपणांवर आहे, ही जागृती मनावर पूर्णपणें ठसली तरी पुरें. तसेंच ही जागृती उत्पन्न झालेवर आपण रागाचा, क्रोधाचा अथवा कठोरपणाचा किंवा अहंकाराचा शब्द तरी मुखावाटे येईल असें मला वाटत नाहीं.

असो त्याचे सान्निध्याची भावना जागृत असल्यावर आपण अपवित्र, अशुद्ध विचारांचा संपर्क होऊं द्याल काय? जरा आपण सृष्टिरचनेकडे लक्ष देऊन विचार केला तर असें आढळून येईल कीं, सर्व वस्तू आमच्याच करतां अत्यंत दयाशील मनानें किंवा योजनेनें योजना करून उत्तम प्रकारें पालन पोषण व्हावें याच हेतूनें सृष्टींतील हरएक वस्तू निर्माण करून ठेविली आहे. करितां त्याचे सान्निध्य असणें प्रत्येकांस

32.369 दि
(३३) ... 93८3 .... नों. दि.

वाटणें साहजिक आहे. आणि असे विचार व त्यावरून आचरण व त्याप्रमाणें उच्चार या गोष्टींचा मेळ जमल्यावर आपणांकडून चुकूनही वाईट गोष्ट होईल. असें मला वाटत नाहीं व तें तुम्हांलाही पटेल.

म्हणून आज आपण हा विचार नीट काळजीपूर्वक लक्षांत ठेवूं या ! तो हा कीं, ईश्वर मला पहातो, ईश्वर माझें पाठीशीं उभा आहे, जो कांहीं आचार माझेंकडून घडतो, तो विचार माझें मनांत येतो व जो उच्चार मुखावाटें बाहेर पडतो, तो सर्व त्याला कळतो. आणि तो सर्वसाक्षी आहे, श्रेष्ठही आहे, नी अत्यंत पवित्र आहे, मलरहित असून पितृवात्सल्यानें व स्नेहभावानें तो मला बघत आहे. तोज वरी अदृश्य आहे, तरी मी देखील त्याच्या अगदीं सन्निध राहीन. आणि माझ्या सर्व, अडचणींच्या प्रसंगीं मी त्याचे सहाय्य मागेन व त्याचे सान्निध्यानें मी समर्थ व सदाचारी होईल. उलट त्याचे मदतीवांचून मला चांगलें असें कांहींच करितां येणार नाहीं. त्याचे विषयीं असा जर तुम्ही विचार करूं लागलांत तर तो आपणां सर्वांना सहाय्य केल्यावांचून खचित राहणार नाहीं. त्यांत मला तिलप्राय संशय वाटत नाहीं.

तर मग ईश्वराचे सान्निध्याचा विचार करण्याचा आपण सर्वच प्रयत्न करुं या ! नव्हें तर प्रत्येकानें केलाच पाहिजे. दररोज सकाळीं निजून उठतांना ईश्वरा तूं माझें अगदीं जवळ

आहेस, असें आपण आपलें मनाशीं म्हणत जावें, तसेंच रात्रीं झोंपतांना त्याचे स्मरण करून नी भार टाकून झोंपत जावें, तसेंच हरएक काम, धंदा उद्योग करतांना त्याची सर्वभूतांतरी दृष्टी आहे असें समजून कामें करण्याची संवय ठेवावी.

अशा विचारांचे संवयीनें ईश्वराचे सान्निध्य आपण अगदीं जवळ केलें असें होईल व आपणांस नेहमीं समाधान, आनंद-लहरी उचंबळून येतील. "शांती" देवी ऊर्फ सिद्धी आपणांस माळ घातल्याविना खचित राहणार नाहीं व त्यामुळें दैवी संपत्ती व सामर्थ्य मिळून पारलौकिकी शोभायमान व्हाल. मित्रहो ! तुम्हांस माझे विचार भारूड वाटतील, हास्यास्पद होतील ! माझेसारख्या आडाण्याचे आचार, विचारानें सांगणें असेच असल्यानें ते अनुग्रहीत होण्याबद्दल परमेश्वराजवळ अनन्य प्रेमानें भीक मागतों कीं, परमेश्वरा जरी तूं आम्हां मानवांना स्वतंत्रता बुद्धीरूपानें देऊनही तुझे सत्तेची चाड वाटत नाहीं तरी तूं होऊन आमचे सर्वांचें हृदयीं वास करून आमचे सान्निध्य तरी घे ! नाहीं तर तुझे तरी दे. असें हट्टानें त्याजपासून आपण मागणी करूं या !

यावर पुष्कळ लिहितां येण्यासारखें असून झालें इतकें सान्निध्याचा भाग पचनीं पडून पुढें केव्हां तरी भूक लागल्यास मिळवण्याचा प्रयत्न करूं !

॥ ॐ तत्सत् ॥

## प्रकरण ७ वें

# :– श्रद्धा :–

ता. ६।१।१९३९

ईश्वराचें सान्निध्य व तो आपल्या पाठीशीं उभा आहे. याभावनेपासून प्राप्त होणारी धन्यता याविषयीं मागील प्रकरणीं विचार केला. खरोखर त्याच्या पवित्र सहवासाचा विचार आपलें मनांत नित्य राहिला तर आपलेकडून वाईट गोष्टी होणार नाहींत व अन्य कोणत्याही मार्गानें होणें शक्य नाहीं, इतका आपल्या भूतदयेचा नी मागील प्रकरणांतील आचार विचारांचा उत्कर्ष त्यामुळें होईल !

आणखी एक महत्वाचें असून त्याचा सत्सद्विवेक बुद्धिशी अगदीं निकट संबंध आहे. तो आपल्या इच्छाशक्तिचा "विचार" हा होय. आपली इच्छा स्वतंत्र आहे किंवा नाहीं ? चांगले कार्याची निवड आपणांस करतां येते काय ? अथवा अंधळ्या-सारखे आपण नुसते दैवालाच बळी पडत आहों, प्रत्येकजण जें कार्य करीत असतो तें तो त्याची निवड करून करीत असतो, अथवा त्याला तें केल्यावांचून गत्यंतरच नसतें, म्हणून विश्वांतील कार्य कारणांचा स्वाभाविक नियमानुरुप तें तो करीत असतो ! परमेश्वर नाहीं, सदाचार बुद्धी नाहीं, इच्छा नाहीं, व प्रत्येक गोष्ट केवळ कार्यकारणनियमान्वयें घडत आहे असें जर आपण म्हणूं लागलों, तर नैतिक जबाबदारी अथवा नीतिदृष्टया

अपराध म्हणून म्हणावयास असें कांहींच असूं शकत नाहीं. जर अमुक एकादें कार्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें असेल तर तें केलेंच पाहिजे. मग तें सत् किंवा असत् या प्रश्नाचा तेथें शेवट निकाल लागतो व तो प्रश्नच उरत नाहीं. आपण मग मनुष्य संज्ञेस मुळींच पात्र होणार नाहीं. उलट दैवाच्या हातांतील बेजबाबदार दोऱ्यांनीं वाटेल तशा ओढल्या जाणाऱ्या केवळ बाहुल्याच ठरुं!

जगांतील व्यवहारज्ञानसंपन्न माणसेंही म्हणतात कीं आपण दैवाच्या बाहुल्या नव्हें. आणि त्यांनीं प्रत्येक ठिकाणीं लोकांना त्यांच्या कर्माबाबतच जबाबदार धरून स्वेच्छाचारी म्हणूनच दोषी ठरविलें आहे. आणि आपल्या इच्छाशक्ति स्वतंत्र आहेत, व त्या एकट्या सत्विचार बुद्धिनेंच बद्ध आहेत अशा तऱ्हेनें बद्ध असूनही त्या अत्यंत स्वतंत्र आहेत, पण जर आपल्या इच्छाशक्ति स्वतंत्र आहेत, तर त्या नीतिदृष्ट्या स्वतंत्र असल्यामुळें त्यांच्या सामर्थ्याचा संस्कार सभोंवतालच्या पदार्थावर घडत असतो. तो घडतो हें आपणांस ठाऊकही आहे ! तर सर्वश्रेष्ठ अशी एक नैतिक इच्छाशक्ति आहे व आपली इच्छाशक्ति तिचाच अंश आहे. कारण जेथें एखादे गोष्टीच्या सिद्धीपुढें बुद्धी कुंठित होते, जी गोष्ट आपणांस सिद्ध करतां येत नाहीं, तेथें ती मान्य केल्यावांचून गत्यंतर नसते. लोक तिला आदिकारण म्हणोत, अथवा वाटेल तीं नांवे देवोत, पण आपण तिचे ठिकाणीं आदरबुद्धि ठेवून तिला ईश्वर संज्ञा देऊं ? कारण तीच

अखिल पदार्थमात्रांचें नियमन करीत आहे व तें आपण मान्यही करालच !

जर इच्छाशक्ति नसेल, नीति नसेल, अथवा अनीतिही नसेल तर ही एक अनर्थपरंपरा होणार नाहीं काय ? कशाचा कांहीं ताळमेळ राहणार नाहीं व सर्वच असंगती होईल. आपण कार्यकारणनियमावर व आश्चर्यचकित करणाऱ्या स्वाभाविक सृष्टिक्रमावर विश्वास ठेवूं, पण तो विश्वास आपण असा ठेवूं कीं, तें सर्व ईश्वराचेच कार्य आहे, तोच त्यांचे केंद्रस्थान व प्रभवस्थान आहे. ती सर्व त्याचीच किरणें किंवा प्रतिबिंबें आहेत.

तो ईश्वर जरी आपल्या चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं व त्याचें अस्तित्व आपणांस सिद्ध करून दाखवितां येत नाहीं. तरी त्याचे विषयीं असणाऱ्या विश्वासाला आपण श्रद्धा असें म्हणतो. खऱ्या श्रद्धेनें नुसत्या विश्वासाचाच बोध होतो असें नव्हें तर त्याच्या पासून स्वभावतः उदय पावणाऱ्या आचाराचाही बोध होत असतो. त्याचेवर आपली श्रद्धा असेल तर त्यानुरुप आपले-कडून आचरणही घडेल, त्याला, हृदयांत बाळगून त्याची सेवा करण्यास आपणांस आनंद वाटेल. अशी श्रद्धा तुमचे मनाचे ठिकाणीं आहे काय ? आपण सर्वजण म्हणतो कीं, आमची पूर्ण श्रद्धा आहे, परंतु तसें आचरण घडतें काय ? आपली श्रद्धा सखेद, उदासीन, दुर्बल नाहीं काय ? आपल्या आयुष्यांतील

चांगल्या गोष्टी ईश्वराच्या चांगुलपणाच्या व कृपेच्या देणग्या असें न मानतां त्या आपल्या स्वतःचे प्रयत्नाचे फळ आहे, असें आपण नाहीं कां मानीत ? मला तर असेंच वाटतें कीं, बहुतेकांचा वरील प्रमाणेंच अनुभव आहे. जेथें ईश्वरावर आपली श्रद्धा आहे मानतों, तेथें खरोखर ईश्वरावांचूनच आपण आपली प्राणयात्रा चालवीत असतो काय ? आपण श्रद्धेनें वागत नसून मूढ दृष्टिनेंच वागत असतो, हेंही सत्य वाटेलच.

श्रद्धाचि करितसे हित, धर्माचे जेवि माय तनयाचे ।।
जप, तप, मख, गुरुपुजा मुख्या श्रद्धाचि आय तनयांचे ।।

मोरोपंतांच्या आर्या कविता व त्यांचे ठिकाणीं श्रद्धा ठेवून त्यांच्या पुण्यतिथ्या करितों, त्या तरी कां करितो ? तर त्यांचे आचार विचार उच्चार व त्यांचे ठायीं निस्सीम प्रेम नी श्रद्धा हें कारण होय. त्यांचे लोकोत्तर गुणामुळेंच तुम्ही जयंत्या करतांना ? मग आपण सर्वश्रेष्ठ ईश्वराचे ठिकाणीं जेवढी श्रद्धा ठेवतो तेवढी सामान्य व्यवहारांत ठेवतां येईल व असें वारंवार आपण करीत आहोंतच, कधींही न पाहिलेल्या गोष्टीवर नित्य विश्वास ठेवितों व त्यास धरून आचरण करितो. कांही गोष्टींचें प्रत्यक्ष अनुभवन घेतां विश्वसनीय प्रमाणावरून त्या स्वतः खऱ्या असें मानतोच! उ. नकाशे, इतिहास, पुराणें याचे ठायीं विश्वास श्रद्धेचे बोल घेऊनच आचरणांत आणतो कीं नाहीं ?

जसें ह्या त्यांच्या अस्तित्वाबाबत तुमचे हृदयांतून पूर्ण-

पणें ठसा उमटून राहतो, तसेंच ईश्वराविषयीं अधिकाधिक विचार कराल, मनन कराल, तितका त्याचेविषयीं ज्ञानसंग्रह अधिक प्राप्त होईल. ह्या अस्तित्वाचा परिणाम आपल्या प्रत्यहींच्या आचार, विचार, नी उच्चारावर झाल्याखेरीज केव्हांही राहणार नाहीं, अशी मला खात्री आहे.

इतर गोष्टींप्रमाणेंच श्रद्धाही अभ्यासानें बळावते. आणि जितका अधिक आपण त्याचेंविषयीं विचार करूं तितकी श्रद्धा बलवत्तर होत जाते. असा विचार करण्याची खरोखर लालसा असेल, तर ती संवय करावी. पण खेदाची गोष्ट ही कीं, आपल्या वासना अदृश्य वस्तूंवरून निघून दृश्यवस्तूंवर ईश्वराचा विचार सोडून संसृतिच्या, संस्काराच्या विचाराकडे इतक्या स्वाभाविकपणें धांव घेतात कीं, विशिष्ट साधनांचा आश्रय घेतल्यावांचून आपले प्रयत्न बहुतेक निष्फळच होतात.

अशा प्रकारच्या साधनांपैकींच एक साधन म्हणजे औपचारिक कर्मउपासना होय. ह्या कर्मउपासनेंमुळें आपली भावना जागृत होते व उच्चार पारमार्थिक कर्म करण्याला हीच भावना आपणां सर्वांस प्रवृत्त करिते व ईश्वरसन्निध मनुष्य प्राणी राहूं शकतो! असो खालील गीतावचनाकडे लक्ष पुरविल्यास आणखी संशय दूर होईल अशी खात्री आहे.

नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृति जैर्गुणैः ।।

अर्थ:- कोणीहि एक क्षणभर देखील कर्मावांचून कधींच राहूं शकत नाहीं. प्रकृतीच्या गुणांनीं सर्व प्राणी परतंत्र असल्या-मुळें ( ते गुण ) त्यांच्याकडून कर्म करवितात.

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।।
ज्ञानं लब्ध्वा परां शांती मचिरेणाधि गच्छति ।। गी. ४–३९.

श्रद्धावान व जितेंद्रिय नी ज्ञानाची उत्कंठा असलेल्या पुरुषास हें ज्ञान प्राप्त झालेवर लवकर त्याला पूर्ण शांती म्हणजे समाधान प्राप्त होतें.

गीतेमध्यें श्रद्धेचें वर्णन, महात्म्य वर्णिलें आहे.

अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति ।।
नायं लोकोस्ति न परो न सुखं संशयात्मनः ।।

आपण अज्ञानी असून जो श्रद्धा ठेवण्यास तयार नसतो त्या संशयी पुरुषाचा नाश होतो. त्याला इहलोक साधत नसून परलोकही लाभत नाहीं. म्हणून ज्ञानप्राप्ती होण्यास श्रद्धा ही अवश्य आहे. जोपर्यंत मनाचा संशय, विकल्प जात नाहीं तों-पावेतों शास्त्रें व गुरु यांचेवर विश्वास, भरवसा, ठेवण्याची अत्यंत गरज असते, नी विश्वास ठेवणें भाग आहे. श्रद्धेशिवाय ज्ञान होत नाहीं. एकाद्या शास्त्राचा अभ्यास करुं लागलों असतां आरंभीं कांहीं गोष्टींचे यथार्थ ज्ञान होत नाहीं, त्या गोष्टी जरी मनाला समजल्या किंवा पटल्या नाहींत, तरी त्या खऱ्या आहेत असें मानून पुढील अभ्यास करावाच लागतो. आणि हर-

घडीला आपलें वर्तनही असते. अशा वेळीं अभ्यासकाच्या मनांत श्रद्धा असावी लागते, ती नसेल तर आरंभींच त्याच्या मनाची गति कुंठित होऊन त्याचे अज्ञान जसेंच्या तसेंच राहील. यासाठीं वेदवचनें, श्रीसद्‌गुरुउपदेश, नी श्री भगवान श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला केलेला गीतोपदेश यांजवर भाव, भावना, विश्वास नी भरवसा ठेवूनच वाढविली पाहिजे. श्रद्धाबलानेंच सर्व काहीं प्राप्त होते, हा सिद्धांत नी धादांत अनुभव आल्यावांचून रहात नाहीं.

ईश्वरी सान्निध्य व त्याचे ठिकाणीं विश्वास, श्रद्धा असणें किती उपयुक्त आहे, ह्याचा विचार आपलें सर्वांचें लक्षांत आला आहेच !

परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्‌गुरुचे भजन ।।
सद्‌गुरु भजनें समाधान । अकस्मात बाणें ।।

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण ८ वें

# — उपासना —

ता. १०।१।३९

मागील प्रकरणांत श्रद्धेविषयीं जें अल्पमतीनें सुचविलें तें असें:- ज्या अदृश्य वस्तूंचा आपणांस प्रत्यक्ष अनुभव येत नाहीं त्यांच्या अस्तित्वाबाबत जी खात्री असते किंवा वाटते, तिलाच आपण श्रद्धा असें म्हणतो. आपण रोजच्या व्यवहारांत याच श्रद्धेनें आचरण करीत असतो उदाहरणार्थ इंग्लड, आफ्रिका

जर्मनी, रशिया इत्यादि न पहातां पाहिलेले देश आहेत, ही गोष्ट आपणांस निःसंशय वाटते. पृथ्वी वाटोळी आहे याची पण खात्री झाली आहे. या गोष्टी जरी आपणांस प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध करून दाखवितां आल्या नाहींत, तरी त्यांचें ठिकाणीं आपला विश्वास अगर श्रद्धा असते कीं नाहीं? कारण विश्वास ठेवण्यास आपल्याजवळ सबळ पुरावा व कारणें आहेत, म्हणूनच अदृश्य परमेश्वरावर नी त्याचे बलवत्तर शक्तीवर आपण विश्वास, भरवसा ठेवून श्रद्धा बाळगितो.

ईश्वरावरील श्रद्धेच्या मागोमाग उपासना येते. उपासनेचा अर्थ म्हणजे मला असा वाटतो कीं, ईश्वराशीं अत्यंत श्रद्धायुक्त भावानें प्रेमाचे सलगीचे भाषण करणें होय. त्याचे ठिकाणीं खरोखर प्रेम असेल तर त्यामुळें नित्य त्याचा सल्ला घेणें, सहायता मागणें, वरप्रसाद घेणें, कृपादृष्टीची मार्गप्रतीक्षा करण्याचा आपणांस श्रेष्ठ हक्क आहे असें खात्रीनेंच वाटलें पाहिजे. अशा संगतीचा लाभ होणें म्हणजे इहलोकींच पारलौकिकाचा आस्वाद घेण्यास सांपडणें असें मला माझें बुद्धीला वाटतें !

ईश्वरसान्निध्याच्या अनुभवाविषयीं मागें जें सांगितलें त्याच्याशीं आतांच्या गोष्टीचा फार जवळचा संबंध आहे. कारण त्याचे सान्निध्याची उत्कट भावना असणें म्हणजेच त्याची उपासना करणें होय. ईश्वरविषयक अभ्यासानें अध्यात्मिक उन्नती आपणांस करून घेतां येईल.

आपल्या प्रत्यही आचरणांत अशा तऱ्हेनें ईश्वराचें नित्य स्मरण करणें याचेंच नांव खरी उपासना होय. इतर उपासनेचे कितीही मार्ग असले तरी नित्याची स्मरणी व ध्यास ही केव्हांही इतर उपासनेपेक्षां ( कर्मापेक्षां ) सर्वांना अत्यंत सोपी असून ईश्वरी तेज अधिक उज्वल करून घेतां येतें.

ईश्वराच्या पवित्र नामाचा उच्चार वारंवार करून आपण म्हणत असतो कीं, परमेश्वराला ठाऊक, तो जाणें, परमेश्वर करो नी कल्याण होवो. त्याचे कृपेनें झालें, नी गेलें, असेंच म्हणत असतो श्रीसंतांचें सांगणें असते कीं, परमात्मा अगदीं तुमचे जवळ आहे, तो पहा. अशा अनेक गोष्टी करीत असतां व असें असूनही ईश्वराचा नामोच्चार करीत असतांही त्याचे विषयीं विचारपूर्ण दृष्टीनें आपण पहात सुद्धां नाहीं. ही गोष्ट किती लांच्छनास्पद आहे बरें ?

ईश्वरसान्निध्याला आपल्या दृष्टीआड करणाऱ्या अनेक आठवणी करून देणारी स्पष्ट चिन्हें आपल्या वारंवार नजरेस पडत असतात. आणि असें असूनही जणूं काय ह्या महाघडामोडींचा आपल्या मनावर कांहींच संस्कार घडत नाहीं. अशा तऱ्हेनें आपण आपला जीवनयात्रेचा मार्ग आक्रमित असतो, तथापि हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, ह्या घडामोडी म्हणजेच ईश्वराचे संदेश होत व त्या संदेशानें आपणांस त्याचे आधीन होण्यास निमंत्रण देत असतो.

भक्ति युक्त वागणुकीनें रहाणें म्हणजे ईश्वरी इच्छेवर हवाला ठेऊन अत्यंत नम्रपणानें जीवनयात्रा चालविणें होय. काहींही भोगणें प्राप्त होवो, ती ईश्वरी इच्छा होय. आपलें सुख दुःख त्याचे स्वाधीन आहे, असें मानणें व त्याचे सर्वांभूती प्रेम आहे व तो आपला माता पिता नी सखा आहे. ही भावना सदैव जागृत ठेवून आपले प्रारब्धकर्मानें आपली जीवनयात्रा चालवून कर्तव्यकर्मांत नी प्रयत्नांत केव्हांही कसूर करूं नका ! ईश्वरानें बुद्धिसांठा आपणांस दिलेला आहेच, त्याचा विचारानें उपयोग करून राजमार्गानें जाण्याचीच शिकस्त करावी, आणि ईश्वराचे सान्निध्य माझें प्रत्येक कार्यांत आहेच ह्या भावनेनें भरून उरावें !

आपलें गऱ्हाणें, रहस्यें, आशा, भीति इत्यादी गोष्टी मन मोकळें करून परमेश्वरा जवळ सांगत जा. त्यांत त्याचे इच्छेप्रमाणें तो आपणांस मार्ग दाखवीन व त्यामुळें तुम्ही उन्नत स्थितींचा स्वानंद भोगाल अशी माझी खात्री आहे.

ज्यांत आपले निश्चयानें फलप्राप्ती होईल अशी उपासना कोणत्या बाबतींत करावी बरें ? तर ती पवित्र, दिव्य व ईश्वरतुल्य अशा प्रत्येक गोष्टींत आपणांस खात्रीनें उपासना करता येईल! ह्या ऐहिक, गोष्टी नव्हेंत ! त्या द्रव्याच्या, भूमीच्या, मानाच्या, लौकीक कीर्तीच्या नाहींत ! पुरुष असो, स्त्री असो, अथवा मूल असो ! प्रत्येकाचें ठिकाणीं चांगुल-

पणाचा जो अर्थ समजतो, त्याच्याच संबंधीं सर्व गोष्टी होत. ज्या गुणांनीं मनुष्यास चांगुलपणा मिळतो व मरणोत्तर देवाधीन व्हावयाचें ह्या आपल्या आशेला अनुरुप श्रेष्ठतम व पवित्रतम देवाच्या चरणांजवळ राहण्यास अंगीं योग्यता येतें, त्याच्यासंबंधीं ह्या सर्व गोष्टी आहेत हें विसरून चालणें शक्य नाहीं.

ईश्वरच सर्व गुणांचे केंद्रस्थान असून शुचिता नी पावित्र्य सत्य, सौजन्य, शालीनता, बंधुप्रेम, विश्वप्रेम, स्वार्थत्याग ह्यासारखेच अनन्य गुण हे परमेश्वराच्या देणग्या होत. आणि ह्या देणग्या त्याचे जवळ मागणी केली असतां तो दयाशील भगवान केव्हांही नाहीं म्हणणार नाहीं अशी खात्री ठेवा.

ईश्वराच्या सान्निध्यावर विश्वास, श्रद्धा यापासून स्वाभाविक स्फुरण पावले तें लिहिलें. त्या स्फुरण उद्भवणाऱ्या गोष्टींतच उपासना निर्माण होत असते, अशी समज आहे. नीति ही ईश्वरावांचून अगदीं मिणमिणीत अंधूक प्रकाशाप्रमाणेंच आहे.

परमेश्वराच्या पवित्र तेजाच्या सामर्थ्याचे बलावर उच्चतर व उदात्त अशी कार्यें इतिहासांत पुराण ग्रंथांत ग्रथित करून ठेविलीं आहेत.

वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार केल्यावर आपण ईश्वरसन्निध राहूं लागलों म्हणजे त्याचे सृष्टीसंबंधीं अनेक

चमत्कारांची जाणीव होऊन त्याचे सामर्थ्याची व विश्वघटनेची रचना लक्षांत येईल व त्यामुळें श्रद्धा अधिक बलवान झाल्यानें सर्वांघटीं ईश्वर अंशत: रुपानें विश्वांतील मानवप्राणी तर असोच, पण इतरांचे ठिकाणीं आपले चित्त जाऊन त्याजवरहि नितांत सर्वमय प्रेम करावयास लागाल अशा रीतीनें उदात्त प्रेमानें आपण जेव्हां आचरण घडवून वागूं, तेव्हांच आपली खरोखर उपासना घडते असें मला वाटतें ! सगुण निर्गुण ही उपासना वेदांगीं असल्यामुळें अगर अध्यात्मिक लोकांचे आचरण्यासाठीं म्हणा, आपण जरा वेळ बाजूला ठेवून वरील उपासनेनें व्यावहारिक उपासना कां होईना तीच हळुहळू चित्तांतील विकारांना दाबून टाकून ईश्वराचे सान्निध्याचें योगानेंच ह्याच मार्गावर आणून पोंहचती होईल. उपासनेचें मार्ग भिन्न भिन्न जरी असले तरी आपण कोणताही एक मार्ग स्वीकारून उपासना निश्चयानें तडीस नेणें आपलें कर्तव्य आहे. वेद वेदांत उपनिषदें अनेक शास्त्रग्रंथ इ. गोष्टींत वादविवाद करून वेळेचा क्षय होऊन अखेरी संशय, विकल्प, तर्क, कुशंका, इत्यादिकांनीं मन बुद्धीचे ठिकाणीं अस्थीरपणा उत्पन्न होऊन कर्तव्यनाशच होतो. यापेक्षां क्रियानष्ट असणें बरें असें वाटणें साहजिक आहे ! आतां आपली वृत्ती निरहंकारी असणें किंवा बनणें तसेंच त्याचे—परमेश्वराचें सान्निध्य व त्यावरील श्रद्धा बलवान करून उपासनामार्गें रत असणें अधिक कल्याणप्रद नाहीं कां होणार ?

किती भोगितो दुःख मी रंक बोले ।।
विपत्तींत माझें सदा दीन गेलें ।।
मिळेना पुरे खावया काळजी ही ।।
तया झोंप येऊं न देई कदापि ।।१।।
असें द्रव्य कोटी सुखी तो न जाणा ।।
तया काळज्या संकटेंही कमी ना ।।
सुखाची न त्या श्रांत येई कदापी ।।
कुणी लाभ नेईल कीं काळजी ही ।।२।।
फुका आस केल्यासि मोठ्या पदाची ।।
अति त्रास होईल ही गोष्ट साची ।।
जसें ठेविलें सर्वसाक्षी प्रभूनें ।।
वसावें तसें सौख्य लाधें तयानें ।।३ ।।

ॐ तत्सत् ।।

## प्रकरण ९ वें

# आपले सहवासी व शेजारी यांचेसंबंधीं थोर विचार

ता. ९ १-१९३९ सोमवार

स्वतःला दुःख झालें असतांही कोणाच्या मर्मी लागेल असें भाषण करूं नये. कायेनें, मनानें, आचारानें, विचारानें, कोणासही सहसा प्रसंगाखेरीज दुखवूं नये. दुसऱ्याचें मनाला विनाकारण उद्विग्नता उत्पन्न होईल अशा शब्दांचा उच्चार करूं

नये, कारण ह्या गोष्टी शांती, समाधान, स्वर्गसुखाच्या नी अध्यात्म्याचे आड येणाऱ्या आहेत. असें मनुस्मृतींत अ. २ मध्यें सांगितलेलें आहे.

आपण आपल्या विषयाकडे वळूं या ! मनुष्याच्या बाह्य वर्तनक्रमावरून त्यांच्या अंगच्या शीलाची व मनाची थोडी फार तरी परीक्षा होते यांत शंका नाहीं; आणि ही बाब अशी आहे कीं, आपल्या एकमेकांच्या व्यवहारांत आपणांस तिच्याकडे दुर्लक्ष करितां नयेत नाहीं ती इतकी महत्त्वाची गोष्ट आहे कीं, रोजच्या व्यवहारांत मनुष्याची रीतभात, स्वरूप आणि चेहेऱ्यावरील मुद्रा ह्या गोष्टी त्याचा ज्यांच्या ज्यांच्याशीं निकट संबंध येतो, त्यांच्या मनावर बरी वाईट गोष्ट, छाप बसविण्यास मुख्यत्वें कारणीभूत होत असतात. हें आपण सर्वजण कबूल करूं. पण लोकांच्या नुसत्या रीतिभातिवरून, स्वरूपावरून सकृद्दर्शनीं त्यांची परीक्षा करण्यांत आपले हातून, किंवा आपले वागणुकीनें ज्या चुका होतात त्यापेक्षांही अधिक चुका होण्याचा दुसऱ्या कोणत्याही बाबतींत फारसा संभव नसतो असें मला वाटतें ! पहिल्या भेटींत एकादें वेळीं आपले मनावर झालेला प्रतिकूल ग्रह मागाहून त्यांची चांगली ओळख झालेवर आपणांस एकतर बदलावाच लागतो, किंवा तो ग्रह अजिबात नाहींसा करण प्राप्त आहे. जे चांगले ग्रह पहिल्यानेंच होतात, ते अखेर पावेतों टिकतात, ते बहुअंशीं

खरे ठरतात. पण केव्हांही पश्चात्तापाला कारण नसतें. नेहमींच्या प्रमाणें प्रतिकूल ग्रह सामान्यत: खोटेंही ठरतात! आणि नंतर आपले मनावर होणाऱ्या त्या ग्रहाबाबत जर कोणाजवळ बोललों, किंवा ते बोल आपण होऊन सांगितले असले, अगर आपल्या वागणुकींत त्यामुळें कांहीं फरक झाल्याचें जर आपण दाखविलें तर आपण आपल्या बांधवाला दुखविल्याचेंच होतें व मागाहून कितीही कळकळ, सारवासारव केली तरी मग त्याची संपादनी म्हणून करतांच येत नाहीं!!

प्रथमत: आपल्या मनावर होणाऱ्या संस्कारावर अवलंबून न राहणेंविषयीं विचारपूर्वक दक्षता ठेवण्याची काळजी घेऊं!

एकाद्याची बिनचूक परीक्षा करण्याचे कामीं आपले संस्कार, मन, बुद्धी ही लंगडी असतात. करितां ह्यांचा पगडा आपले मनावर बसूं देतां कामा नये. उलट पक्षीं असा ग्रह कां बरें झाला? अशी शंका घेऊन जो दोष शेजाऱ्याचा दिसतो तोच आपले अंतरंगीं वसतो. अशी उलट प्रवृत्ती व्हावयास पाहिजे. आणि खरें पाहिलें असतां आपल्या स्वत:चे अज्ञानांत व फुकट अभिमान अहंकारांत जेवढा दोष असतो. तेवढा खरोखरी आपले शेजाऱ्यांत नसतो. ही गोष्ट आपल्याला दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

हें बघा! सर्व धंद्यांपेक्षां वकील किंवा डॉक्टरचे धंद्यांत प्रामाणिकपणाची व अब्रूची फारच गरज असते तरी पण

नुसत्या बाह्य स्वरुपावरूनच त्यांचे संबंधीं एकाएकीं आपलें मत कसें बनवतों याचा प्रत्यही अनुभव येतोंच! !

मानवी प्राण्यांच्या चित्तवृत्तींचा बोध होणें फारच दुरापास्त असतें मग इतरांच्या बोध नीट पणें लक्षांत येणें किती कठीण आहे हें सांगावयास नकोच !

स्वभावानें, शिक्षणानें, संवयीनें, रुचिने आपले एकमेकांत किती तफावत आहे? याचा विचार करावा. भिन्न भिन्न वेळीं स्वत:मध्यें किती फरक पडतो हें आपणच पहा! असें म्हणतात कीं, जलपर्यटानें मनुष्याचे आकाश बदलते पण मन बदलत नाहीं.

स्वभावो दुरतिक्रमः । या न्यायानें नुसत्या हवेंत बदल झाल्यानें किंवा स्थलांतर केल्यानें मनुष्याच्या स्वभावांत फरक पडणें शक्यच नसते. एकाकी कोणाबाबद जो ग्रह करून घेत असतो, त्याचे पूर्वी तुम्ही त्याचे आचार, विचार, उच्चार, ह्या त्रयींची मनोमनीं खात्री पटवून घेतल्याशिवाय जे आरोप लादतों ते किती व्यर्थ आहेत बरें? अमक्याचा अमुक त्यांत हेतू असावा असें तर्कशास्त्र लढवून त्या सहाध्यायी व शेजाऱ्याचें संबंधीं पक्की खात्री न करितां किती दोष देतों ? करितां ज्यांची आपणांस फारशी माहिती नाहीं, अशांचें संबंधीं मन तयार करण्याचें कामीं फार दक्षता ठेविली पाहिजे. व तीं मतें तोंडावाटे बाहेर काढणें याहीपेक्षां अधिक जपलें पाहिजे.

(५२१) डा. क्र. ११४८८

आजन्म ज्ञान संपादन करून देखील स्वतःच्या हेतु बद्दल आपल्याकडून बऱ्याचशा चुका होण्याचा संभव असतो. मग शेजाऱ्याच्या चुकीबाबद आपण अधिक पात्र होऊं!!

मनुष्याच्या मनोदराचा थांग लागणें अतिशय कठीण असते व त्यांचे अंतस्थ विचार काय असतात हेही कळणें दुरापास्त होतें

सारांश आपण सर्वविषयीं उदार व प्रेवळ बुद्धीनें विचार करावा व त्यास अनुसरून आपलें वर्तन ठेवावें. जरी मानसिक व शारीरिक दौर्बल्यामुळें स्वभावांत दोष उत्पन्न झाले असतील तरी तें मानसिक विचारतेनें प्रेमपूर्ण दृष्टीनें व मृदु वचनानें ते स्वभाव बदलत असतात, कित्येक आळशी व निरोगी माणसें नसतां कारण दाखवून त्याचा कर्णोपकर्णी शद्वसंचार करून असल्या उद्योगांत फारच माणसें दृष्टीस पडतात. करितां असल्या गोष्टींवर आपण विश्वास न ठेवितां फार तत्पर असणें जरूर आहे. कदाचित एखादी गोष्ट खरी असावी व कारण सबळ जरी पहावयास मिळालें, तरी आपण इतराजवळ उच्चार करण्याचें सोडून देणें रास्त आहे.

एकदां एकादी कंडी आपलें तोंडून बाहेरील जगांत आली रे आली कीं मालकी त्या सार्वजनिक मानवांची ! मग त्या वाणीवर आपला ताबा नसतो व त्याचे इष्ट अनिष्ट परिणामही भोगावे लागतात. करितां ह्या जगांत ' सहसा मौनं सर्वार्थ

साधनम्" अशीच वृत्ती बाळगणें हितावह होते.

कारण अथवा प्रमाण असो वा नसो कांहीं एक विचार न करतां नीचपणानें वाटेल तसा आपण इतरांविषयीं जो विचार मनांत आणित असतो त्या बेअब्रुबाबद जर ईश्वराच्या सिंहासनासमोर जबाब देण्याची पाळी आली तर आपणांस काय उत्तर देतां येईल? सर्वांठायीं प्रेम नी नम्रभाव या अमोल वस्तू आहे. आपले आवडतें काम विचारांनीं आपापल्या व्यवसायांत गर्क ठेवीत असतें. ईश्वरावर व मानव जातीवरही प्रेम करा. स्वतःसंबंधीं वाटेल तितका वाईट विचार केल्यास हरकत नाहीं. उलट तसा जितका अधिक विचार करूं तितकें अधिक कल्याणप्रद आहे. पण आपल्या सहाध्याई अगर शेजाऱ्याविषयीं मात्र आपल्याकडून होईल तितकें प्रेमानेंच आपण विचार करीत असावें. एवढेंहा न साधलें तर निदान कोठल्याही प्रकारचा शब्दोच्चार न काढतां स्वस्थ तरी असावें. "पचेल इतकें खावें, रुचेल तितकेंच बोलावें" या म्हणी प्रमाणें वागत असणें हिताचें होय. हे लांबलेलें पुराण येथें पुरें करूं या.

बुद्धि दे माधवनाथा

युक्ति नाहीं, बुद्धि नाही, विद्या नाहीं विवेकता ।
अज्ञान दास मी तुझा बुद्धि दे माधवनाथा ॥१॥
मन हे आवरेना कीं, वासना उदंड सदा ॥

।। कल्पना पळते सैराट बुद्धि देई माधवनाथा ।। २ ।।
।। अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, सौख्य नाहीं, जगामधि ।।
।। आधार पाहे, नसेचि बुद्धि देई **माधव आई** ।। ३ ।।
।। बोलणें चालणें येईना, कार्यभाग वळेचिना ।।
।। बहू म्यां पीडिलों लोकां बुद्धि देई माधवें बा ।। ४ ।।
।। तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतांपरी ।।
।। सौख्य देखता तो नाहीं, बुद्धि देई गुरुमाई ।। ५ ।।
।। बरें लिहितां येईना, चूक होई सदा मना ।।
।। अर्थ तो सांगता ये ना, बुद्धि देई गुरुराया ।।६ ।।
।। प्रसंग वेळां कळेना, आसक्ती रोग टळेना ।।
।। कुणी मित्रही मिळेना, बुद्धि द्यावी माधवराया ।।७।।
।। कळेना, स्फूर्ति होईना, आपदा लागली फार ।।
।। वेळोंवेळीं सोडीना पोट, बुद्धि देई नाथ ईश्वरा ।।८।।
।। नेटका नव्हें संसारू, जीवीं वाटें उद्वेगू ।।
।। ना कळेचि परमार्थू, बुद्धि देई माधव राघू ।।९।।
।। बहूत भक्त तुम्हांतें, आम्हां कोण पुसतें ।।
।। आधीं ब्रीद राखणें, तुम्हां सद्गुरोराये ।।१० ।।
।। आर्तिक्य स्वरें, हांक मारी, चिंतामणी ।।
।। पदरीं ज्ञणीं धरीं, गा चक्रपाणी ।।११।।

।।ॐ तत्सत् ।।

卐

## प्रकरण १० वें

# आपलें कर्तव्यकर्म

ता. १३।१।३९

धर्म हा प्राणिमात्रांचा आधारस्तंभ आहे. प्रत्येक गोष्टींत धर्माचा अंतर्भाव असतो नी होतो. याप्रमाणें धर्माला सर्वोत्कृष्ट असें म्हणतात. ( तैत्तरीवारण्यक मध्यें म्हटलें आहे. )

आज आपण आपलें कर्तव्य काय याबाबत विचार करण्याचें करूं या! प्रत्येकाला कांहीतरी कर्तव्य म्हणून आहेच! याविषयीं सर्वांचें एकमत आहे, यांत मला शंका वाटत नाहीं.

कर्ममार्ग म्हणून एक आहे, तें आपणांसर्वांस मान्य आहे. तो आपला धर्म आहे, आचार आहे, उपासना आहे, त्यासंबंधीं श्रद्धाही पण आहे. तें आपणांस फेडावयाचें ऋण आहे, कारण तो सदाचार आहे. सत्कर्म करण्याची मनापासून इच्छा धरून जर एकादें वेळीं आपण आपलें कर्तव्यकर्म कोणतें म्हणून प्रश्न केला तर त्याचें उत्तम प्रकारें असें उत्तर आपणां सर्वांच्या अंतर्यामीं वास करीत असलेल्या सद्विचारांतच मिळतें. ह्या विचारालाच मी दिव्य दर्शन असें म्हणतो व तोच अंतरात्म्याचा ध्वनी आहे.

तात्पर्य आपणांस जें अवश्य केलें पाहिजे तेंच आपलें प्रत्येकाचें कार्य कर्म जाणावें. सर्वांचे कर्तव्यकर्म एक विचाराचे

(५५)... ९३८३ ... दि. ८/३/

किंवा एक मताचे असतें असें मात्र नाहीं व समजूंही पण नाहीं व नका. कारण मातापित्यांचें कर्तव्य कर्माहून मुलांचे वेगळें असूं शकेल ? विद्यागुरुंचे वेगळें, ज्ञानगुरुंचे वेगळें, मोक्ष-गुरुंचे वेगळें तसेंच राजकारणांतील गुरुंचे वेगळें, शिष्यांचे वेगळें, राजा नी प्रजा यांचेंपण वेगळें, योद्ध्याचे वेगळें इ. इ. तरी परिस्थितीप्रमाणें कर्तव्यभिन्नता जरी असली तरी पण उच्च असो, श्रीमंत असो अगर दरिद्री असो, पुरुष, स्त्री, मुलें वगैरें कोणींही असो त्याचे मागें कर्तव्यकर्म हें लागलेलें आपणां सर्वांच्या दृष्टीस पडत आहेच !

आपण एका प्रचंड विश्वकुटुंबांतील लेकरेंच आहोत, व परमेश्वर हा त्या कुटुंबाचा मोठा चालविता असून ह्या कुटुंबां-तील लेकरें, आपण एकमेकांचे नातलगच आहोंत ! ज्या-प्रमाणें कर्तव्यदक्ष मुलगा आपल्या माता व पिता यांवर निस्सीम प्रेम ठेवून आज्ञापालन करून आचरण ठेवितो, त्या-प्रमाणें आपणां सर्वांचा म्हणजे जगांतील यच्चयावत् प्राणि-मात्रांचा जो विश्वपिता परमेश्वर त्याचे ठिकाणीं निस्सीम प्रेम ठेवून त्याचें आज्ञेंत राहिलें पाहिजे !

मुलांचे जसें भावंडांवर प्रेम असतें तसेंच आपले विश्व-बांधवांवरही ठेवण्याची इच्छा बाळगणें श्रेयस्कर नाहीं कां वाटत ? अशा इच्छेपासून जगांत पुढें आपला किती मोठा फायदा होणार आहे, ही कल्पना आज जरी आपणांस येत

नाहीं, तरी आपण या जगाचे जगमित्र होणार आहोंत हें विसरून जाऊं नका !

आतां परमेश्वराविषयीं आपलें कर्तव्यकर्म कोणतें, याचा विचार अल्पमतीनें करून लक्षांत घेऊं या ! जन्मदात्याप्रमाणें परमेश्वर दृष्टीस पडत नाहीं, तरी पण श्रद्धेनें आपणांस त्याचेवर विश्वास ठेवतां येतो, नव्हें तर अनेक महान ऋषींच्या प्रमाणांवरून-तसेंच त्यांचे अनुभविक बोलावरून किंवा संत महात्मे, तत्ववेत्ते, भौतिक शास्त्रज्ञ, वेदविशारद वगैरेंचे अनुभवसिद्ध वाक्यें, प्रमाणें इ. इ. दाखल्यावरून निश्चल श्रद्धा ठेविलीच पाहिजे. त्याच्याच पुण्याईनें पराक्रमानें, तेजानें आज आपण सर्व तत्वांचा, ज्ञानांचा, द्रव्याचा लाभ घेत आहोंत ! हें माझें सांगणें विचाराअंतीं सत्य वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

ईश्वराविषयीं आपलें कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे त्याचेवर पूर्ण विश्वास, श्रद्धा ठेवणें, त्याची भीति बाळगणें, आणि प्रेमानें गुण गात राहणें, इतकेंच नव्हें तर काया, वाचा, मनें करून विनम्र होऊन श्रीसमर्थ रामदास स्वामींनी ज्या नवविधा भक्ति सांगितल्या त्यापैकीं एकादी तरी संग्रहित करून परमेश्वराची सेवा करणें हेंच होय.

ईश्वरासंबंधीं, मागें लिहिलेल्या प्रकरणांत त्याचे सान्निध्य, त्याचेवर श्रद्धा नी तसें आचरण, उपासना इ. हें

कार्य सोपें आहे असें नाहीं, कारण स्पष्ट निरलस श्रद्धेची ह्या ठिकाणीं अत्यंत जरूरी आहे. आतां श्रद्धेनें रहावयाचें म्हणजे ह्या इंद्रियगोचर जगांत फारच सावधगिरीनें व काळजीपूर्वक राहण्याची खबरदारी घेतली पाहिजे. श्रद्धा बलवत्तर होण्यास व्यावहारिक साधनांनीं आपणांस आत्मशिक्षण वारंवार उदाहरणें घेऊनच मिळविलें पाहिजे व तें मिळवितां येतें. अशा साधनांपैकीं, चांगलें साधन म्हटलें म्हणजे उपासना हेंच होय. माझी येवढी खात्रीं आहे कीं, ईश्वर व त्याचें सान्निध्य याविषयीं खरी श्रद्धा उदय पावली कीं, मग ईश्वरविषयक कर्तव्यकर्माचे बाकीचे दोन विभाग आपोआपच मागें येतात. व त्याचे कर्तव्यकर्मांत श्रद्धेलाच मी मुख्य स्थान दिलें आहे. आपला भाव जर शुद्ध असेल तर ईश्वरावर प्रेम सहज जडेल, व प्रेम जडलें कीं, कृतज्ञतापूर्वक आपल्याकडून सेवाही घडतेच !

आपण कर्तव्याच्या दुसऱ्या भागाकडे वळून विचार करूं या ! हा विचार आपणां सर्वांना अनुलक्षून आहे. आपल्या बांधवांविषयीं आपलें कर्तव्यकर्म म्हणजे आपण आपल्या स्वत:वर जसें प्रेम, ममता, माया, काळजी घेणें इ. करितो तसेंच तें शेजारी बांधव, अगर सहवासी यांचेवर करणें अत्यंत जरूर आहे. बांधवानीं आपणांशीं जसें वागावें अशी आपली इच्छा असते, तसेंच आपणही त्यांचेशीं आपलें आचरण ठेवावें.

स्वत:चे करितां जशी काळजी आपण वहातों, तशीच त्यांचे-करितां आपणांस काय करतां येईल? असे प्रयत्न सहानुभूति-पूर्वक सतत आपलें मनांत घोळून कार्य करण्यास कोणत्याही रूपानें तयार असावें. दुसऱ्यांचे सुखदु:खांत आपण वाटेकरी असणें प्रत्येकाचे काम असून त्याप्रमाणें आचरण ठेविलें पाहिजे.

दुसऱ्याचे सुखदु:खाचे वांटेकरी होणें अत्यंत कठीण आहे हें मी जाणून आहे त्यांचेशीं सलगीचें संभाषण, नम्रता, विनय, ममता, कळवळा, मृदुवचन इ. गोष्टीनें त्यांना असलेल्या दु:खद स्थितीला समाधानकारक होणार नाहीं काय ? इतकेंच नाहीं तर त्यांना असें वाटेल कीं, हा माझा एक सखा असून पाठचा बंधू किंवा भगिनीच आहे ! केवढी मोठी गोष्ट होत आहे बरें ?

थोर व चांगली समजली जाणारी कोणतीच गोष्ट सोपी नाहीं. मात्र कर्तव्य दुष्कर म्हणून आपण आपला उत्साहभंग किंवा बंधुकर्तव्य टाकतां कामा नये. आपण ईश्वरसान्निध्य जवळ केल्यानें अशी कोणती गोष्ट दूर जाईल ? व बंधुत्वाचें नातें आपला त्याग करील सांगा बरें ?

जैसे जयाचें विद्यादान । तैसेचि उपजे विद्यार्थी गण ।।

स्नेहपूर्वक भावना वाढण्यास शिक्षकवर्ग तसेंच शिक्षण-संस्था, ह्या कितीतरी दक्ष असावयास पाहिजे ? अशांचे ठिकाणीं स्वार्थदृष्टी नी लोभलोलुपता यामुळें अंधत्व येत

आहे. संस्था, सोसायटचा, क्लब, पंचायत, नो पक्षाभिमान समाज यांतील तत्वें विचार करतां अत्यंत किळसवाणें पहावयास मिळतात. ऐहिक नी एकटयासाठीं हेतू पुरविणें व मानमरातब घेणें, याशिवाय इतर बांधवांचे कांही नुकसान झालें तरी त्याची किंमत वाटूं नये. ही वागणूक अत्यंत लांछनास्पद आहे. तरी सर्वांनीं अशा गोष्टीकडे बारीक लक्ष देणें महत्वाचें वाटत नाहीं कां ?

म्हणून माझें, आपणांस प्रेमानें असें सांगणें आहे कीं, आजपासून आपल्या स्वत:पेक्षां इतरांविषयीं अधिक विचार करण्याचा प्रयत्न करूं ! व त्या कामीं ईश्वराजवळ सहाय्य मागूं. आपला ज्यांच्याशीं संबंध घडतो, येतो अशा आपल्या भोंवतालच्या सर्व माणसांशीं स्नेहानें, प्रेमानें वागण्याचा निश्चय करूं या !

आपल्या ह्या बांधवांत कृपाळू, दयाशील व धर्मशील नीं मानवता ह्यांचे विचार प्रसृत करून आपण आपलें कर्तव्यकर्म चोख केलें पाहिजे. आपल्यांपैकीं प्रत्येकास असें वाटलें पाहिजे कीं, माझ्या स्वत:चें अब्रूपेक्षां इतरांची अब्रू जास्त महत्वाची आहे. दोषाकडे लक्ष न देतां चांगले गुण तितके घेण्याचा प्रयत्न करावा.

जें आपल्या कल्याणाकरितां सदोदित इच्छा बाळगून तत्पर असतात, त्यांच्या आज्ञा पाळणें, वागणें हें आपलें

कर्तव्यकर्म आहे. त्या लोकांचे कडून लाभलेल्या अवसरांचा आपण होईल तितका सदुपयोग करून घेणें. हें आपण केलें नाहीं तर कृतघ्नतेचें, मूर्खपणाचें पातक केल्यासारखें होत आहे. ज्यांनीं आपले बालपणांत अवसर दवडला नी आज्ञापालन केलें नाहीं त्यांना मोठेंपणीं पश्चात्तापच झाल्याचें आढळून आलें आहे.

आतां खालील दोन विचारांचा आपण वारंवार विचार करावा असें मला वाटतें व तो हितकर होऊन आपण कोण? संबंध काय ? नी या जगांत आपलें कर्तव्य कर्म या ठिकाणीं कोणतें ? याचा विचार करून केलें असतां नरजन्म सफल होईल असें खात्रीनें वाटतें.

१ ) सर्वभूतीं, विशेषकरून शेजारधर्म आणि सहाध्यायांविषयीं निष्कपट प्रेम ठेवणें, त्यांच्या कीर्तीला कलंक लावणाऱ्या गोष्टींचा मुखावाटे पुनरुच्चार न करणें, चित्ताचे क्षोभास कारण होईल असें वर्तन नसावें. क्षमाशील वर्तनानें वागणें. ही माझी कर्तव्यकर्मे आहेत असें मनाशीं, बाळगून आचरण ठेवणें.

२ ) माझीं कामें माझ्यानें होतील तितकें नीटपणें करीन व करून दाखवीन, मी विद्यार्थी आहे, मला ज्ञान संपादन करायचें आहे. अशा प्रकारें बुद्धीची तयारी असावी, हितोपदेश करणारे हे माझें गुरु आहेत. करितां त्यांचे संबंधीं आस्था

वाळगीन, आणि माझें वर्तनानें सर्वांना प्रसन्न ठेवतां येईल तितकें ठेवीन. प्रसंगोपात काया, वाचा, मनें करून जितकी मदत करतां येईल तितकी करीन. अशा विचारांचे आचरण घडत गेल्यास हीच ईश्वरी सेवा होय आणि आपलें कर्तव्यकर्म बजावलें असें होईल.

ईश्वराविषयीं व मानवासंबंधीं प्रेम नी आचार हेंच काय तें आपणां सर्वांचें अखिल कर्तव्यकर्म आहे. अशा प्रकारें प्रेम असलें म्हणजे बाकीचे अन्य गुण आपोआप मागें येतातच! ज्याच्या हृदयसागरावर ईश्वराविषयीं प्रेमलहरी उसळून येतात नी असतात, ज्याच्या हृदयावर सुखदु:खांच्या लहरींचा विचार बसतो, अशांच्या ठिकाणीं बांधवांबद्दल खात्रीनें प्रेम असलेंच पाहिजे. याची उदाहरणें श्री. पंडीतजी नेहरू, विनोबा भावे, यशवंतराव चव्हाण म्हणजे महाराष्ट्राचे पंतप्रधान इ. होत. या थोर विभूतींनी पहिल्यानें मानवबंधूंवर प्रेम करून, म्हणजे हे सर्व माझे विश्वबंधू आहेत, त्यांच्या अडीअडचणींचा काया, वाचा, मनें करून विचार केला नी हीच सेवा प्रभूची आहे अशी खात्री करूनच ईश्वराचे सान्निध्यानें आजला भारतांत तसेंच जगांत नामवंत ठरले गेले. म्हणून मला सांगावेसें वाटतें कीं आपले समोर जे दृश्य बांधव आहेत त्यांचेवर निष्कपट, निरहंकारी प्रेम करण्यासाठीं झटावें. नंतर अदृश्य असा परमेश्वर त्याचे सान्निध्य आपणांस उपभोगण्यास मिळेल ही खात्री ठेवा.

वरील सर्व लिखाणाचा आशय आपणां सर्वांचे लक्षांत आला असेलच ! करितां या व्यवहारांतच ईश्वरी सान्निध्य आपणांस मिळवितां येतें याचा अनुभव घेण्यास तत्पर असावें. इतकें सांगून श्री पंडित मोरोपंतांचे आर्येला नमस्कार करून हा भाग समाप्त करूं या !

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहबिंदुही फार ।।
सारज्ञ असूयोज्झित त्यांना माझा असो नमस्कार।।

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण ११ वें

# आचाराचें महत्त्व

ह्या जगांत सत्य आहे म्हणूनच वायू वहातो, सूर्य उगवतो, आणि त्यावरच प्रत्येक गोष्ट अवलंबून असते. हरएक गोष्टींत सत्य हेंच उन्नतकारी आहे असें तैत्तरीयारण्यक मध्यें म्हटलें आहे.

मागील प्रकरणांतून अल्पसे विचार आपणांपुढें मांडिले आणि त्यांचा संबंध सर्वांशीं–परमेश्वराशीं येऊन पोहोंचतो. असें आपणांस वाटल्यावांचून रहाणें शक्य नाहीं. ज्या जगन्नियंत्यानें सृष्टी आपल्या इच्छेनुसार उत्पन्न करून निरनिराळ्या गोष्टी ह्या मानवांचे तसेंच इतर प्राण्यांचे साठीं निर्माण करून, व्यवहार मांडून यांतून माझे पुत्र कसें वागतात

हें पाहण्यासाठीं म्हणून तो साक्षीरूपानें पहात आहे. आणि ज्याचे त्याचे व्यवहाराचे कर्मफळ ज्याचे त्याचेच माथीं ठेवून, आपण कमरेवर हात ठेवून शांत चित्तानें या जगांतील व्यवहाराकडे सारख्या नजरेनें पहात असून निरासक्त असा उभा आहे बरें ! प्रत्येक व्यवहारांत, कर्मांत, पारलौकिकांत, स्वर्गांत, मृत्यूंत, पाताळांत, नव्हें सर्वत्र तोच कसा भरून उरलेला आहे, नी त्याचे सत्तेशिवाय कांहींच चालत नसतां आपण मात्र मी-पणानें, अहंकारानें, माझें कर्तृत्व अशा अभिमानानें किती तरी पापाचरण नकळत होतें, होत असतें ? नी तसेंच कर्महीनता, अनीतिमूलक कर्मांचा आचार घडवून आयुष्यांत कर्मांचे गांठोडे तयार करून यमदरबारांत दाखला देणेंसाठीं हजर असतो बरें ? या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला असतां आपण कशासाठीं मनुष्य जन्मांत आलों, उद्देश काय ? व आपण कोणत्या आचारतेनें रहाणें इष्ट होईल व त्यापासून मृत्यूलोकीं नी स्वर्गलोकीं कोणती प्राप्ती होईल, याचा विचार करून आपलें आचरण कसें असावें, याचा थोडासा विचार करूं या ! आणि तो प्रपंच, संसार, व्यवहार अशा अनेक सान, थोर गोष्टी करून केला असतां, त्यांचा प्रत्यय आल्यावांचून रहाणार नाहीं आणि अशा तऱ्हेचे या मृत्युलोकांत जें आपलें आचरण घडेल, त्याप्रमाणेंच पारलौकिक सुखास पात्र होऊं. म्हणून जेथें जन्म तेथल्याच गोष्टींचा विचार करून आपण सुख भोगूं या !

जो सत्य कर्म आचरणामुळें अधिकारसंपन्न होऊन त्या अधिकार सत्तेच्या जोरावर लांच घेणें, कपटवृत्तीनें वागणें, द्वेष मत्सरादि बुद्धीनें नुकसानी करणें, विश्वासघात करणें, इत्यादि गुणांमुळें ईश्वरी सान्निध्यास व इतर गुणांस लाथाडले जाऊन तो आपलें पदरीं दोषांचें जाळेंच पसरून घतो. पूर्व-जन्मांत आपण सत्यकर्मांचें आचरण केल्यानें यावेळीं अधिकार-संपन्नतेस प्राप्त झालों, सरकारनें आपणांस विश्वासू म्हणून न्यायाची जागा दिली, ईश्वराचें सान्निध्य होतें म्हणून सरकारची आपणांवर कृपा झाली, इतक्या योग्यतेस चढलों हें परमेश्वराचे उपकार आहेत, ह्या सर्व गोष्टी सत्तेच्या धुंदीनें पार मावळून सत्य कर्मांच्या आचरणापासून परावृत्त होत असतो. धनिक लोकांची मर्जी संपादन करण्यासाठीं, अथवा त्यांचेवर मर्जी दाखविण्यासाठीं आपल्या सत्तेचा दुरुपयोग करणें हें अनीतिमूलक होय. ज्याला तळ्याचे पाणी राखावयास नेमावें त्यानेंच त्यांतील मासे मारून खावे इतका तो अधिकारसंपन्न माणूस विश्वासघातकी होत असतो.

न्यायदेवतेच्या नांवाखालीं अन्यायाचा प्रसार करीत असतो, परमेश्वराचा सेवक म्हणून जी गोष्ट ईश्वराला अत्यंत तिरस्करणीय वाटते तीच तो करीत असतो ! याला कारण सत्तास्थान होय.

अधिकाऱ्याला परमेश्वराचा सेवक म्हणून कां म्हणावयाचें ? तर याचें कारण जगांतील प्रत्येक राज्य नी प्रजा ही ईश्वराधिष्ट असते व ज्या लोकांवर त्याची योजना झालेली असते, त्यांच्या बाबत ईश्वराजवळ ते लोक जबाबदार असतात. आपल्यावर सत्ता चालविण्यासाठीं ज्यांची योजना होते, अशा राज्यकर्त्यांच्या आज्ञेंत आपण कां वागावें याचें कारण तरी हेंच होय. ती ईश्वरी योजना असते. राजा म्हणजे ईश्वराचा अंश असें जें मनूनें म्हटलें आहे, त्याचा अर्थ तरी हाच होय..सामान्य जनतेपेक्षां राजाच्या ठिकाणीं अधिक दिव्य तेज असतेंच ! हें सांगण्याचा आशय हा कीं, राजसामर्थ्याचा आपण आदर केला पाहिजे. कारण तें ईश्वरदत्त असतें. अशा विचारसरणीनें पहातां राजाच्या हाताखालीं असणारे सर्व अधिकारी हे जनतेमध्यें ईश्वराचें कार्य किंवा नौकरी करण्यासाठीं नेमलेले असतात. तें कार्य म्हणजे निःपक्षपाती, न्याय, व्यवस्था नी शांतता व रक्षण हेंच होय. आणि हें उदात्त कार्य करण्यासाठीं त्यांची योजना झालेली असतां जर ते स्वतःच अन्यायानें लांचलुचपतीनें, विश्वासघातानें, सत्तामदानें कार्य करीत राहून पापाचें माप पदरीं घेऊं लागलें तर ईश्वराच्या अत्युच्च व पवित्र कामांत लबाडी नी असत्याचरण केल्याचा दोष त्यांचे माथीं येणार नाहीं काय ? आणि सत्तेच्या अहंकारानें " जनीं जनार्दन " विसरले.

ईश्वराच्या इच्छेप्रमाणें न वागणारे, राजापासून ते लहान अधिकारी वर्गापावेतों श्रेष्ठ दर्जाची अधिकारनियुक्त माणसें म्हणजे ईश्वराशीं व आपल्या बांधवांशीं विश्वासघातकीपणाचे आचरण केल्याचें सिद्ध होतें, आणि तें आपल्या कुलीनतेच्या पणास कमीपणा आणून कुलघातक होतात. परंतु ईश्वराला त्यांचें हें पापाचरण फार दिवस सहन होत नाहीं. म्हणूनच प्राचीन मनूनें म्हटलें कीं, राजाच्या अंगचा पहिला गुण म्हटला कीं, त्यानें सदैव सत्यव्रत राखलें पाहिजे. आजपर्यंतचे इतिहास, पुराणें, कथा व सामान्य व्यवहारांतील गोष्टींचें आपण अवलोकन केलें असतां सत्यव्रत न राखल्यानें धुळीस मिळाले, नामशेष झाले आहेत, दुसरें असें कीं, राजा आपलें कर्तव्यकर्माला जागला नाहीं तर न्यायदेवता त्याचा नायनाट करून निर्वंश केल्याशिवाय रहात नाहीं. " यथा राजा तथा प्रजा " अशा प्रकारें प्रजा निर्माण होत असते, ज्याप्रमाणें राजा हा प्रामाणिक असावा लागतो तसेंच त्याचे मंत्रिमंडळ नी हाताखालचे सर्व सत्ताधिकारी पुरुष हे देखील प्रामाणिकच असले पाहिजे, तरच तें रामराज्य होऊं शकतें, नाहींतर त्यांस रावणी राज्याची कळा आलेली असून प्रजा दुःखानलानें व्यग्र होत आहे. तिकडे रामराज्याचे चौघडे वाजविले जात आहे ! सर्व अधिकारी हे ईश्वराच्या हाताखालचे अधिकारी असून यांचे कृत्याबाबत ते जबाबदार आहेत ! सार्वजनिक कृत्यांत

केलेली लबाडी असत्याचरण हीं दुहेरी काळिमा आणणारे माप पापाचे घडे आहेत. आणि हें सर्वांना माहिती आहेच ! उच्च स्थानावरील सर्व मंत्री व सभापति हे ईश्वराचे दूत आहेत अशी माझी समजूत आहे. म्हणून त्यांचे ठिकाणी सत्यव्रत पालन, दयालुत्व, निस्पृहपणा यांची वाण असूं नये. सैन्यांतील सेनापति शत्रूच्या लांचबाजीला वश होऊन जाऊन मिळाला असतां आपण त्याला काय म्हणूं वरें ? अर्थातच आपण त्याला नीच, ठक, विश्वासघातकी असेंच म्हणूं कीं नाहीं ? ह्याचप्रमाणें ईश्वराचे दरबारचा नियम असून त्याचे नियम उल्लंघून जे जे आचरण करतात तेही विश्वासघातकीच होय.

ईश्वरदत्त कर्तव्याला खरेंपणानें जागून जो आपलें आचरण ठेवीत नाहीं, असा प्रत्येक राजा पुढारी, व श्रेष्ठ दर्जाचा अधिकारी हे या वरील कोटींतले असून शिक्षेला पात्र आहेत !

अधिकारपद प्राप्त झालें असतां सत्याचरणाच्या ह्या सार्वजनिक कर्तव्याविषयीं आपण विचार करूं या.

आपण उच्च प्रकारचें शिक्षण घेतलें म्हणजे अर्थातच गुलामगिरीचे व त्यामुळें आपणांस मिळणारें लहान मोठें अधिकारपरत्वें स्थान व स्थानाच्या मोहाला वश होऊन द्रव्यप्राप्तीची आणि स्वतःच्या कुटुंबांत ऐहिक संपत्तीची भर घालण्याची चांगलीच संधि सांपडल्यासारखें होय. अति उच्च पद प्राप्त झालेल्यांची तर गोष्टच सांगणें नको! आचारधर्म,

विचारधर्म, उच्चारधर्म, इत्यादि कल्पना जणूं काय करतल मलाप्रमाणें सहजच वाटून आपण कोण आहोंत, आपले सान्निध कोण आहे, आपलें कर्तव्य काय, इत्यादींकडे दुर्लक्ष करून अति द्रव्यार्जन कसें प्राप्त होत राहून ऐहिक सुखोपभोग अधिकाधिक मला प्राप्त होतील नी अधिकारारूढ राहीन हेच विचार जागृत राहून इतर बांधवांसंबंधीं विचारहीं मनोमनीं उगम पावत नाहीं ही लांछनिक गोष्ट आहे.

ज्याचे मनांत स्वतःपुरतेच विचार असतात तो खरोखरच ईश्वराचे नियमाचे विचारापासून दुरावलेलाच असतो! जर आपण त्या प्रभूच्या सान्निध्याचा वारंवार विचार करीत गेलों नी आपलें या सृष्टीमधील कर्तव्यकर्म कोणतें? याचा जर विचार करीत राहिलों, तर स्वार्थी ऐहिक प्रगतीच्या इच्छेसारखे अनुदार विचार आपल्या मनाला कधींही शिवावयाचे नाहींत. उलट ईश्वराच्या चांगुलपणासंबंधीं अत्यंत भावनाप्रधानतेनें व त्याच्याच इच्छेनें वागण्याचा निश्चय व न्यायाचा मनोहर विचार जिकडे तिकडे प्रसार करून सत्याचरणाकडे आपल्या बांधवांना वळवूंच! जर यच्चयावत् लहान व मोठा अधिकारीवर्ग वरील विचाराचा बनला, तसेंच राज्यकर्ते यांनीं आपलें कर्तव्यकर्म कोणतें हें पक्कें ओळखून ईश्वरदत्त नी ईश्वर सान्निध्याची भीति बाळगून जर ते सत्याचरणाकडे लक्ष देऊन कार्य बजावूं लागले तर पृथ्वीवरील ईश्वराचे अंश म्हणजे

जे पंतप्रधान, त्यांचे मंत्री आणि यांचे हाताखालील सत्ताधिकारी ह्या जगाला म्हणजे भारताला स्वर्गातील साम्राज्याची शोभा खात्रीनें आणतील! परंतु ह्या प्रत्येकांजवळ ईश्वराचें सान्निध्य असणें अत्यंत महत्त्वाचें आहे. ईश्वराचें सान्निध्य ज्यांचें जवळ नाहीं त्याचें हातून सत्याचरण केव्हांही होणारें नाहीं हें पक्कें ध्यानीं असू द्या. त्याप्रमाणें व्यक्ति, कुटुंब, ग्राम, प्रांत नी राज्य यांतील चालक हे जर परमेश्वराची भीति न बाळगितां किंवा त्याचे सान्निध्य न घेतां जे पुढारीपण घेऊन कर्तव्य करतात त्यांचा आज ना उद्यां नाश ठेवलेला आहेच!

सत्य अशा आचारांचे नांवाखालीं लोकांचे डोळ्यांत धूळ टाकून कार्यसाधू आपली वेळां मारून नेतो, परंतु ईश्वराजवळ तो ढोंगीपणा, लबाडी, कपट, गनिमीकावा करतां येणार नाहीं. वाणीनें, कृतीनें लबाडी करून खरोखर फायदा होत नाहीं! जो फायदा झाला असें समजतो तो त्याचें मनांत वारंवार डांचतच असतो. वरपांगी कितीही सज्जनपणा दाखवूं द्या! पण त्याचे मन त्याला खातच असतें. हा अनुभव वारंवार आपणांस येत नाही कां? आपली लबाडी, कपट, ठकबाजी आपणांसच उजेडांत आणून दाखवितें. याकरितां सत्य अशा आचरणासाठीं थोड्याशा स्वार्थाचीदेखील पर्वा करूं नये. म्हणून मला असें सांगावेसें वाटतें कीं, आपल्या देह, मन, बुद्धींतून याचें कायमचें स्थान उखडून टाकलेलें हिताचें होऊन बांधवांनाही आपलेपासून धडा मिळून आपण त्यांचे आदरास पात्र होऊं.

लांच घेणारांस बिनकष्टानें पैका मिळतो व कांहीं सांसारिक लाभ पदरांत पडतो, तेणेंकरून त्याचे सहस्र पटीनें नुकसान न कळत होत असतें. तें भरून निघणें शक्य नसतें. कारण सदा सर्वकाळ हीच बुद्धी, चिंतन यामुळें तन, मन त्याच व्यवहारांत असते. आतां ती नुकसान कोणती ? तर ती ईश्वरी प्रेम नी आत्मसौख्य होय. गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनाला शास्त्र-नियम सांगितले त्याचा आपण अवलंब केला पाहिजे. श्री ज्ञानेश्वर माउलीनें ज्ञानेश्वरींत आपणांकरतां जें जें मार्गदर्शन केलें त्याचा आचरणांत सर्वदा उपयोग करावा. परमेश्वराची भीती बाळगावी. एकट्याच्या ऐहिक सुखाची किंमत न ठेवितां आपले इतर बांधवांची जिव्हाळ्याची काळजी घेण्याचे करून आपलें कर्तव्यकर्म बजाविणें. " दुसऱ्याचें दुःखें दुखावला, दुसऱ्यांचे सुखें सुखावला " अशी वृत्ती आपणांत वाढविणें महत्त्वाचें असून श्री समर्थ रामदास स्वामींनीं प्रपंच संसारांत, राजकारणांत, परमार्थांत पदोपदीं जे मार्ग दाखविले ते आचरणांत आणून अमोल असें आयुष्य घालविणें आपणांस कल्याणप्रद होईल अशी खात्री आहे. इतकें सांगून हा अल्पमतीनें लिहिलेला भाग येथेंच पुरा करूं या ! आमच्या भारताचे पूज्य आणि ईश्वरी सान्निध्य ज्यांच्यांत ओतप्रोत भरलेलें असे कलाभूत पंडित जवाहरलाल नेहरू यांना उदंड आयुष्य लाभून त्यांच्या सत्याचरणाचा आम्हां प्रजाजनांना अधिकाधिक लाभ

व्होवो. ही त्या ईश्वराजवळ आपण सर्वजण मागणी करूं या!

।। ॐ तत्सत् ।।

प्रकरण १२ वें

# विचार–सत्यता

ता. १६।१।३९

माझे प्रिय बंधूंनो, आपण मागील प्रकरणांत थोडा फार कां होईना, परंतु आचारांतील खरेपणाबाबद विचार केला, आतां आपणा मनांतील येणारे विचारसंबंधीं खरेपणाबद्दल विचार करू या !

मागील प्रकरणाशीं या लिखाणाचा साखळीप्रमाणें संबंध आहे. आपले विचार जर पूर्णपणें न्याय्य व खरे असतील तर आपल्या उच्चारांत व आचारांतही आपणांस खरेंपणानें रहतां वागतां येईल ! उच्चार नी आचार हे विचाराचे स्वाभाविक परिणाम आहेत, विचार हा जणूं काय त्यांचा जनकच होय. ज्यांचे विचार अगदीं पूर्पपणें शुद्ध असतात, त्यांचे संसारांतील आचरणही शुद्ध असतेंच ! जगांतील इतर कोणत्याही माणसां-पेक्षां त्यांच्या अंगीं दिव्य तेज अधिक झळकत असतें आणि तो या लोकांत पूज्य ठरतो.

उच्चार व आचार ही विचारांची स्वाभाविक कार्यें असून त्यांच्यांतील ह्या परस्पर संबंधामुळेंच बुद्धिपुरस्सर

कार्य केल्यावांचून, तसेंच मनानें, इच्छेनें, वाणीनें, अथवा स्वहस्तानें तें कार्य घडल्याशिवाय कायद्याच्या दृष्टीनें कोणीही दोषी ठरत नाहीं. बुद्धिभ्रंश झालेल्या माणसाला निंदाव्यंजक अथवा नास्तिक लेखांबावत दोष देतांच येत नाहीं. बेशुद्ध, भ्रांत चित्तावस्थेंत अगर अजाणपणामुळें चुकीनें जर एकानें दुसऱ्याचा प्राण घेतला तर तो खुनाबद्दल अपराधी ठरत नाहीं, नीतिदृष्ट्या कोणत्याही तऱ्हेनें त्याला गुन्हेगार ठरवितां येत नाहीं. सारांश काय ? तर सर्व खरेपणा हा मन, चित्त, कायदा नी व्यवहार यांतून उदय पावला पाहिजे. ज्याला आपला उच्चार, आचार खरा ठेवावा अशी इच्छा असेल त्यानें अगोदर आपल्या विचारांत खरेपणा बाणवला पाहिजे !

असें कांही खोटें विचार असतात कीं, त्यांची प्रत्यक्ष कार्यें वाणीच्या अगर कृतींच्या रूपानें बाहेर उमटत नाहीं, पण ते मिथ्या प्रतिमा मनांत उत्पन्न करून व अनुदार अशा संशयजन्य कल्पनातरंग उसळून मनाला वेदना मात्र देत असतात, असे विचार स्वार्थी, ऐहिक असून ईश्वरापासून पराङ्मुख करणारे आहेत.

आपल्याविषयीं आपल्या शेजारी यांचे मन बुद्धी चांगली नाहीं, त्यांचे हेतू पापी आहेत, असे आपण किती तरी आरोप विचाराच्या असत्यानें लादीत असतो ? नंतर कांहीं काल गेल्यावर नजरेस येतें कीं, अरेरे ! ह्या दुष्ट विचारांना आपल्या

कल्पनेच्या बाहेर मुळांतच खरोखर अस्तित्वच नव्हतें, स्वार्थमूलक संशयामुळें आपल्या शेजाऱ्यांची, बंधूंची, भगिनींची परीक्षा करण्यांत आपल्या हातून अन्यायानें चूक झाली. दुसऱ्यांच्या श्रेयाला मात्सर्यानें कमीपणा आणण्याचा आपण प्रयत्न केला असें मन नी बुद्धि सांगत नाहीं काय? परोत्कर्ष विचार, मत्सरी विचार इत्यादिकांना आपल्याच मनांत विपेश रूपानें वास करण्यास आपणच त्यांना वारंवार जागा देत असतो. असले विचार जितके अपायकारक तितकेच असत्य असल्याचें आपल्या ध्यानांत येत असतें. म्हणून कुबुद्धीनें जे जे विचार स्फुरतात त्यांतील सत्यासत्यतेबाबत पूर्ण असा विचार करणें श्रेयस्कर आहे. अशा विचारानें मनाच्या शांततेला तसेंच सत्यतेला हितावह होणार नाहीं काय ? इतरांचे गुणदोषांचा निर्णय कठोरतेनें न करितां त्यांचेविषयीं चांगला विचार करण्याचा आपण नियम करणें हें आपलें प्रमुख कर्तव्य आहे, असें मला अल्प मतीनें वाटतें.

आपले ठिकाणीं वसत असलेले दयाळूपणाचे विचार हे खरेपणाचे विचार असतात असा अनेकवार अनुभव आल्यावांचून राहणार नाहीं. हा आपल्या कर्तव्यकर्माचाच–प्रेमाच्या कर्तव्याचा एक भाग आहे. आणि प्रेम हें दोषांवर पांघरूण घालते व गुणांवर विश्वास ठेवतें, सुखाची आशा वृद्धिंगत करते व दुःख सहन करते असें जें प्रेमाविषयीं म्हटलें आहे, तें किती यथार्थ आहे ?

आपणांस कांहीं वेळां मनास वाटतें कीं, आपली वडील माणसें, शाळा गुरुजी, सहाध्यायी, आपणांशीं सरळतेनें वागत नाहीं किंवा वागले नाहींत ! याचें कारण आपणांकडून व्हावें तितकें कार्य किंवा मेहनत झाली नाहीं, हें माहित असल्यामुळें तें छपविण्यासाठीं इतरांवर दोष, असत्य विचारानें लादीत असतो. अशा प्रकारें विचार मनांत घुसूं लागून वाढत वाढत जाऊन परिणत होतात व पुढें मानसिक चिंता उत्पन्न होऊन शरीरावर त्याचा परिणाम होतो. याकरितां आपलें कर्तव्य-कर्म बरोबर करावें, नी इतरांवर असत्य असे विचारांचे दोष देऊं नये. आपली कोठें चूक होते, हें प्रथम ध्यानीं आणून वागण्याचें करावें.

आपण उद्योग करतेवेळीं अगर प्रशांत वेळीं ईश्वरासंबंधीं चिंतन करीत राहिल्यास संशयी विचार व त्यामुळें वाढत गेलेली मानसिक चिंता उत्पन्न होणार नाहीं. ईश्वर चिंतनानें आपली मनःशुद्धि व त्याचे सान्निध्य, त्याचेवरील श्रद्धा नी त्याची उपासना वाढीस लागून, आचारसत्यता बळकट होऊन सर्वांठायीं प्रेम नी भूतदया उत्पन्न झालेवर असत्य अशा विचारांचा ठिकाणाच राहूं शकत नाहीं. ज्यांत शरीरानें मनानें, बुद्धीनें, वगैरे गोष्टी करण्यांत कष्ट पडतात आणि ते आचरणांत आणणेंही कठीण पडते, हें जाणून आहे, तरी प्रदीर्घ प्रयत्नानें तें असत्य लयास घालविलें पाहिजेत.

आपण नेहमीं सदुपदेश ऐकण्यासाठीं आपले कान उघडे ठेवा. जरी वाईटपणाचे शब्द किंवा बोल आपण ऐकलें तरी त्याकडे लक्ष जाऊं देऊं नये. त्या बोलांचा सत्य असा विचार करीत जावा. दंतकथा किंवा अप्रत्यक्ष गोष्टी अगर बोल यां-वर विश्वास ठेवूं नये. अशी एक म्हण आहे की,:— "कान नी डोळे यांत चार बोटांचें अंतर असतें" म्हणून कोणत्याही शब्दांचा अगर बोलांचा विचार करून कराव्यात. या संसारांत विचाराला फारच प्राधान्य दिलेलें आहे. ऐकीव किंवा संशयानें झपाटलेल्या मनुष्यांची स्थिति कशी होत असतें हें सर्वांच्या परिचयाचे आहेच.

आपलें अंतर्यामीं ईशनामाचा गजर, ध्यास, चिंतन, अस-ल्यानें वारंवार ईश्वराचें सान्निध्यानें आत्मिक ध्वनी जागृत होऊन, बुद्धीच्या ठिकाणीं विचारांचें स्फुरण होऊन मानव हा सत्य अशा आचार विचारांचे मार्गावर असतो. कारण ईश्व-राचा ध्यास हा कधींही असत्याचे मार्गाकडे जाऊं देतच नाहीं. याचें आजचें ताजें उदाहरण आपल्या भारतांतलें घेऊं! श्री विनोबा भावे यांचे आचार, विचार, उच्चार, ईश्वरी सान्निध्य, उपासना, श्रद्धा, या सर्वांचा बारकाईनें विचार करा बरें? हा कशाचा परिणाम आहे? याचा वाचकांनीं विचार करावा. ते इतक्या उच्च पदास कसे गेले? आपण आजला त्यांचा शब्द कां झेलतों? तर त्यांनीं ईश्वराचें सान्निध्य केल्यामुळें हेंच

त्याचें उत्तर होय. त्यांच्या आचारांत, विचारांत, उच्चारांत सत्यता आहे. इतकें सांगून येथें हा भाग पुरा करूं या.

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण १३ वें

# थट्टेचे हिताहित परिणाम

ता. १३.१.४९

मागील एका प्रकरणांत आपलें कर्तव्यकर्म असा भाग आलेला असून त्यापैकींच थोडासा भाग म्हणून सांगणें राहून गेला व त्यासंबंधीं आपण थोडासा विचार करूं !

थट्टा करणें चांगलें कीं वाईट, हें एकदम सांगतां येणें कठीणच आहे. एक प्रकारच्या थट्टेला संबोधून मराठी भाषेंत पद्य ( कविता ) आहे कीं,–अशी ही थट्टा। भल्या भल्याशीं लाविला बट्टा ।। तथापि जगांतून ही अजिवात नष्ट होईल असें मला वाटत नाहीं. आणि आपण तें समजूं शकतां ! तसें झालें तर, नवरसांतून हास्यरस याला फांटा मिळाला तर, जसें षड्रस अन्नांतून मीठ मात्र काढून घेतल्यासारखें होईल. सारांश थट्टा वाईट नाहीं, पण अप्रासंगिक अश्लील, परदोषदर्शक, आत्मस्तुतिसूचक थट्टा म्हणजे मानवी व्यवहारांत विषाचे शिंतोडे उडविण्याप्रमाणें आहे. विनोदी स्वभावाचा मनुष्य कोणाही रसिकांस अप्रिय होऊं नये व होतही नाहीं. पण त्या स्वभावांत

७३६३ ... ८।३।१

नीचवृत्ती, कृति, बीभत्स, ग्रामीण कल्पनांचे पूरण असलें तर तोच वांती आणणारा बनतो. यास्तव ज्याचा स्वभाव विनोदी आहे, त्यानें आपले विचार, मनन, अवलोकन व सत्समागम यांचे द्वारां प्रगल्भ करून घ्यावे. आणि तोच स्वभाव जनतेला आनंदकारक होईल. कोणासही टोंचून बोलणें म्हणजे थट्टा नव्हें, असल्या परदु:खशीतळांस दुसऱ्याची थट्टा करून स्वत: बत्तीसी काढावी लागते. कारण ज्याची थट्टा केली तो हृदयांत शल्य रुतल्यामुळें खिन्न असतो. कोणास चिडवून मौज पाहण्या-साठीं कांहीं तरी टूम करणें म्हणजे क्रूरपणास रंग चढविणें होय. असल्या प्रकारची थट्टा म्हणजे एक मोठें पापच होय असें मला वाटतें. जाणते लोक अशाला किंमत देत नाहींत व त्याचे समाजांत वर्चस्वही टिकत नाहीं

थट्टा करीत असतां मनुष्याच्या बोलण्याचा झोंक किंवा तोल कोणीकडे आहे, हंसण्यांत मित्रत्व, मत्सर, द्वेष, अभिमान व अहंकार यांतून कोणत्या विकारांचें आविष्करण होत आहे ! त्याची स्थिति कोणत्या प्रकारची आहे, दर्जा काय, विद्वत्ता, जगांतील अनुभव, इ. गोष्टींकडे ज्याची थट्टा चालली आहे त्याचें लक्ष जात असते. हे थट्टेबाजांनीं नेहमीं समजून असणें कल्याणप्रद होतें.

अतिपरिचय आणि थट्टा ही बहीण भावाप्रमाणें आहेत. आपली परिस्थिति, योग्यता, सुशिक्षितपणा, ज्ञानाभिरुचि व

व्यावहारिक ज्ञान हीं ज्यांच्याशीं समान आहेत, त्यांचीच थट्टा करावी. ज्यांचा आपला सहवास, भेटीपुरतेच भाषण, अशा मनुष्याची सहसा थट्टा करणें योग्य होणार नाहीं. थट्टा ज्याची करावयाची त्याची त्या वेळची मनोवृत्ती कशी आहे हें न जाणतां केलेली थट्टा दोघांच्या नाशास कारणीभूत होत असते. जो अगदीं साधा मनुष्य आहे, त्याची थट्टा तर कधीं करूंच नये. आत्मिक वृत्तीचा जो असतो, त्याचे समोर निंदातुल्य भाषण काढूं नये. जेणेंकरून स्नेह संपादन होऊन आनंद वाटेल, निदान कोणाला वाईट वाटणार नाहीं किंवा कोणाचा गैरसमज होणार नाहीं अशा प्रकारें थट्टा अगर विनोद क्वचित् केला असतां चालेल.

आपणांपेक्षां वडील माणसें, शिक्षक, ज्यांचे वर्चस्व समाजांत आहे, अशांची थट्टा, करण्याचें कार्य बिलकूल करूं नये. वरिष्ठानें आपले हाताखालचे लोकांची थट्टा, अपमानित शब्द बोलूं नये मुलांचे समक्ष कोणींही आई बापांची, शिष्यासमक्ष गुरुंची, तसेंच स्त्रीयांदेखत पुरुषांची चेष्टा, थट्टा करूं नये. कारण कीं, या चेष्टेनें अगर थट्टेनें मनुष्याचे मनावरील दाब किंवा भीति जाऊन नीति मर्यादा उल्लंघून अनीतीचे मार्ग करण्यास मनाची प्रवृत्ती अधिक फोंफावली जाते. आजचे कालांत आपण लक्ष दिलें असतां आपलींच मुलें आपणांसंबंधीं कसें वागतात बरें? शाळेंतील विद्यार्थीवर्ग आपले गुरुजींची

तरी मर्यादा ठेवतात कां? स्त्रिया ह्या मर्यादशीलपणानें आपलें घरांत वागतात कां? यांचीं उत्तरें आपलें मनाशींच पटवून घ्यावींत. आतां तर आपलें राज्यांत "घटस्फोट" कायदा झाल्यानें अज्ञान, अशिक्षित समाजांतून काय काय प्रकार बोकाळलेले आहेत, हें आपणां सर्वांच्या नजरेसमोर आहेच! कोणाचा पायपोस कोणांत नाहीं, अशी स्थिति व्यक्ती, कुटुंब, समाज यांत चालूं आहे स्वैर वर्तनानें जो तो वागूं लागला आहे. मर्यादेचीं बंधनें तुटलीं आहेत! याचा परिणाम एकटया दुकटयासच भोगाला येईल असें नसून राष्ट्रास अनीतीचा कलंकच लागेल असें माझें स्पष्ट मत आहे.

शेवटीं मला माझे बांधवांना भगिनींना इतकीच विनंती करणें आहे कीं, ज्यांना, मोठेपणा मिळावा, पुढारी म्हणून गणला जावा, समाजाचे धुरीणत्व आपणांकडे असावें, कीर्ति करून नंतर जगाला रामराम ठोकावा अशा प्रकारच्या इच्छा करणाऱ्यांनीं तर थट्टा, चेष्टा करूंच नये! इतकेंच नव्हें तर इतरांचा द्वेष, मत्सर हीं करतां कामा नये. वरील प्रकारचीं कामें करतांना कोणाचेंही मोहांत, लोभांत गुंतू नये. सहसा कोणासही उणेपणाचे बोल बोलून वर्मी घाव देणें अत्यंत घातक आहे. अनंत फंदीच्या फटक्यांतील ।। दो दिवसांची जाईल सत्ता अपेश माथां घेऊं नको ।। याकडे लक्ष देऊन फारच जपून वागलें पाहिजे.

या संसारांत नवरस आहेत त्यांचा आस्वाद घेणें मानवी जीवांचें कर्तव्य आहे हें मला कबूल असून मान्यही केलें पाहिजे. परस्परांत विनोद करतां करतां इतक्या थराला गोष्टी गेलेल्या आहेत कीं, त्याचे पर्यवसान मारामारी, नुकसान नी विळच्या भोपळच्यासारखें एकमेकांत वैर उत्पन्न होऊन नाश झाल्याची उदाहरणें पुष्कळच आहेत. करितां कोणतीही गोष्ट मर्यादा न सोडली जातां केल्यास हिताचें होईल असें करावें. ज्याचें पासून व्यक्तीचें कुटुंबांचें राज्याचे अनहित होणारें आहे त्याचा त्यागच करावा. इतकें सांगून हा भाग पुरा करूं या !

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण १४ वें

# उच्चार–सत्यता

ता. १७।१।३९

आपण मागील प्रकरणांत आचारसत्यता नी विचार-सत्यता यांचा थोडासा विचार केला. आतां उच्चार म्हणजे आपल्या मुखावाटे शब्द काढणें, बोलणें हें असून त्यांतील खरें-पणा असणें याविषयीं आपण पाहूं या.

जें अगदीं खरें असतें तेंच आपण नेहमीं या व्यवहारांत बोलतो काय ? मला तर असें अनुभवानें सांगतां येईल कीं, मुळींच नाहीं. आपणांपैकीं पुष्कळ जण एकाद्या क्षुल्लक गोष्टी-साठीं सत्य लपवून खोटें बोलणें सोईस्कर वाटत असल्यामुळें

तेणेंकरून आपल्या आत्म्याला केवढें दु:ख देतो याचा विचार न करितां बेधडक खोटें बोलत असतो. हें जणूं काय परिपक्व व्रणच, पथ्याचें अपथ्य, धर्माचा अधर्म करण्यासारखें होय.

असें कां असावें ? आपण कदाचित् असा युक्तिवाद कराल कीं, तो वाद एकाचे तोंडून ऐकिला होता, पण मला वाटतें तो त्यानें आपल्या स्वत:च्या सद्बुद्धील विरोध करून केला होता, नी त्यानें एकंदर सर्व गोष्टींचा पुरता विचार न करतां वादास प्रवृत्त झाला असावा ! जर खोटें बोलून दुसऱ्या कोणाचें नुकसान न होतां माझा स्वत:चा त्यांत फायदा होतो, तर जेणेंकरून तोटा न होतां केवळ हितच होतें असें असत्य भाषण करण्यास मुळींसुद्धां हरकत नाहीं. तेंच करणें खात्रीनें रास्त होईल. मी जर दुसरें कोणास दुखवीत नाहीं, तर स्वत:चीं अब्रु राखण्यासाठीं मीं खोटें कां बोलूं नये ? त्यांत वावगें काय आहे ?

माझे प्रिय बांधवहो ! अशा तऱ्हेचा बुद्धिवाद जर केला असला तर तो आपल्या आत्मविनाशासाठींच केला असें माझें अल्प मत आहे. वरील प्रकारचें असत्य भाषण म्हणजे "आत्मानं अवसादयेत् " या भगवदुक्तिप्रमाणें आपल्या श्रेष्ठतम आत्म्याच्या नाशाला अन्य कोणत्याही गोष्टीपेक्षां अधिकच प्रवृत्त होते. बाह्यत: जरी आपली उन्नती झाल्या-सारखी दिसते तरी अंतर्यामीं खरोखर अवनतीप्रत जात

आहोंत. देवाच्या घरीं थारा न मिळून तुमचें जीवन ऐहिक जगाकरितां केवळ आहे असें होतें व ही लबाडी आत्मनाशक होते. आतां याचा अर्थ तरी काय ? तर आपल्या ठिकाणीं जो दीव्यांश आहे, व जेणेंकरून आपणांस ईश्वराशीं समरसतेचा पवित्र सुखानुभव घेतां येतो, तो इतका व्रणांतिक, व विद्रुप होतो कीं, त्याला मग ईश्वराच्या मूर्तीचें भानच रहात नाहीं. आणि अशा रीतीनें आपली व आपल्या आरोग्यदात्या नी प्राणदात्या ईश्वराची ताटातूट होते. फार काय, तीं आपण-हूनच करितो. सत्य हें ईश्वराचा सत्वांश आहे. द्रव्य, विषय-प्राप्तीच्या लालसेनें किंवा शिक्षा टाळण्याच्या हेतूनें, गुन्हा, अपराध नाकबूल करण्याचें हेतूनें आपण जेव्हां ईश्वरापासून जाणून बुजून पराङमुख होतो, तेव्हां चांगुलपणा टाकून सोबदला वाईट असे विचार, आचार संग्रहानें उच्चार बोलून पापांचें माप पदरांत घेत असतो सत्याच्या पायावरच सत्यतेच्या इमारतीची उभारणी करणें कल्याणकारक होय.

सत्य हें दिव्य आहे, सत्य हाच प्राण आहे, ईश्वरही सत्यच आहे. आपल्या अंतस्थ ज्ञानदीपाची प्रज्वलित ज्योत आपण हून कमी करीत असतो. "सत्यंवद" हेंच आपलें उच्च-तम ब्रीद, कर्तव्यकर्म आपण बाणलें पाहिजे. कडकडीत सत्य-निष्ठेनेंच ईश्वराचें सान्निध्य ठेवतां येतें. श्री रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, श्रीसंत जोग महाराज, श्री मामा दांडेकर महाराज,

महात्मा गांधी श्री लोकमान्य टिळक, श्रीसंत गुंडा महाराज यांचीं उदाहरणें हल्लींच्याही काळांत आपणांसमोर आहेत ? या वरील महात्म्यांचे विचारांत नी आचारांत तसेंच त्यांच्या प्रत्येक उच्चारांत सत्यसेवन दिसते कीं नाहीं ? ह्या लोकांनीं ईश्वराचें सान्निध्य केल्यानेंच ते ललामभूत झाले आहेत. आणि ह्याच ईश्वरी मूर्ती असून त्यांचे जवळ असत्याची छाया देखील नाहीं ! म्हणूनच आपण सर्वजण त्यांचे पायीं नमन करितो, उच्चार श्रवण करितो नी आचरण करण्याचा प्रयत्नही करितो हें आपण नाकबूल करणार नाहीं अशी माझी ठाम खात्री आहे. सत्याचा दिव्य दृष्टीनें विचार म्हणून जें मी म्हणतो तें हेंच होय.

" सत्यान्नास्ति परोधर्मः " एवढा सत्याला आदर आपण कां द्यावा ? याचेंही कारण वरील विचारसरणींत आपणांस सांपडेल. सत्यावर ज्यांची निष्ठा, प्रेम असते त्यांचे परमेश्वरावर प्रेम असून तो त्या स्वरूपांत व परमेश्वर त्याचे रूपांत वावरत असतो.

"यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति" अशी त्यांची वृत्ती होते. असत्य भाषण करणारा त्या प्रभूचे प्रेमास केव्हांही पात्र नाहीं. जर तो म्हणेल कीं, माझें प्रेम आहे, तर तें म्हणणें चित्रगुप्ताचे दरबारीं अग्राह्य म्हणूनच ठरेल ! अलीकडे एकाचे मापानें मोजदाद होते, परंतु प्रत्येकाची किंमत—भाव निरनिराळे

असतात, ईश्वराघरचे माप व त्याची किंमत, तसेंच सत्य, असत्याची मापें व किंमती तेथेंच बरोबर समजतात.

मानवी व सामाजिक दृष्टीनें सत्याच विचार होतो, ह्यांत सहवासी शेजारी यांचा संबंध येतो.

तत्वमीमांसक व नीतिशास्त्रज्ञ असें प्रतिपादन करितात कीं, सत्यावाचून जगाचें चालावयाचें नाहीं, कांहीं झालें तरी सर्व सामाजिक व व्यावहारिक संबंधांत परस्पर सत्यपालनाशिवाय समाजाला एकत्र रहातांच येणार नाहीं. म्हणूनच प्रत्येक सुधारलेल्या देशांत लोकांना आपली वचनें पाळण्यास व आपल्या व्यवहारांत विश्वासूपणा दाखविण्यास भाग पडण्यासाठीं सरकारला कायदे किंवा नियम करावे लागले. उघडपणें दिलेलें वचन मोडलें तर त्याला शिक्षा होते, म्हणून लोक भिऊन वागत असत. आजचा मासला पाहूं लागलीं तर "वचने किं दरिद्रता" असा तमाशा चालू आहे. इतकेंच नव्हें, लेखी असलें तरीं तें खोटें आहे असें न्यायाधिश निकाल देतात. पूर्वीचे लोक वचनबद्ध वागत असत, शब्दांचे पालनकरीत होते. त्यामुळें ते सुखसमृद्धीनें, एकोप्यानें नांदत असत, आज त्याचे अगदीं उलट होऊन आम्ही आमच्या नाशालाच कारण झालों आहोंत, सुखाला, शांतीला इतकेंच नव्हें तर जीवनालाही पारखें होत आहे. कुटुंबांत, समाजांत, राष्ट्रांत, नी व्यक्तींत उच्चारसत्यतेचें उच्चाटनच केलें आहे. असत्याला बहुमत झालें आहे,

सत्याला मूठमाती दिली आहे. हें इतकें सांगण्याचें कारण? स्वत:वर सर्व गोष्टी अनुभवाव्या लागल्या आहेत. "सत्यमेव जयते" असें शेवटीं प्राप्त झालें. पण पैसा व काल यांचा अपव्यय एकतीस वर्षें घालवावा लागला. हा महिमा "कली महात्म्याचा." असो उच्चाराचें प्राधान्य ह्या भूमीतलावर किती आहे, हें वारंवार सांगणें नको. असत्य हें चांगलें नाहीं, आज जरी थोडासा लाभ झाल्याचें दिसलें तरी तें वाईटच ! सत्यापासून आपणांवर अनिष्ट प्रकार ओढवतील हें जरी खरें आहे तरी पमेश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून सत्य भाषण केव्हांही टाकूं नये "जो करील तो भरील" परंतु आपण मात्र उच्चारांचे तसेंच आचारांचे नी विचारांचे महत्त्व मनोमनीं पटवून घेऊन मुखावाटें भाषण केलें पाहिजे. आपण ईश्वराचे सन्निध राहून स्वबांधवांचेही कल्याण करतां येईल !

सत्य हें परमेश्वराच्या आनंदाचें कारण आहे. हें पहा, सरळ रस्त्यावर कोणी वाट चुकला असें आपल्या पाहण्यांत आहे काय ? याचें उत्तर नाहीं असेंच आपण द्याल. आपला वैदिक धर्म किती श्रेष्ठ तत्त्वांनीं भरलेला आहे ? तसेंच ह्या धर्माची महति परकीयांनीं गाऊन त्यांतील रहस्यें अंगीकृत केलीं आहेत ! आणि आपण मात्र तीं तत्त्वें जाणून घेण्याचें टाळून, आचार, विचार, उच्चार यांचें सातत्याबाबत सोडूनच दिलेलें आहे. अशा वागण्यानें, विचारानें नी उच्चारानें आम्ही

आमचेंच नुकसान करीत आहोंत ! नव्हें तर पुढील पिढीचेंही नुकसानीस आपणच जबाबदार आहोंत. धर्मांत, शास्त्रांत ज्या वाईट गोष्टी सुचविल्या त्याचें अनुकरण तेव्हांच घेतां यतें, परंतु चांगल्या गोष्टींचें अनुकरण होण्यास अवधी लागतो याकरतां आपणहून सत्यसेवन मार्ग धरिला पाहिजे. आपल्या देशांत अशा सत्याचरणाचे वीर पुरुष नाहीं कां होऊन गेले ? आपण सत्सं-गानें वागा, विचारपूर्वक गोष्टींचा उच्चार करीत जा, धर्म नी शास्त्र यांच्या आज्ञेप्रमाणें वर्तनक्रम ठेवा, दुसऱ्यावर दोष लांदू नका. जगांतील इतर सर्व वस्तूंचा जरी विनाश झाला तरी सत्य हें अनंताप्रमाणें अनंत, अविनाशी रहाणारच यांत शंका बाळगूं नये.

आदेश हा धर्म शास्त्र यांचा ॥
हा आमुचा वा, उपदेश साचा ॥
हें सर्व वेदांतील सार आहे ॥
हीं ईश्वराज्ञा सकलांसि आहे ॥

॥ ॐ तत्सत् ॥

## प्रकरण १५ वें

# आपला रत्नहार–आर्यतत्त्वें

ता. १९।१।३९

( १ ) धर्म:– ईश्वराच्या आज्ञा, किंवा वचनें, नियम, बरोबर पालन करण्यास सांगणारा, पक्षपातरहित, ज्यांत सर्वांचें हित आहे, जो प्रत्यक्षादि प्रमाणांनीं सिद्ध, वेदोक्त, सर्वांनीं ग्रहण करण्यास योग्य त्याला धर्म म्हणतात.

( २ ) अधर्म:– वरील कलमाचे विरुद्ध आचरण असणें किंवा ठेवणारा, यांसच अधर्म म्हणतात.

( ३ ) पुण्य:– विद्यादि शुभ गुणांचें दान करविणारें, सत्य असें भाषण, सत्याचरणादि करविणारें त्याला पुण्य म्हणतात.

( ४ ) पाप:– अविद्यादि अशुभ गुण वाढविणारें, असत्यादि भाषणें आणि आचारादि कर्में याला पाप म्हणतात.

( ५ ) सत्य भाषण:– जें आत्म्यांत स्फुरण पाऊन वैखरीचे मार्गानें शब्दोच्चार होतो तें.

( ६ ) असत्य भाषण:– सत्याच्या उलट अर्थात असंभवादि दोषांनीं भरलेलें असतें तें जाणावें.

( ७ ) विश्वास:– ज्याचा मूळ अर्थ फळ हीं सत्यच आहेत, त्यास विश्वास म्हणतात.

( ८ ) अविश्वास:– सत्याचे विश्वासाला लाथाडून जी कृति असणें किंवा करणें तो अविश्वास होय.

( ९ ) परलोक:- ज्यांत धर्मशास्त्राधारें, सद्विद्येनें व सदाचरणानें परमेश्वरप्राप्ती होऊन जीवात्मा या जन्मीं अगर पुढील जन्मांत सुखास कारण तो परलोक होय.

(१०) अपरलोक:- ज्यांत विषेशेंकरून दु:खच, हानी, इत्यादि प्रकारें भोग भोगणें प्राप्त होते तो अपरलोक होय.

(११) जन्म:- कोणत्याही शरीराशीं मिसळून जीव हा कर्मे करण्यास समर्थ होतो. ( अर्थात वासनेमुळें ) त्यास जन्म म्हणतात.

(१२) मृत्यू:- ज्या ज्या शरीराला धारण करून जीव क्रिया करतो आणि त्याचा कोणत्याही काळीं जो जीवाचा वियोग त्यास मरण–मृत्यू म्हणतात.

(१३) स्वर्ग:- विशेष सुखाचा किंवा त्याच्या साहित्यांचा जेथें अवश्य लाभ मिळून भोग भोगतों तो स्वर्ग होय.

(१४) नरक:- ज्यांत विशेंषेकरून दु:खच किंवा त्याच्या साहित्यांचा लाभ त्यास नरक म्हणतात.

(१५) विद्या:- जी जड चैतन्याचे यथार्थ विज्ञान करून देणारी, यथायोग्य उपकार करविणारी ती विद्या होय.

(१६) अविद्या:- जी भ्रम, अज्ञान, असत्यालाच सत्य समजून क्रिया करविते ती अविद्या होय.

(१७) सत्पुरुष:- जो सत्यप्रिय, धर्मात्मा, विद्वान, सर्वांचे हिताहित जाणणारा किंवा त्याचे मार्गदर्शन करणारा तो,

(१८) सत्संग:- ज्याच्यापासून सत्याचा लाभ होऊन असत्याचा नाश होऊन ज्ञान-विज्ञान प्राप्त होतें तो सत्संग जाणावा.

(१९) कुसंग:- ज्यांचेपासून जीव पापाचरणाकडे, भ्रमानें, वृत्ती धारण करून अनेकविध अशीं कार्यें करतो तो.

(२०) तीर्थ:- विद्याभ्यास, सत्संग, ब्रह्मचर्य, जितेंद्रि- यांदि जीं सत्कर्में तीं सर्वच तीर्थें, या तीर्थांत नित्य स्नान केल्यानें, जीव हा अज्ञानानें, भ्रमानें गोंधळून गेल्यामुळें तो वरील स्नानानें पवित्र होऊन ब्रह्मलीन होतो.

(२१) स्तुती:- परमात्मा किंवा दुसऱ्या पदार्थादिकांचा गुण व ज्ञानादिकांचें यथार्थ वर्णन किंवा श्रवण करणें ती स्तुती होय.

(२२) निंदा:- खोटें ज्ञान, चांगल्यास दोष लावणें, असत्याचें ठायीं प्रीति, गुणांच्या जागीं अवगुण लावणें ही निन्दा होय.

(२३) प्रार्थना:- आपल्या उत्तम कर्मांच्या सिद्धीसाठीं परमेश्वर किंवा सामर्थ्यवान् अवतारिक देवता यांचें सहाय्य मागणें.

(२४) ईश्वर:- ज्याचे गुण, स्वभाव, कर्में, स्वरूप हीं सत्य आहे, जो केवळ चैतन्यस्वरूप, एक, अद्वितीय, शक्तिमान, सर्वव्यापी, अनादि, अनंत इत्यादि ज्याचे गुण, अविनाशी

ज्ञानी, आनंदी, शुद्ध इत्यादि असा जो त्यास ईश्वर म्हणतात.

आतां आपण खऱ्या शांतीचा अधिकारी कोण? याचा विचार करूं!

आपण ह्या संसारांत पडल्यापासून जीवाचे हाडांची काडें करून रात्रंदिवस ढोर मेहनत करूनही सुख-शांती-समाधान प्राप्त होत नाहीं, हा दररोजचा अनुभव येतोच! पुरोठीं असें कां पडत नाहीं? असेल त्यांत चित्ताचें समाधान कां लाभूं नये, असे विचार हरघडीं येतात. आपण देव, धर्म, कर्म, कुलाचार इत्यादि करूनही नशिबाची पावलें पुढेंच! मनासारख्या गोष्टी घडतच नाहीं? काय हा प्रारब्धाचा खेळ? कर्माचा फुटकाच! असे विचार घोळत असतात. असो दोष देण्यांत अर्थ नाहीं, तर तें निवारण होणेंसाठीं कर्तव्यकर्में काय काय केलीं पाहिजेत, चूक कोठें होतें ती सांपडून काढून सत्कर्में कशीं नी कशानें प्राप्त होऊन जीवाची भगभग शांत होईल तें विचारानें सोडवूं!

आपण पुष्कळ यत्न प्रयत्न करितों, तीर्थें स्नानें, व्रत, वैकल्यें करितो, साधू महात्मे यांचें दर्शन घेतो, उपदेश श्रवण, प्रवचनें, कथा, कीर्तनें ऐकतों. परंतु आपण सत्याचें सेवन करीत नाहीं, म्हणून आपणांस शांती कधीं प्राप्त होणार नाहीं.

शांती ही बाह्य वस्तूंत कोठेंही नाहीं, धनांत नाहीं, ऐश्वर्यांत नाहीं, मनांत नाहीं, राजशाहींत नाहीं, उच्च शिक्ष-

णांत नाहीं तर ती आपल्या शरीरांतच असून आपलें मन स्थिर होईल तेव्हांच अनुभवाला येईल ! मन–बुद्धीचे ठिकाणीं तसेंच आचार–विचारांचे ठिकाणीं पवित्रता आल्यावांचून शांतीचे माहेरघर सांपडणार नाहीं.

मन–बुद्धीच्या पावित्र्याचें रामबाण साधन म्हणजेच सत्य-सेवन होय. सत्यांकुशानें मस्त असा मनरुपीं हत्ती वश होतो. याकरितां कोणत्याही स्थितींत सत्याचा त्याग करूं नये. सर्व व्यवहारांत सत्य असा वर्तनक्रम असावा. आणि मन, बुद्धी, कर्म यांसह सत्याचें सेवन झालें पाहिजे. लोभानें, मोहानें, कामानें, भयानें, खुषामतीनें कारस्थानानें, भेदीपणानें सत्याचा नाश करूं नये. सत्यापेक्षां कोणचाही मार्ग श्रेष्ठ नाहीं, सर्व धर्मांचें मुख्य सार तरी हेंच आहे. जे जे पुरुष या जगांत माना-पमान होवो, कष्ट पडो, प्राण जावो, परंतु स्वत:हून तें सत्य-व्रतापासून ढळत नाहीं अशीं उ. मागें ऐकलेलीं आहेत ना ? असें ज्यांचें आचरण, ते धन्य होत. आणि तेच खऱ्या शांतीचे अधिकारी आहेत. चालू उदाहरणें श्री. विनोबा भावे, श्री. पंडीत जवाहरलाल यांचें चारित्र्य आपणांस काय शिकवितें? तें आपण लक्षांत घेऊन आचार, विचार, उच्चार यांचें सत्य-सेवन करणें हिताचें होत आहे. या लेखाचा संबंध मागील तीन प्रकरणांशीं असल्यानें तो येथें दिला असून वाचकवर्ग गोड करून घेतील अशी आशा आहे. जसें ओकारी झाल्या शिवाय

पोटांतील मळमळ जात नाहीं ! तद्वत् झालें आहे. यांत स्वतःचा शहाणपणा दाखविण्यासाठीं नसून जें जें दृश्य अनुभवानें पुढें पुढें आलें तेंच दर्शित केलें.

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण १६ वें

# तळमळ असणें

ता. २०।१।३९

आतांपावेतों पुष्कळ गोष्टींचा विचार मागील प्रकरणांत केला असून शक्य तितक्या गोष्टी आपण आचरणांत आणण्याचें ठरविलें, नव्हें तर त्या आणतही आहांत अशी माझी समजूत आहे.

आपण आज ज्या विषयाचे विवेचन करणार तो विषय सर्वांचे परिचयाचाच आहे. परंतु तो विषय किंवा शब्द नुसता परिचारक होऊन कोणाचें हित झालें बरें ? तथापि तो विषय श्रवणानें, मननानें, ध्यासानें, प्रयत्नानें, निश्चयानें, निष्ठेनें व तळमळीनें, आपण वाढवावयास नको काय? एक वाक्य आहे. " नेहमीं आपण आपली शिकस्त करीत असावी " ह्या लहानशा वाक्यांत जनतेच्या अप्रतिम जीवनदशेला आवश्यक अशा गोष्टी सूत्ररूपानें समाविष्ट केलेल्या आहेत. स्वबलानुरुप आपापल्या मगदुराप्रमाणें आपलें आरोग्य, सौख्य, सुशीलता,

सुस्थिति आणि आपल्या शेजाऱ्यांविषयींची, ईश्वरासंबंधींची आपल्या कर्तव्यकर्माची कीर्तिकर सिद्धी या सर्वांना हितकर होणाऱ्या सर्व गोष्टी ह्या एका वाक्यांत एकत्रिक झालेल्या आहेत.

आपली पराकाष्ठा करणें याचा अर्थ, चांगल्या गोष्टी यथाशक्ति उत्तम रीतीनें करणें होय. वाईट गोष्टी परमोच्च ध्येय असें कधींही होत नाहीं. चांगल्या गोष्टी म्हणजे काया-वाचा-मनें करून उत्साहानें, उत्कंठेनें. दीर्घोद्योगानें अचल भक्तीनें, प्रेमानें, ईश्वर साक्षीत्वानें नी ईश्वरार्पण बुद्धीनें करणें होय. ज्यांच्याकडून मोठमोठालीं कार्येंही होतात व जो काम नीट-नेटकें करतो त्याचे हांतून फारच कामगिरी पार पडतें.

कोणतेंही काम प्रेमपूर्वक मन घालून न करतां नुसतें वरवर केल्यास त्यापासून फायदा होत नाहीं. उद्योग तडीस जाणेंस दोन प्रकारचें प्रेम उद्भवत असतें. (१) एकतर उद्योगाची आवड असावी लागते. (२) ईश्वरावर पूर्ण श्रद्धा-भक्ति असते. ह्या दोन कारणांच्या संयोगामुळेंही तें प्रेम उद्भवणेंचा संभव असतो, तसें झालें तर तें प्रेम अति उदात्त असतें.

आपणांस एकादें कार्य करण्यास आनंद वाटतो म्हणून ज्या प्रेमानें तें आपण चांगल्या रीतीनें करीत असतो त्याला अभिरुचि असें म्हणतात.

आतां अभिरुचि अथवा आवड म्हणजे काय? तर तें एक प्रकारचें स्वाभाविक प्रेम असतें ही आवड कांहीं अंशीं अनुवंशिक असते. कांहीं परिस्थितीच्या अधीनतेमुळें सामर्थ्यामुळें, विकास पावलेली असते. परिस्थितीच्या सामर्थ्यामुळें एकाच प्रकारच्या व्यासंगाकडे मनुष्याची प्रवृत्ती होते, हा प्रकार जगांत, लोकांत, राष्ट्रांत, प्रत्येक युगांत नी संसाराच्या प्रत्येक अवस्थेंत आपल्या दृष्टीस पडतो.

प्रत्येक मनुष्यास प्रत्येक विषयाची त्याच्या अनुवंशिक संस्कारामुळें आवड मुळांतच जडलेली असते, आणि तीच त्याचा छंद होऊन उत्तम असें कार्य अनुभवास येतें. याला कारण काय? तर त्या विषयासंबंधीं अभिरुचि, आवड व त्याबद्दल त्यास लागलेली तळमळ ही होय. अशा प्रकारें लागलेली उत्कंठा, उदात्त विचार हीच त्याच्या उत्कर्षास कारण होतात.

सर्व प्रकारची अभिरुचि अगर आवड आपापल्या परीनें चांगलीच असते, परंतु ती पूर्णांशानें वाढवण्याचें कामास बुद्धी, विचार, सत्संग, ज्या त्या कामांत तरबेज असे जाणते लोक आणि तळमळ यांजकडे देऊन करणें अत्यंत श्रेयस्कर असते. बुद्धिमान् माणसाच्या अंगचें सामर्थ्य म्हणजे चित्ताच्या एकाग्रतेवांचून, नी त्यासंबंधीं परिश्रम केल्याशिवाय अगर सवयीवांचून अन्य अधिक त्यांत कांहीं नसतें. उदाहरणार्थ, वृक्ष, वेली, लहान रोपटें, सुवासिक फुलांचीं झाडें, तसेंच आपणांस आवडते

पशू, पक्षी यांचे लहान बच्चे आणून त्यांस खाणें पिणें देऊन तसेंच शिक्षण देऊन त्यांची वाढ करितोंच कीं नाहीं? तद्वत् परमेश्वरानें आपणांजवळ इतर जीवयोनीपेक्षांही अधिक असें बौद्धिक भांडवल स्वतंत्रतेनें दिलेलें असून त्याचा जर आपण आपले आवडीप्रमाणें उपयोग करून घेतला नाहीं, तर त्याचा दोष आपणांवरच येत नाहीं काय?

आपल्या स्वाभाविक अभिरुचीमुळें आपलें कर्तव्यकर्म करण्याकडे ज्याची प्रवृत्ती होते तो मनुष्य खरोखर सुखी होय. परंतु पूर्णार्थानें याचा विचार करूं लागलों तर हा प्रकार सुद्धां क्वचित् दृष्टीस पडतो. मुलांच्या नी तरुणांच्या शारीरिक प्रवृत्ती फार बलवत्तर असतात, या प्रवृत्तींचा व शरीरांना जेथें आपापलीं कामें करावयाचीं असतात अशा भौतिक जगाचा म्हणजे जडसृष्टीचा कल पारमार्थिक विचार आपलें मनांत न येऊं देण्याकडे व अत्युच्च असें जें कर्तव्य तें आपल्या दृष्टीआड करण्याकडेच असतो. म्हणून आपणांस जागे होण्याविषयीं जी आवश्यकता असते ती येवढ्यासाठींच होय. आपलें अखिल कर्तव्यकर्म, आपली सारी इतिकर्तव्यता इहलोकींच आहे, असें नव्हें. खेळ, विहार, व्यायाम, हें स्वत: चांगले जरी आहेत तरी एवढ्यानें आपलें सारें कर्तव्य संपलें असें होत नाहीं! शारीरिक बल व त्याबरोबर मानसिक बल आपलें जीवनांत महत्त्वाचें आहे. त्यांची वाढ केलीच पाहिजे. "शरीर रक्षतो

धर्मः" असें म्हटलें तें अगदीं बरोबर आहे. शरीर जर आपण दुर्बल केलें तर धर्म राखतां येणार नाहीं, अर्थही मिळवितां येणार नाहीं, इतकेंच नव्हें तर मोक्ष किंवा परमार्थप्राप्ती ती तर मिळणेंच कठीण होय! शारीरिक भोगतृष्णेंत स्वार्थ-लोलुपतेनें निमग्न राहून तर होतच नाहीं. शारीरिक बलाचा उपयोग वैषयिक भोगाकडे सहसा करूं नये. शारीरिक मानसिक बल नी धैर्य वृद्धिगत होत असतें! करितां शरीर-बल कमजोर होऊं देऊं नये.

आतां ज्ञान ज्ञान, म्हणून हा जरी एक कर्तव्याचा भाग आहे, तरी केवळ ज्ञानाच्या पाठीमागें लागून अखिल कर्तव्य होत नाहीं, तर उलट ज्या कर्तव्यनिष्ठेला आपण उत्सुकता, अतिश्रम, अतिश्रद्धा असें म्हणतो, त्या कर्तव्यप्रेमानें ज्यांत मानव जातीवरील व मानवी जगांतील यच्चयावत् चांगल्या गोष्टींवरील प्रेमाचा अंतर्भाव होतो, अशा ईश्वरविषयक प्रेमानें प्रेरित होऊन ह्या वरील साऱ्या गोष्टींच्या एकत्रिक संयोगाला संस्कृतता आणण्यांत व एक पूर्ण समग्र भाग असें मानण्यांत कांहींसें आपलें सारें कर्तव्य येतें.

माझें विश्वबंधूंनो! जेणेंकरून साऱ्या यातना, अडचणी क्षुल्लक जरी वाटत असल्या तरीपण उत्कंठापूर्ण निष्ठेच्या सामर्थ्याची आठवण करून देणें भाग पडते, ती म्हणजे ईश्व-राचे इच्छेप्रमाणें वागणें. देवाच्या इच्छेनें वर्तावें । देव करील

तें मानावें ।। या श्री दासबोधांतील वाक्यानें मनांत जागृती झाली म्हणजे, कोणतीही गोष्ट दुष्कर किंवा अप्रिय वाटणार नाहीं. हें आपण लक्षांत ठेऊं या कीं, सर्वच गोष्टी ईश्वरावरील प्रेमासाठीं घडून येतात. जी गोष्ट ईश्वरभक्तीनें होते ती चांगलीच होते. मला असें सांगावयाचें कीं, जी गोष्ट करूं त्या गोष्टींत ईश्वरासंबंधीं विचार व्हावा ! हा विचार करीत असतां आपल्या मनांत कर्तव्याची तळमळ, कळकळ, जिव्हाळा, एकाग्रता असूं देणें अत्यंत जरुरीचें आहे आपणांपुढें आलेले कर्तव्यकर्म उत्तम प्रकारें करण्यास आपण आपली शिकस्त किंवा पराकाष्ठा करावी.

मला आपणांस असें कळकळीनें बजावून सांगणें आहे कीं, जें काम अथवा कर्तव्यकर्म नी त्याची परिस्थिती या गोष्टींचा आजच विचार करून तें करण्यास उद्यांवर टाकतां कामा नये. कारण असलेलें कार्य व आलेली वेळां फिरून फिरून तीच येत नसते ! मागील प्रकरणांत " वेळेचें महत्त्व " किती हें सांगितलेलें आहेच ! " काळ जातो क्षणाक्षणा। मूळ येतें मृत्यूला " याप्रमाणें आपला आयु:क्रम जात आहे. करितां आपण वेळेचें महत्त्व जाणून कार्यांत नेहमीं तत्पर असावें. हें काम करणें अर्थांत सुकर नाहीं, इतर गोष्टींप्रमाणें उत्कंठा आणि उत्सुकता यांची मनाचे ठिकाणीं पूर्ण वाढ व सामर्थ्य एकाकीं दृग्गोचर होत नाहीं. तरी पण आपण प्रयत्न न सोडतां

पराकाष्ठा करावीच ! मनापासून तळमळ असणें हेंच पराकाष्ठेचें प्रतीक होय. प्रारंभ करण्याचें अगोदर ईश्वराचें सहाय्य मागा, ईश्वराचे मदतीवांचून व्यावहारिक किंवा पारमार्थीक हातीं घेतलेलें कार्य केव्हांही तडीस जाऊन यश मिळणें कठीण होईल ! परंतु त्याचें सहाय्य असल्यावर नी सान्निध्य व उपासना आपणांजवळ असल्यावर अशक्य असें कांहींच आपणांस वाटणार नाहीं. जर खरोखर आपला प्रयत्न मनापासून असेल तर मिळालेल्या ईश्वरी मदतीबाबत आश्चर्य कराल ? आणि ह्या भरांत तुमचीं उत्कंठा–उत्सुकता झपाट्यानें वाढीसच लागेल ! आणि परमात्मज्योती ही प्रतिबिंबाप्रमाणें आपल्या हृदयांत प्रदीप्त अशी दिसूं लागेल ! संसारांतील हरएक बारीक सारीक गोष्टीसुद्धां ह्या प्रेमज्योतीनें, सान्निध्यानें भक्तीनें कर्तव्यकर्मांत ईश्वराचे सहाय्याबाबत अत्यंत यशदायक होणेंसाठीं असलेली तळमळ इत्यादिकांनीं आपलें अंतःकरण पूर्ण प्रकाशित होईल. अशा प्रकाशितपणें रमणीयता प्राप्त झालेलें प्रत्येक कर्तव्यकर्म आपलें हातून मोठ्या उत्कंठेनें घडेल व तें चांगलेंही होईल.

आतां आपण सर्वसामान्य विचाराकडे वळूं ! स्वार्थपर लालसेनें किंवा निव्वळ संसारिक हिताचे दृष्टीनें आपण व्यापार, भौतिक शास्त्र, कला, शेती, नौकरी इत्यादि व्यासंगाला वाहून घेणाऱ्या लोकांना, किती चांगलें यश येत असतें!

हें पाहून खरोखरच आपणांस नवलच वाटतें नाहीं कां ? ज्या अति प्रेमानें तळमळीनें, मनुष्य प्रत्येक गोष्ट, विषय, उद्योग, कार्य, नी अभ्यास आपल्यासाठीं तर करतोंच पण केलेलें कार्यादि अभ्यास व विषय अत्यंत ईश्वरापर्ण बुद्धीनेंच करीत असतो, त्याशिवाय त्याला यशप्राप्ती नसतेच ! भलें स्वार्थी कां असेना, संसारिक, लोभ, मोहानें कां होईना, परंतु तो ईश्वरास आळवून, स्मरण ठेवून करीत असतो हें खरें आहे.

त्या पवित्र उत्सुकतेनें प्रेरित होऊन इहलोकच्या व्यासंगांत नी व्यवसायांत पडणाऱ्या लोकांना यश मिळाल्याचें आढळून येतें. जें जें कर्तव्यकर्म आपले वाट्यास आलें, तें तें उत्तम रीतीनें करणें व त्याचा उपयोग आपले बांधवांनाही मिळवून देण्यांत ईश्वरी सेवा होतच असते ! परंतु अलीकडच्या कांहीं वर्षांत सत्यसेवन नी प्रामाणिकपणा यांना वांकड्या अंगुठ्यानें पाणी सोडण्याचें काम चाललें आहे ही गोष्ट अत्यंत त्राशास आज ना उद्यां कारण होत आहे. यांकडे राज्यकर्त्यांनी वेळींच लगाम घालून एकसूत्रीपणा आणणें जरूरीचें होय.

आपल्या स्वाभाविक अनिच्छेला, मानवी अप्रीतीला दूर सारणेंस, आपली बुद्धी व मन नी सामर्थ्य हीं दुर्बल आहेत असें कदाचित् वाटेल ! तर आपण ह्या वेळीं नव्हें अगोदरपासून ईश्वराचें सहाय्य मागा. आपलें ठिकाणीं अभिनिवेश असेल,

प्रयत्न अंतःकरणापासून असेल तर, त्याची मदत खात्रीनें मिळालीच पाहिजे.

निष्काळजीपणा, आळस, कर्तव्यकर्मांत येऊं देणें अनिष्ट आहे. आपले ठिकाणीं कार्यक्षमता, तरतरीतपणा नी चपलता हे गुण असूं द्यावे. कोणत्याही व्यासंगांत, व्यवहारांत सौजन्य-पूर्वक आचरण असावें. आपले बांधवास मदत करण्याचा प्रसंग किंवा संधीचा उपयोग करून घ्यावा बौद्धिक अगर इतर शिक्षणांपेक्षां मानसिक शिक्षण उच्चतर आहे. शरीरापेक्षां मन श्रेष्ठतम आहे. कारण शरीर हें इहलोकचें म्हणजे नश्वर आहे, मन हें अमर आत्म्याचा अंश आहे. असें सर्व ग्रंथांतून नी श्रेष्ठ-तर पुरुषांकडून सांगण्यांत येत असतें. म्हणून मानसिक शिक्षण हें दिव्यतर आहे. करितां ईश्वरावर किंवा त्याचे शक्तीवर पूर्ण भंरवसा ठेवून त्याची मदत मागावी. आणि आपलें कर्तव्य-कर्माबाबत शिकस्त अगर पराकाष्ठा करावी. याचीं उदाहरणें पुष्कळच आहेत, सन १८८५ मध्यें काँग्रेस स्थापन झाल्यापासून किती अडचणी, त्रास, छळ, द्रव्य खर्ची पडलें असेल बरें? आणि आतांही भारत स्वतंत्र झाल्यानंतर किती अडचणी, पर-देशच्या तसेंच भारतांतूनही होत आहेत! पण महात्मागांधी, श्री. पंडीत जवाहरलाल नेहरु डगमगले नाहींत! भारताचे राज्य टिकवण्यासाठीं सर्व पुढारी लोकांची पराकाष्ठा चालू आहेच ना? करितां कर्तव्यकर्मांत निराश न होतां तें कार्य

डा. ९९४८९

सोडून देण्याचें करूं नये. वारंवार कळकळीनें सुचवितों कीं, ईश्वरी सहाय्य घेण्याचें टाळूं नका, तें घेण्याकरितां, सत्यसेवन, ईश्वरावरील श्रद्धा, त्याची उपासना इ. केल्याशिवाय कधींही राहूं नका !

" उद्धरेदात्मनाऽऽत्मानं " हें भगवंताचें वचन लक्षांत ठेवून आपला आचरणादि कर्तव्यकर्मांचा मार्ग हितकर होय. चातकाला जर मेघोदक पाहिजे तर त्यानें आपलें तोंड उघडलें पाहिजेत ! एरव्हीं तें उदक प्राप्त होणें शक्य नाहीं.

आतांपर्यंत बहुतेक विवेचन अल्पमतीनें करण्यांत आलें, तें म्हणजे शारीरिक बल, मनोबल नी त्यांचेविषयीं शिक्षण ह्या सर्व गोष्टींचा विचार झाला. तसेंच अमर आत्म्यासंबंधीं विचार नी आचार हें सर्वांत महत्त्वाचें आहे. कारण सर्व कालीं आपला संबंध पोंचणाऱ्या अशा ह्याच गोष्टी आहेत. मानसिक किंवा शारीरिक अशा इतर गोष्टींच्या मुळाशीं त्यांचा संबंध असतो. यांचा इहलोकींच केवळ संबंध होतो असें नव्हें, तर त्या नित्य आहेतच. अशा पारमार्थिक बाबतींत आपण मनःपूर्वक प्रयत्न करावा यांत संशय नाहीं. आश्चर्य हें कीं, ऐहिक असार संसारांत किंवा व्यवहारांत, धंद्यांत, ममत्वांत गुरफटून गेल्यामुळें डोळे दिपून जाऊन " महाप्राणसत्य " आपल्या सहज दृष्टीआड आपणहून करतों, म्हणून आपलें हातून जीं जीं कर्में घडतील त्या सर्व प्रसंगीं परमेश्वराचें हृद-

यांत स्मरण ठेवणें ही मुख्य तळमळ, उत्कंठा अवश्य बाळगिली पाहिजे. आणि मग कोणतेंही कार्य आपलेकडून चांगलें व तळमळीनेंच घडेल व तें ईश्वरार्पण बुद्धीनें घडेल. कोणतेंही कार्य करितांना सारें लक्ष, तन, मन, धनानें अर्पण करून केल्यास त्यांत यश:प्राप्ती आलीच पाहिजे. म्हणून आपण आपलाच उद्धार करून घेत असतो. जसें आपणांस भूक लागली तर आपणच जेवण करावयास पाहिजे ! तेव्हांच भूक शांत होऊन शरीराचे ठायीं तृप्ती होते. दुसरें असें कीं "बोलाचाच भात बोलाचीच कढी । जेऊनियां कोण तृप्त झाला ।। " अशा प्रकारें आचारविचारांचें वागणें नको ! एकाच वेळीं अनेक गोष्टी करतां येत नाहींत, म्हणून वेळेला जें काम करणें प्राप्त होईल जें कर्तव्यकर्म पुढें येईल तेंच एकटें तन–मन–धनेंकरून करावे. हें बघा ! गेलेली वेळा पुन्हां येत नाहीं ! गेलेलें आयुष्य परत लाभत नाहीं! मृत्यूचे मुखांत गेलेला नरदेह परत प्राप्त होत नाहीं ! या सर्व गोष्टींचा विचार हृदयाच्या ठिकाणीं ठेवून कार्य तत्परतेनें करणें श्रेयस्कर होय. आज उद्यांचा भरवसा धरणें योग्य होणार नाहीं. प्रत्येक क्षणाला मनाचा कल कमी, उत्कंठा कमी, कर्तव्यही कमीच, अशा रीतीनें वेळ निघून जातो, महिने, वर्षेंही जातात, अखेरीस मृत्यूचें बोलावणें येऊन आयुष्याचें सारें नाटक कायमचें बंद पडतें !

इहलोकीं हरएक चांगल्या व पवित्र कार्यांचें खरें मर्म, रहस्य, कर्तव्यकर्मांच्या उत्कंठेंत, तळमळीतच होय. कारण तळमळीवांचून कोणतेंच कार्य चांगलें घडत नाहीं. आणि हें चांगलें घडावें म्हणूनच ईश्वरी कृपा संपादणें जरुरीचें असून, त्यानें जें जें धर्मशास्त्र, वचनें, नियम दाखवून दिलेले आहेत त्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. त्याची कृपा होणेंकरितां उपासना, कर्म, श्रद्धा ठेवून ती कृपा होईपावेतों अंतःकरणांत तळमळ सतत दिव्याच्या ज्योतीप्रमाणें राखणें हें आपलें मुख्य कर्तव्य होय.

आपण इहलोकीं ईश्वराची सेवा करून आपली संसारयात्रा सुखानें घालविली या आठवणीनें आपणांस धन्यता वाटेल! परिश्रम, कष्ट, जनताजनार्दनाची सेवा ह्यांतच परमेश्वर प्रार्थनेचें रहस्य सांठविलेलें आहे, हें कधींही विसरून जाऊं नये.

एका कवीचे उद्‌गार आहेत तें पाहून वागूं या !

स्वप्नापरी मनुज जीवित हें असार ।।
ऐसा विलापपर सांगु नको विचार ।।
नाहीं पहा मनुज जीवित हें असार ।।
ऐसें कितीक वदले बुध थोर थोर ।।

ह्या प्रकरणांतील लिखाण आपणा बांधवांना अगदीं कंटाळवाणें झालेलें असेल नाहीं कां ? परंतु यांतील दोषांची क्षमा मागून हा भाग संपवितो.

।। ॐ तत्सत् ।।

वाचकांना विनंति :-

बुधहो मी नसे शास्त्री पंडीत ।।
मम नसे जरी वेद वेदांग ।।
परी अनुभवें असे व्यासंग ।।
तरी ज्ञान ठेवोंत अंतरंगांत ।। (१)

जयाचें मनीं धर्म शास्त्रादि ढळेना ।।
तयाचें मनीं वर्णाश्रमो तो टळेना ।।
असा जो दिसे सुष्टं तो आचार श्रेष्ठ ।।
म्हणुनि तया प्राप्तचि गा मोक्ष स्पष्ट ।। (२)

## प्रकरण १७ वें

# पवित्रता

ता. २५ ते ३०।१।३६

आतां आपण पवित्रता म्हणजे काय यासंबंधीं विचार करूं ! या विषयांवर लिहिणें अगर बोलणें सोपें नाहीं; हा विषयच इतका नाजूक आहे कीं, त्याचे बाबत उघडपणें बोलतां येणें म्हणजे अग्नीवरून चालत जाणें होय. परंतु जेथें आपल्या डोळ्यांचा, कानांचा, तोंडाचा उपयोग आपल्या कल्याणाकडे होईल असें दिसेल, तेथें तो अवश्य केलाहि

पाहिजे. मला वाटतें, निदान आजच्या प्रसंगीं तरी या विषयाचा वरपांगी अथवा निष्काळजीपणानें विचार न करितां कळकळीनें व मनाला लागून राहील अशा रीतीनें विचार केल्यास आपलें कांहींएक नुकसान होणार नाहीं. कारण कीं, जेव्हां त्याच्याविषयीं आपण विचार करतों, तेव्हां आपल्यांत जे अत्यंत निष्काळजीपणानें वागणारे असतात; त्यांची मनें दु:खानें भरून आल्याशिवाय रहात नाहींत. म्हणून आपल्यापैकींच नी आपल्याप्रमाणें मनोविकार व वासना असणारा मी एक आहे असें समजून पवित्रता ही किती आनंददायक असते व ती नसणारांचें ठायीं पाप किती भयंकर असतें याचा विचार आपण माझ्या बरोबर करावा; असें मी आपणाला अत्यंत प्रेमानें सुचवितों. अपवित्रतेचें पाप भयंकर असूनही साऱ्या जगांत हें पाप आजवर होत आलें आहे व आजच्या पिढीला तें सामान्यत: दृष्टीस पडत आहे. ही किती खेदाची गोष्ट आहे या शुभ विचारांनीं तरी आपली दिशा सुधारून पावित्र्याचें तेज अधिक वाढावें एवढेंच परमपवित्र परमेश्वराजवळ मागणें आहे.

आपल्यापैकींच प्रत्येकाच्या आयुष्यांत असा एक काळ येतो कीं, त्यावेळीं आपल्या ठिकाणीं वसत असणाऱ्या वासनांची जाणीव आपल्या मनामध्यें उत्पन्न होते व त्या वासना जर आपण विवेकानें आंवरून धरल्या नाहींत; तर आपलें पाऊल

वांकडें पडून पापाचरणाकडे आपली मनोवृत्ती खास होईल. हें कळण्याइतकें आपण प्रौढ आहोंत. तो काळ म्हटला म्हणजे तारुण्यावस्था असून ऐन भरांत मनुष्याला जेव्हां प्रथमच मनुष्यपणा प्राप्त होतो तेव्हांचा होय. शरीराच्या स्वाभाविक वासना होत. त्या सर्व प्राणिमात्रांना सारख्याच लागलेल्या आहेत. त्या पशू, पक्षी, किडे, मुंग्या इ. ना नसतात असांतला प्रकार नाहीं. वासना उत्पन्न होणें हें शरीराचे स्वाभाविक कार्य आहे. तो इंद्रियांचा सहज धर्म आहे. म्हणूनच वासना ह्या जात्या पापी अथवा वाईट नसतात.

उलटपक्षीं त्यांना आपल्या ताब्यांत ठेऊन आपण जर आचरण केलें तर त्या आपल्या आचरणाकडेच कारणीभूत होतात. परमेश्वराची पवित्र मनानें सेवा करण्यासाठीं साधन म्हणून या जगांत मानवरूपीं जें यंत्र आपल्याला दिलें आहे, त्या नाजूक आणि आश्चर्यकारक यंत्राचाच वासना हा एक भाग आहे. आपलें शरीर ही एक पवित्र वस्तू आहे, त्याला परमात्म्याचें मंदिर असें म्हटलें आहे. याचा उलगडा अनेक संत, महात्मे पुरुषांनीं वर्णन केलाच आहे. त्या मंदिराकडे विचाराची दृष्टी वळविली असतां पावित्र्याची ज्योत चमकूं लागेल ? हृदयमंदिरांत परमात्मा वास करीत आहे आणि त्यांत मूर्तीची स्थापना झालेवर त्याला जशी पवित्रता येते; तद्वत् शरीराला पवित्रता प्राप्त होत असते. विचारांतीं

शरीराचा प्रत्येक भाग पवित्रच असतो, फार काय शरीराचीं कर्तव्यें सुद्धां इतकी नियमबद्ध नी पवित्र असतात कीं, त्याकडे आपण ढुंकूनही बघत नाहीं! म्हणजे विचारच करीत नाहीं. तीं त्याचीं कर्तव्यें आपण पवित्रतेच्या मर्यादेंत ठेवणें आद्य कर्तव्य होय.

आपला देह परमात्म्यापासून उदय पावणारा व अखेरीस त्याच्याच ठिकाणीं विलय होणारा जीवात्मा जेथें विराजत आहे, असें पवित्र मंदिर आहे. ह्या कल्पनेनें त्याचा आपण कधीं विचार केला आहे काय? तर नाहीं हेंच त्याचें उत्तर होय. वरील सुविचारानें आपल्या स्वभावाला वैभव प्राप्त होतें आणि त्यामुळे आपली स्थिति अधिक कल्याणप्रद झाल्या शिवाय रहाणार नाहीं! ज्या मानानें आपण आपलीं शरीरें पूज्य मानूं व त्यांना आपण निष्कलंक ठेवूं त्या मानानें आपलीं मनें, विचार, बुद्धी हीं देखील निर्मळ व चांगलीं राहतील. आणि परमपवित्र परमेश्वराच्या सन्निध वास करण्यास तीं समर्थ होतील याचें स्मरण असावें.

इंद्रियांच्या वासना जात्त्या वाईट नाहीं, तर त्यांना आपण सुविचारानें वळण देऊन ताब्यांत ठेविलें पाहिजे अत्यंत सामान्य व सर्वांत मोठे असे मोहपाश या वासनापासूनच उदय पावत असतात आणि मोहांच्या पाशांत न सांपडतां त्याच वासना योग्य रीतीनें आवरून धरणें हें मोठें काम

बिकट तर आहेच ! त्याकरितां फारच सावध असलें पाहिजे. ती बाब इतकी महत्वाची आहे कीं, त्यांत थोडेंसुद्धां दुर्लक्ष करतां कामा नये. आपल्या सभोंवार जगांत काय चाललें आहे, एवढेंच पाहून आपलें मनाशीं विचार करीत जावें. म्हणजे अपवित्रतेचे भयंकर पाप किती आहे हें सर्वसाधारण दृष्टीस पडतें आणि तें कळूंही लागेल. खोटचा पवित्रपणाचा आव आणून जगांतील भोळे भाबडे लोकांना नागविणारे व त्यांचे पावित्र्य दुष्ट करणारे हरीचे लाल आजला कमी सांपडणारे नाहींत! शरीरावर तेज व मुखांतून बाहेर येणारीं मुक्ताफळें इतकीं गोंडस असतात कीं, विचारूं नका ! परंतु आंतील पवित्र अशा मंदिराचे भाग घाणीनें भरलेलेच सांपडतील ! धिःक्कार असो अशा पवित्रपणाला! ! विशेषेंकरून ज्या पापाला सर आर्थर हेल्प्स हे, "मोठाल्या शहरांतील मोठें पाप" असें म्हणतात म्हणजे विधियुक्त विवाहावांचून जेथें स्त्रीपुरुषांचा एकत्र संबंध घडतो, तें पाप किती सार्वत्रिक दृष्टीस पडतें, याचा विचार करावा. याचेसारखें मोठें पाप नाहीं. त्याचे परिणाम किती भयंकर भोगावे लागतात? जणूंकाय परमेश्वर अन्य कोणत्याही पापाचरणापेक्षां याच पापावर अधिक करडी नजर ठेवून केलेल्या कर्माबद्दल मनुष्याला एवढें झाडे द्यावयास लावीत आहे व त्याची अशी इच्छा दिसत आहे कीं, मृत्यूपेक्षांही भयंकर व दुःसाध्य

असें रोग भोगणें हेंच त्या दुष्कर्माचें इहलोकचें फळ आहे. वासनांचें अदृश्य सामर्थ्य केवढें आहे, हें यावरून चांगलें कळून येतें. हें पाप म्हणजे क्षम्य अशी मानसिक दुर्बलता होय, असा त्याचा कित्येक लोक विचार करीत असतांना आपण केव्हां केव्हां ऐकतों. कित्येकांची मजल तर इतकी गेलेली असते कीं, त्यांत अपायकारक काय? ईश्वरानें देह दिला व त्याचे धर्म दिले; मग आम्हीं कां उपभोगूं नयेत बरें? कातडी कांहीं कोणी काढून नेत नाहीं! तर त्याची एवढी भीति तरी कशाला पाहिजे हो!! अशा पंडितांचें उद्गार स्वतः ऐकलेलें आहेत बरें!

असें असूनही दुःखाची गोष्ट ही कीं, पतंग नांवाची पांकोळी दिव्याच्या प्रकाशाला लोभानें वारंवार चिकटून आपण आपलाच नाश करून घेतें! हें आणि अशा प्रकारें अनेक उदाहरणें आपणां सर्वांचे नजरेस पडत असतांही सामान्यपणें कोणींही लक्ष देऊन वरील पापाचरणांपासून दूरच राहिलें पाहिजे!

वासनांचे अदृश्य सामर्थ्य केवढें आहे? हें वरील गोष्टी-वरून कळून येईल? स्त्रीयांच्या किंवा मुलींच्या लज्जा आणि काळिमा आणणाऱ्या आचरणांमुळें आजवर व हल्लींही किती तरी कुलीन घराणीं खऱ्या सुखाला आंचवली आहेत. जरी

या पातकांचा धनी मुख्यत्वेंकरून पुरुषच असतो, तरी त्याच्या अपकीर्तिचें खापर अखेरीस अन्यायानें गरीब विचाऱ्या अबलेच्याच माथीं फुटत असतें ! अशा पापामुळें तोंडाला काळिमा लागून किती हजार पटीनें निरपराधी स्त्रीयांची, मुलींची दुर्दशा झाली बरें ? याचा पुरुष म्हणून पुरुषार्थ गाजविणाऱ्यानें विचार करून आचरणांत गोष्ट आणली पाहिजे ! इतकेंच नव्हें तर आपलें बांधव यांनाही ह्या कृत्यापासून अलिप्त रहाण्याचें समजावून दिलें पाहिजे.

कदाचित् सुंदर बालकांच्या ज्या माता झाल्या असत्या त्या सुंदर स्त्रियांवर अशा तऱ्हेनें गेरवा नांवाचा रोग पुरुषजातीनें निर्माण केल्यामुळें मानववंशांचें केवढें नुकसान होत आहे ! या व असल्याच इतर पापाचरणामुळें असंख्य भयंकर रोग वाढीस लागून आपल्या प्रजेच्या ठायीं त्यांचें बीज अनुवंशिक संस्कारानें प्रसार पावत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करूं लागलों म्हणजे असेंच म्हणावें लागतें कीं, नीतिभ्रष्टतेचा यत्किंचितही उल्लेख केला नाहीं तरी नुसत्या सामाजिक दृष्टया हें एक महत्पाप म्हणजेच सामाजिक शास्त्राचा, समाजाचा शापच होय. हल्लीं आपल्या दयाळू कॉंग्रेस राज्यकर्त्यांनीं मोठमोठाल्या मुलांमुलींच्या शाळा कॉलेजें इत्यादीं मधून तपासणी ठेवलेली सर्वांच्या ऐकिवांत आहे, तसेंच मोठी हॉस्पिटलें यांतहीं तपासणी होत असतेंच ! तेव्हां यासंबंधीं डॉ. चें अभि-

प्राय काय काय येतात याचें विवेचन आपणांसमोर न मांडणें हेंच स्तुत्य होय. माझें मतें या असल्या पापाचरणाचे प्रवृत्तीस कारण पुरुषवर्गच होय !

मी फार स्पष्ट शब्दानें बोलत आहे व तसें बोलण्यांत माझा हेतू एवढाच कीं, आपणां सर्वांच्या मनावर संस्कार चांगल्या रीतीनें व्हावा हेंच होय. आणि आपल्या आर्य संस्कृ- तीकडे विचार जाऊन, त्यांनीं समाजाचे, कुटुंबाचे व तसेंच व्यक्तींचे करितां जें जें धर्म, शास्त्र, नियम घालून दिलेले आहेत ! त्यांचे पालन करणें कल्याणाचें होय. हिंदुसमाज व त्याची रचना नी धर्म कसा आणि हिंदूचे आचार, विचार, संस्कृति, कशी आहे ? व त्यामुळें मानव समाजाचें, नरजन्माचें सार्थक कसें होत असतें इत्यादि धडे इतर प्रदेशांना देऊन आपली व आपले धर्मशास्त्राची महती निदर्शनास आणून देण्याचें कार्य आपल्या हिंदु बांधवांचें आहे,

पाश्चिमात्य संस्कृतीच्या शिक्षणामुळें आपल्या मनावर फार मोठे परिणाम झालेले आहेत ! मी हें कबूल करतों, आणि त्यांचे शिक्षण घेऊन आपल्या आर्य लोकांचें तेज बुद्धि- मत्ता वगैरे दाखवून श्रेष्ठ पदास जावें असें कोणास बरें वाट- णार नाहीं ? परंतु ह्या शिक्षणापासून आपण आपलीच दिशा- भूल करून घेऊन आर्य संस्कृति नष्ट केल्याचें पातक आपलें माथीं आहे.

आपल्या भारतांतील उच्च शिक्षण घेतलेले महान पुढारी म्हणजे नवरोजी पटेल, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, चिपळूणकर, न्यायमूर्ति रानडे, पंडीत मालवीय आणि प्रचलित आचार्य विनोबा भावे, पंडित जवाहरलाल इत्यादि उदाहरणें आपणांसमोर आहेत ना ! ह्यांचे ठायीं मन:शुद्धी, पावित्र्य, तेज, धर्म, शास्त्र, आणि आर्य संस्कृतीचीं तत्वें पूर्ण- पणें वाणलेलीं नव्हतीं काय ?

पाश्चात्य संस्कार नी संस्कृति यांचे अंगीं वसली असती तर आजला ह्यांची नांवें जगांत दुमदुमली असती काय ? याचा विचार आजच्या तरुणांनीं अवश्य करावयास पाहिजे. आणि आपले आचार विचार पावित्र्य मन:शुद्धी व आपले देशाचे नी बांधवांचे कल्याण कोणत्या धर्मशास्त्र नियमानुसार होणारे आहे हें ध्यानीं आणावें. मग आम्ही इतकें उच्च शिक्षण घेऊन मन शरीर अपवित्रतेच्या गुणांनीं कां बिघडवावें ? आपली सुसंस्कृत अशी भारतभूमी असून त्यात आपण जन्माला आलों असून, भारतभूमि आपली माता आहे, म्हणून तिचें ऋण फेडण्या- साठीं स्वतेजानें, पवित्रपणानें राहून नीच अशा वृत्त्यांचा त्याग करून नैतिक धैर्यानें, नैसर्गिक वासनांना विवेकानें ताब्यांत ठेवून वागावयास नको काय ?

हें बघा ! अपवित्रतेमुळें जी नैतिक हानि होते, जे नैतिक दुष्परिणाम ओढवतात; त्यामानानें सामाजिक असें कांहीं

दुष्परिणाम अगदीं क्षुल्लक असतात. जी स्त्री आपल्या खऱ्या स्त्री जातीच्या उदात्त कल्पनेला अनुरुप साध्वी सीतादेवी-प्रमाणें, अहिल्यादेवी होळकरप्रमाणें मूर्तिमंत पावित्र्यानें, तेजानें, धैर्यानें, विनयानें, अलंकृत व्हावयास नको काय तसेंच स्त्रीयांच्या मनांत नी बुद्धींत एका पतिदेवाखेरीच इतर पुरुषवर्ग हे आपले पिता नी बंधू आहेत; अशा आचार विचारानें राहिलें पाहिजे. ज्या स्त्रिया सदाचारापासून अगर सौख्यापासून भ्रष्ट झाल्या त्यांना जगांत थोडी तरी किंमत आहे काय ? नीति-भ्रष्ट झाल्यास नी अनैतिक कृत्यांत वळजबरीनें नेणाऱ्यास ईश्वरी दरबारांत जाब द्यावा लागतो.

आपण शरीरानें मनानें व वाचेनें पवित्र कसें रहावयाचें? हा प्रश्न आपणां सर्वांच्या तसेंच माझ्याही मनाला येऊन भिड-णारा आहे.

प्रथमत: आपले विचार नी उच्चारही पवित्र ठेवण्यासाठीं दक्षता ठेविली पाहिजे ! जेणेंकरून आपल्या वृत्ती, प्रवृत्तींना वाईट वळण लागते व परमेश्वराला ओळखीनासें होतो, अशा प्रत्येक अमंगल विचारापासून, उच्चारापासून दूर रहाण्याच्या बाबतींत आपण फारच सावधगिरी ठेवली पाहिजे. कारण 'विचार' हें कार्यांचे जनक होत. अगोदर विचार नंतर आचार उच्चार अशी परंपरा आहे. जर अपवित्र विचारांतच आपण निमग्न राहूं लागलों तर तसेंच आचरणांचे वळण लागतें.

प्रत्यक्ष आचरण न करतांही नुसत्या सुंदर, स्वरूपवान् असें चिंतन केलें तरी व्यभिचाराचा दोष लागल्याशिवाय राहत नाहीं. याकरितां पहिलें विचार शुद्ध नी पवित्र राखले पाहिजे.

मुख्यतः लक्षांत ठेवावयाचें तें कीं, परमपवित्र परमेश्वराच्या सान्निध्याचा आपणांस विसर पडतां कामा नये. तो आपल्या जवळ उभा आहे, त्याला माझे अमंगल, दुष्ट, कपटी आणि नीच विचारांचे उद्योग आवडणार नाहींत, एवढा तरी विचार जागृत ठेवावा. जसें सूर्यकिरणांचे मुळें अंधार नाहींसा होतो, तद्वत् जाणून अगर अविचारांचें कृत्यांचा नाश होईल. ज्या वातावरणांत वाईट मनोविकार नी विषयवासना उदय पावून त्यांचे पोषण होत असते त्याहून अधिक उदात्त वातावरणाला शोभतील असले उच्च विचार नेहमीं मनांत आणण्याचा प्रयत्न करावा. कर्मेंद्रियें जरी इहलोकीचें कार्य करीत असलीं तरी आपलें मन स्वर्गांतील सुविचारांतच निमग्न राहूं देण्याचा अभ्यास ठेवावा. तसेंच आपणांहून सर्वतोपरी जे श्रेष्ठ असतील त्यांच्या सहवासांत सदैव राहून त्यांच्या वचनांचा, आचारांचा, विचारांचा उपयोग आपण करीत जावा. आणि नामांकित ग्रंथकारांनीं सुविचार परिलुप्त ग्रंथ लिहून आपलेवर जे उपकार केलेले आहेत, ते वारंवार वाचनाची संवय करावी.

त्या उत्तम अशा ग्रंथांचें परिशीलन केलें पाहिजे आणि आपणच आपली मानसिक उन्नती करून घ्यावी. शिक्षण हें

आपणांस सदैव मदत करण्यास तयार आहे. ज्ञान संपत्तीच मनुष्याला खऱ्या वैभवपदाला नेऊन पोंहचवितें आणि ती दिव्य नी वैभवशाली, बुद्धिमान् मानव रत्नांची संपत्ति होय ! अभ्यासानें मन, वाणी, विचार, सुसंस्कृत करावें. ज्यांचीं मनें उदात्त विचारानें भरलेलीं असतात त्यांच्याकडूनच अपकीर्ती-कारक कृत्यें घडत नाहींत. आपण आपली वृत्ती डबक्यांतील बेडकासारखी केव्हांही असूं देऊं नये.

आत्मोन्नतीच्या दृष्टीनें दुसरी एक गोष्ट आपणांला करतां येण्याजोगी म्हटली म्हणजे, आपल्या इंद्रियांच्या वासना पुरविण्यांत नेहमीं नेमस्तपणा ठेवावा. वाजवीपेक्षां त्याचे फाजील लाड कधींही करूं नये. तसेंच खाण्याचे पदार्थ इतर पदार्थांपेक्षां अधिक उत्तेजित असतात, तेणेंकरून वासना जास्त प्रदीप्त होतातच, आणि चित्ताचा नी इंद्रियांचा क्षोभ होतो, असले पदार्थ सेवन करण्याचे टाळतां येतील तितकें तें खाण्याचें टाळीत जावें असा आरोग्यशास्त्राचा दंडक आहे.

आपल्या शारीरिक वासना बहुतेक अंशीं आपल्या स्वाधीन असतात. सर्व वासना नी लालसा बाजूला सारून संसार परि-त्याग करणारे योगीलोक शरीराच्या पशुतुल्य वासना निर्मूलन करणें हा जीवित हेतू पैकीं एक प्रधान हेतू मानीत असतात. हें सर्वांना ठाऊक आहे.

आपण संसारांत पदार्पण केल्यानंतर जीं जीं कर्तव्यकर्मे करणें भागच होत असतें तीं तीं करीत राहून संसार आनंदाचा करणें हेंच आपलें कर्तव्य आहे ! मात्र हा करीत असतांना शरीराचे कोडकौतुक जास्त न पुरविण्यांत आपण योगी लोकांचे कांहीं अंशी अनुकरण केल्यास बरें! वासना ह्या आपल्या स्वाधीन ठेवण्याचा दुसरा एक उत्तम उपाय म्हटला म्हणजे:- नियमित आहार, विहार, व्यायाम, सात्त्विक अन्न किंवा पेयें होत.

संसारांत सर्व गोष्टी तर पाहिजेत, नको असें कधींच नसतें ? परंतु सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे परमेश्वरभक्ति हीच होय. ती जर नसेल तर अनेक गोष्टी पांगळ्याप्रमाणें होतील. ज्या ज्या वेळीं वासना प्रबल होतील त्या वेळीं सद्-बुद्धीनें ईश्वराचें सहाय्य मागावें व तें तो आपणांस खात्रीनें देईल, मदत करील. परंतु आपलें ठिकाणीं निर्मलता, असाव-यास पाहिजे ! तसेंच आपलें शरीर नी मन शुद्ध अशा आचार-विचारांचे असल्याविना परमेश्वर आपणांस सहाय्य कसा करील बरें ? याचा विचार करून आपला वर्तनक्रम ठेवणें हिताचें होईल.

सारांश वासना व पवित्रता या दोन गोष्टी अगदीं जुळया मुलांप्रमाणें आहेत. या दोन्ही जेथें एकवटल्या असतील तेथेंच उत्तम पुरुष लक्षणें पहावयास मिळतात. आतांपावेतों व्यवहा-रांत, संसारांत, अगर पारमार्थिक गोष्टींत काय ? पवित्रता

ही अत्यंत आवश्यक आहेच ! आपल्या वासना व त्याप्रमाणें घडणारीं कर्में यांचा झाडा ईश्वरासमोर देणें भागच होणारें आहे, ही जाणीव लक्षांत घेऊन आपली अमोल अशी जीवनयात्रा सुखांत जावी अशी माझी इच्छा आहे. इतकें सांगून त्या सर्वसाक्षी भगवंतास नम्र भावानें भाक मागून हा पवित्रता भाग संपवू या !

कर्तव्य जो न करी, तो नर भूमिभार ।।
राहे जिवंत परि तो मृत हेंचि सार ।।
जैसी दिसे स्थिति, तैसी तुवां न गणावी ।।
हें सत्य पूर्ण अवघें नरजन्म दावी ।। १ ।।

।। ॐ तत्सत् ।।

## प्रकरण १८ वें

# नैतिक धैर्य

ता. २०ते२५।२।१९३९

आज आपण ज्याचा विचार करणार तो विषय म्हणजे आपल्या जीवनयात्रेंतील महत्त्वाची बाब नैतिक धैर्य ही होय. त्याविषयीं ह्या ठिकाणीं विचार केल्यास पावित्र्य आणि नैतिक धैर्य यांचा निकट संबंध किती जवळचा येतो हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. परंतु त्याचा विचारपूर्वक असा अभ्यासच

करावयाचा नाहीं असें ठरविल्यावर उपाय नाहीं, पण हें वागणें माझे मतें गौणपणाचें आहे असें मला वाटतें.

मॅरिन कॅफर्ड म्हणतात कीं, नैसर्गिक गुणांमध्यें श्रेष्ठ असें नैतिक धैर्य आणि शारीरिक धैर्य हीं चांगुलपणाची व सामर्थ्याचीं लक्षणें होत. तेणेंकरून जगांतील हरएक सद्वर्तनी स्त्री-पुरुष इतक्या वैभवास चढत असतात कीं उपहास व तिरस्कार यांचा कसा तो त्यांना संपर्क होत नाहीं.

इमर्सन यांचे पुढीलप्रमाणें एक वाक्य आहे– " ज्याला प्रत्यहींच्या व्यवहारांत संकटांतून पार जातां येत नाहीं त्याला संसाराचा पहिलाच धडा समजला नाहीं असें समजावें. "

श्री पंडीत जगन्नाथराय यांचे श्लोकाचा अर्थ खालील-प्रमाणे आहे:– पर्वत मोठे आहेत, त्याहीपेक्षां पृथ्वी मोठी आहे, तिचेपेक्षांही ब्रह्मांड मोठें आहे, पण प्रलयकालीही ज्याचे धैर्य ढळत नाहीं असे जे महात्मे ते या सर्वांपेक्षांही मोठे होत.

जी गोष्ट वाजवी आहे असें आपणांस ठाऊक असतें, ती बोलून दाखविण्याचें सामर्थ्य जेणेंकरून आपल्या अंगीं येतें तें हें धैर्य होय. नैतिक धैर्य हें शारीरिक यातना सहन करण्यास मनुष्यास प्रवृत्त करीत असते. नैतिक धैर्य हें मनाचें कार्य आहे. तर शारीरिक धैर्य हें शरीराचें धैर्य आहे. पण मनाचा शरीराशीं इतका निकट संबंध असतो कीं, मनुष्याच्या बाबतींत एका प्रकारच्या धैर्यापासून दुसऱ्या प्रकारचें धैर्य वेगळें काढतांच

यावयाचें नाहीं असें मला वाटतें. मानवांची धाडसांची नी साहसांचीं जेवढीं उदाहरणें पहाण्यांत नी ऐकण्यांत येतात, त्यांत शारीरिक यातना सहन करण्याच्या अढळ धैर्यांत कर्तव्याच्या जाणीवेची भर असतेच !

हें नैतिक धैर्य आपलें कर्तव्य बजावण्यास नेहमीं आपणांस बळकटी देत असतें. आणि जी गोष्ट सत्य नी वाजवी आहे म्हणून आपणांस वाटतें, आपण बोलतों व आपणांस ठाऊक असतें, ती नैतिक धैर्य अंगी असलें म्हणजे तिचे बळावर मनुष्य केल्यावांचून रहात नाहीं. हा धैर्याचा उदात्त असा एक प्रकार आहे. असें असून हरघडीं आपणां सर्वांना तें धैर्य दाखविण्याचे प्रसंग येतात व आवश्यकता भासते.

नैतिक धैर्य हें शील सामर्थ्याचा सद्वर्तनाचा मुख्य पाया असून त्याच्या मानानें इतर सर्व सामर्थ्य लंगडेंच पडतें.

परित्यजेदं त्रैलोक्यं राज्यं देवेषु वा पुनः ।।
यद्वाप्यधिकमेताभ्यां न तु सत्यं कथंचन ।। १ ।।

अशा प्रतिज्ञेनें आपण सत्यव्रत पाळणें याचें नांव नैतिक धैर्य होय. आपलेकडून पापाचरण घडलें असें आपलें मन जेव्हां सांगत असतें तेव्हां लज्जेची भीति न बाळगतां निर्भयपणें आपला अपराध कबूल करणें हें नैतिक धैर्य होय.

लोकांच्या मर्जीची पर्वा न करितां केवळ कर्तव्याला आणि परमेश्वराला स्मरून सरळपणानें, मोकळ्या मनानें,

निष्कपटपणें आपण आपली पराकाष्ठा करावी. याचें नांव नैतिक धैर्य होय.

कर्तव्यांतील कष्ट, मेहनत, निराशा, वियोगजन्य दुःख हीं प्राप्त झालीं असतां चित्तक्षोभ किंवा मनाची खळबळ न होऊं देतां शांत वृत्तीनें ती सहन करणें, वाईट प्रसंगाला धीरानें तोंड देणें, जसें रात्र संपल्यावर दिवस हा उजाडलाच पाहिजे, सूर्य हा जरी ढगाआड असला तरी त्याचा प्रकाश बंद होत नाहीं ! कमी प्रकाश पडेल इतकेंच ! अशा वरील वागण्याला नैतिक धैर्य म्हणतां येते.

सारांश मानवी वर्गाच्या कर्तव्याचा बराचसा भाग या नैतिक धैर्यावर अवलंबून असतो, एक वरील धैर्य असलें कीं इतर गुण अंगीं जडतात. सर्व गुणांमध्यें उत्तम अशा सद्गुणा-बाबत लोकांना जितकी किंमत वाटावी तितकी ती सामान्यतः वाटत नाहीं, असें माझें प्रांजल मत झालेलें आहे. दुसरें कीं, ज्याच्या अंगीं नैतिक धैर्य असतें अशीं माणसें लोकनिंदेचें व उपहासांची ठिकाणें होऊन बसतात. मला वाटतें कीं, लोकांच्या दृष्टीनें तें नेहमीं शारीरिक धैर्यापेक्षां कमी महत्त्वाचें असें ठरतें. खरें पाहूं गेलें असतां शरीराचे मानानें मनाची योग्यता जितकी श्रेष्ठ असते, तितकीच शारीरिक धैर्यापेक्षां नैतिक धैर्याची योग्यता श्रेष्ठ असते.

सुस्वभाव, निरहंकार वृत्ती आणि प्रेमळपणा हे गुण शारीरिक सामर्थ्यापेक्षां अधिक श्रेष्ठ प्रतीचे नाहींत काय? श्री रामचंद्र प्रभू, अर्जुन, स्वामी रामदास, स्वामी रामकृष्ण परमहंस, लो. टिळक, शिवाजी राजे, अकबर राजे, एशू ख्रिस्त, इत्यादि प्राचीन अर्वाचीन तत्वमीमांसक ज्ञानी मंडळी यांचेंतील चांगूलपणांत थोरपणा अधिक नव्हता काय? यांचें ठिकाणीं शारीरिक धैर्य किती कडकपणें वसत होतें बरें?

जर आपण अधिक विचार करूं लागलों तर विषयाच्या उच्चतर व नैतिक अंगालाच आपण अधिक महत्त्व नी मान द्यावा हें उचित आहे. तें अंग जरी दृष्टीआड असतें, तरी तें आपण आपल्या मनासमोर नेहमीं ठेवणेंच इष्ट आहे.

ज्याला आपण नैतिक धैर्य असें म्हणतों तें शीलसामर्थ्य लोकादरास पात्र न होतां कधीं कधीं लोकनिंदेला कारणें होत असतें, याचें कारण हेंच कीं, लोक त्याचा विचार न करतां नुसत्या सांप्रदायाला अनुसरून वागतात. तो सांप्रदाय कितीही चांगला असो, त्यांतील तत्त्वें मनुष्य जीवनाला उत्तम ठरो, पण त्यासंबंधीं थट्टा, मत्सरीभाव, कुशंका, निर्माण करणें हा जनस्वभावच आहे. उदाहरणार्थ श्री ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, चोखामेळा, मिराबाई, श्री समर्थ रामदासस्वामी इत्यादि आपले भारतांतील महान संत विभूती, तसेंच युरोपमधील—गॅलिलिओ, चीन देशांतील जोनास् हॅनवे इत्यादि

नैतिक धैर्याचे पुतळे त्या काळीं थट्टामस्करींचे माहेरघर होते. आजला ह्याच विभूतींचे पोवाडे गाऊन जयंत्या, पुण्यतिथ्या होऊन त्यांचे मार्गदर्शनाचे धडे अंगीकृत करण्याचे प्रयत्न सुरूं आहेत ना ? म्हणूनच नैतिक धैर्य प्रत्येकानें स्वीकारणेंच योग्य होय.

जगांतील लोकांना नैतिक योग्यता एकाएकीं दिसत नसते. कारण ! आजूबाजूचे सहवास नी संगतीचें वातावरण निर्माण झालेलें असते. तसेंच शाळागृहांतून नैतिक धैर्य व शारीरिक सामर्थ्यांतील धैर्य यांचे वारंवार धडे देण्याचें काम बंद झाले-मुळें, बालपणापासूनच अनीतिकारक आचार, विचार, उच्चार, असत्यसेवन इत्यादि गुणांची वाढ होऊन ती तरूण-पणांत बळकट झाल्यानें, त्या गुणांची पाळेंमुळें खणून काढणें अत्यंत कठीण होऊन बसलें आहे. लहान लहान बालकें देखील आपले आई वडिलांचे ऐकेनासे होऊन बेछुटपणें स्वच्छंदानें वागत आहेत. आजला प्रत्येक खोलींतून त्यांच्या माता पिता यांचे आवाज ऐकण्यांस सांपडतात. हीं अवनतीची, कुलक्षयाची घंटा-नाद आहे !

### धैर्य दोन प्रकारचें असते

( १ ) एकतर परमेश्वरकृपेनें अगर स्वकृत विवेक, निश्चयानें ज्याचा स्वभाव मोठा उत्कट असतो, सदाशापूर्ण असतो, ज्याला संकट कसें तें दिसत नसून कर्तव्यकर्म चोख

बजाविणें हेंच काम असतें व प्रसंगांत असतां आपल्या हास्य-मुद्रेंत व आनंदी वृत्तींत थोडेंही अंतर पडूं न देतां त्यांतून विवेकानें, निश्चयानें व निर्धास्त आचरणाचें सामर्थ्य, ज्याचें अंगीं असतें अशा माणसाचें ठिकाणीं वृत्ती आनंदित ठेवणारें जें धैर्य तें पहिलें होय.

(२) दुसरें उच्चतर असतें:– कोणत्याही गोष्टीकडे डोळेझांक करायची नाहीं, संकटांच्या हरएक शाखांचे यथायोग्य रीतीनें निर्मूलन करणें, वादग्रस्त बाबींचा प्रत्यय स्वत: घ्यावयाचा व इतरांनाही आवश्यक तेवढा अनुभव आणून देण्याचें करावें. इतक्या गोष्टी करण्याचा ज्याचा निर्धार असतो व मग खर्चाचा अंदाज करून, शक्याशक्यतेचें अनुमान बांधून आपल्या स्वाधीनचे सर्व उपाय योजून संभाव्य, असंभाव्य गोष्टींचे निश्चयानें कंबर बांधितो. अशा जबाबदार मनुष्याच्या ठिकाणीं शांत विचार करण्याचें जें धैर्य असतें तें दुसरें प्रकारचें धैर्य होय.

प्रत्येकानें मुत्सद्दिगिरीला शोभेल असें वर्तन ठेवावें. आपलें कर्तव्यांत लोक आपणांस काय म्हणतील, आपल्याविषयीं त्यांना काय वाटेल ! याची पर्वा न करितां, तसेंच लोकप्रशंसेची किंवा दूषणाची फिकीर न वहातां जी गोष्ट मुत्सद्दिगिरीला योग्य नी वाजवी अशी असेल ती, अगदीं करारीपणानें निश्चयानें करणें. या साऱ्या गोष्टी करण्याचा

तसेंच वेळ पडल्यास स्थानभ्रष्ट होण्यासही न भितां करणें इत्यादि हक्क, ज्याचे अंगीं शांत विचार करण्याचें मन:स्वास्थ्य असतें त्यालाच एकट्याला असतो.

धैर्याला नीट वाटेनें नेण्यास दूरदर्शित्वाची जोड ही असलीच पाहिजे. मनांत सद्धेतु न धरतां अगर हिताहितांचा विचार न करितां अविचारी असें निर्भयपणें संकटावर तुटून पडणें याला धैर्य म्हणत नाहीं. तो नुसता तिरसटपणा किंवा फुशारकी होय.

शारीरिक धैर्यांबरोबर नैतिक धैर्याची जरुरी असते, व शरीर, मन, नीतिधैर्य यांची सांखळी प्रत्येक व्यवहार, संसार नी परमार्थ सुखाची करीत असते. आचरण करण्यापूर्वी विचार हा आपणांस केलाच पाहिजे. आधीं विचार मग आचार. आणि पोक्त विचार करणें आवश्यक असतें जर पोक्त विचार नसून नुसतें धैर्य दाखविणें याला अविचारी म्हणतात. दूरदर्शित्व मर्दुमकीचें भूषण आहे.

आपल्या स्वत:च्या ठिकाणीं वाईट गोष्टी असतील; आपल्या आचरणांत जे दोष असतील तें विचारानें नाहींसें करावें. तसेंच सत्य नी प्रिय असेल तेवढेच बोलावें, बाकीच्या सर्व गोष्टींत आपली जीभ आवरून धरण्यांत, इंद्रियनिग्रह करण्यांत, आपले मनोविकार आपले स्वाधीन ठेवण्यांत, चांगल्या कार्यांना अढळ निश्चयानें चिकटून रहाण्यांत खरें नैतिक धैर्य

उत्तम तऱ्हेनें दाखवितां येईल. पण आपल्या शेजाऱ्यांत, ज़ेवढें म्हणून आपणांला दोष वाटत असतात त्यांबद्दल त्यांचेवर उठल्या-सुटल्या तोंडसुख घेत राहण्यांत मोठासा पुरुषार्थ नसून खरें धैर्य दाखवितां येणार नाहीं. परोपकाराला आरंभ घरांतच होत असतो. त्याप्रमाणें विजयालाही आरंभ घरांतूनच होत असतो. आपलें आचरण निर्दोष होत आहे किंवा नाहीं हें पहाणें प्रत्येकाचें पहिलें कर्तव्य होय. हें ओळखून मनुष्य आचरण करूं लागला म्हणजे घरांतच किती काम करावयास जागा असते; मनुष्यांचे कट्टे शत्रू म्हटलें म्हणजे त्याचे स्वतःचे अंतःकरणांतील पापवासना व त्याची शास्त्रांत गणलेली वाईट कर्में हेंच होय.

॥ " आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः " ॥

या गीतावचनाप्रमाणें आपलें हिताहित आपल्याच स्वाधीन आहे. आत्मरिपूंशींच आपणां प्रत्येकाला आमरण झगडावयाचें असतें आणि धैर्याबरोबर निश्चयाचें बल अवश्यच असतें. प्रसंगोपात अंगीं करारीपणा असणें हिताचेंच होतें, परंतु त्याचे परिणाम दुसऱ्यास दुःखाचे अगर नुकसानीचे डोहांत बुडण्यासारखे नसावें. आणि करारीपणांत दूरदर्शित्वाचा विचार होऊन, कार्य करण्याचा विवेक झालाच पाहिजे. प्रत्येकाचे अंगीं करारीपणाचा उत्साह अवश्य असावयास पाहिजे. नाहीं तर निश्चयानें होणारीं कर्तव्यकर्में आपणांकडून उत्तम रीतीनें होणार नाहींत! नीतिदृष्ट्या बोलावयाचें

झाल्यास करारीपणा संपादन करतां येणार नाहीं, असें या जगांत नाहीं. मात्र उत्तमोत्तम कर्तव्याची बलवत्तर इच्छा पाहिजे व त्याबरोबर निश्चयाची, बाणेदारपणाची सांगड घेतल्याशिवाय एकटया करारीपणाचे कर्तव्याची किमत जगांत नसते. करारीपणा हा आचार, विचार, सत्यसेवन, नी सत् समागम यांनीं प्राप्त होत असतो.

वरीलगुण संपन्न अशांचीं चरित्रें म्हणजे – बाबर, पृथ्वीराज, प्रतापसिंह, शिवछत्रपती, पहिले बाजीराव, रामशास्त्री प्रभुणे, विष्णूशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, लो. टिळक, सुभाषबाबू, रविंद्रनाथ टागोर, स्वामी रामतीर्थ, स्वामीं विवेकानंद इ. इ. ची चरित्रें आपण वाचून–अर्थात करमणूकीसाठींच पाहून जेथल्या तेथें परत ठेवून दिलींत; यापेक्षां अधिक आपलें कर्तव्यकर्म घडत नाहीं हेंच खरें! ज्यांच्यांत खरोखरींचें सत्यसेवन असतें, त्यांच्यांतच करारीपणा, निश्चयीपणा येऊन त्या व्यक्ति दिव्य तेजानें पृथ्वीतलावर झळकूं लागतात.

ज्यांचे आचरण न्यायी असून निश्चय अढळ असतो, त्या व्यक्ति वाईट कर्म करण्यास केव्हांही प्रवृत्त होत नसून, लोकसमुदायानें कितीही भरीस घातलें, तरी त्यांचे तें सत्यसेवन, चित्ताची स्थिरता आणि विवेकादि गुण ढळणें शक्य नसतें. असल्या धैर्याला पराभूत करण्याचें सामर्थ्य एका परमेश्वराचें

शक्तीवांचून इतरांत नसतें. म्हणूनच मला असें म्हणावेसें वाटतें कीं, असल्या प्रकारचें जें सामर्थ्यवान नैतिकधैर्य त्याला सर्व गोष्टी निमूटपणें वश होत असतात.

असो अखेरीस व्यवहारांत आपणां सर्वांना सारख्याच लागू असणाऱ्या गोष्टींविषयीं थोडासा उल्लेख केल्यास अयोग्य होईलसें मला वाटत नाहीं. सत् कोणतें, असत् कोणतें हें आपणांस कळण्याइतकें आपण अज्ञान नाहींच; हें मी समजून आहे. जें सत्कार्य असेल, चांगली गोष्ट असेल, ती आपण काया-वाचा मनादिकें करून अंत:करणापासून कडकडीत नैतिक धैर्य दाखवून परमेश्वर कर्तव्य सत् असा विवेक या तिघांचे भय बाळगून व अन्य कशाचीही भीति न ठेवतां आपण आपलें कर्तव्यकर्म करीत राहावें हाच कल्याणाचा, उन्नतीचा रस्ता आहे असें माझें मत आहे. आणि आपणही तें कबूल करून वरील गोष्टी आचरणांत आणाल !

कामक्रोधादि गुणांनीं कोणाला बरें सोडलें? तर त्यांचे-वरही आपणांस विजय प्राप्त करून घेणें आहे. या संसारांत अज्ञान, क्रोध, दर्प, दंभ नी मोह हे महावीर सारखे हात धुवून आपले मागें पदोपदीं दत्त म्हणून उभें आहेतच ! तें आपणहून कधींच जात नाहीं, जाणारही नाहींत. त्यांना जेरीस आणूनच वश करण्यास दोन महान् शक्ती म्हणजे एक नीति-धैर्य नी अढळ निश्चयाचा उत्साह अंगीं धारण करून वरील शक्तींचें वारंवार पूजन करणेंच प्राप्त असतें.

आत्मनिरीक्षण हें आपणांस वरचेवर करतां येणें शक्य नसतें. कारण आपण गुलामी पेशाचे, व्यवहारी, संसारी असल्यानें त्यांचेच चिंतन करतां करतां दिवसांचे दिवस निघून जात आहेत. अनेक काळज्या, चिंता, आधी, व्याधि हात धुवून मागें असतात बरें. असा हा संसार, जन्म काळज्यांनीं अगदीं भरगच्च भरून गेलेला आहे. असो! आत्मनिरीक्षण याची संवय, अभ्यास असता तर दूरदर्शित्वानें आपल्या धैर्यास थोडें सौम्य स्वरूप देतां आलें असतें! पण ज्याअर्थीं तें आपल्या हातचें नाहीं, त्याअर्थीं सन्मार्ग कोणता, याचीं एकदां खात्री झाली म्हणजे अढळ निश्चयानें त्याला चिकटून आपण राहावें. परंतु आपल्या चित्ताचें ठिकाणीं अनेक संस्कार झाल्यानें व अनेक सहवासी यांच्या संगतीमुळें कल्पना, संशय, विकल्प उत्पन्न होऊन आपल्या सन्मार्गाच्या वाढीस लागणाऱ्या निश्चयाचे तुकडे तुकडे करून सर्व गोष्टींचे नाशास कारण होतात. असें कां म्हणावें हा प्रश्न पुढें येतो! तर याला कारण आपलें अज्ञान असून अश्रद्धा, मनाचा दुर्बलपणा असत्यसेवनाचे मार्ग यामुळें चित्त भ्रमानें गोंधळून जातें.

आपल्याच दृढनिश्चयानें आपल्या सभोंवतालच्या सर्व माणसांना उत्तेजन मिळत असतें, आपण समर्थ किंवा विवेकी असूं तर त्यांनाही हिंमत, धैर्य, सामर्थ्य येईल! आपणांतच हायतोबा, कमकुवतपणा असेल तर त्यांनाही प्रत्येक ठिकाणीं

अडथळा येईल. मला वाटतें अविचारानें म्हणा किंवा मनोदौर्बल्यानें म्हणा ! आपण लोक छंदानुवर्तनें करण्याकडेच आपली अतिशय प्रवृत्ती किंवा बुद्धी असते.

ज्या गोष्टी आपल्या पोक्त विचाराला, सद्विवेक बुद्धीला आवडत नसतात, जिचा आपण विरोध, निषेध करीत असतो, तीच गोष्ट करण्याला आपण वारंवार प्रवृत्त होत असतो हा अनुभव सर्वांचा आहे. आपलें सरळ नी स्पष्ट कर्तव्य म्हटलें म्हणजे धैर्यानें वागणें हेंच असतें. आपलें गृह हें घरांतील सर्व मनुष्यांचें जणूंकाय एक जहाज आहे व तें बंदरावर जाऊन पोहोंचेल ह्याकरितां आपल्या कुटुंबांतील प्रत्येकानें आपल्या योग्यतेनुरुप प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य होत नाहीं काय? व त्यासाठीं आपण एकजुटीनें विचारानें आपली गृहनौका हांकावयास नको काय? असें जर आपण न केलें तर नौका फुटून जहाज बुडेल व त्यांत असणाऱ्या द्रव्याचा नाश होईल? याकरतां गृह असो, देश असो, त्या त्या कार्यांत एकजूट, धैर्य, विचारीपणा, समजूतदारपणा हा अवश्य असावयास पाहिजे असें माझें मत आहे!

सारांश आपण एकदां सन्मार्गाचें वळण अंगीकृत करण्याचें पत्करिलें, तत्त्वमीमांसकांचीं वचनें पालन करण्याचें चित्तांत आणलें, तसेंच श्रीसंत, महापुरुष, अनुभवानें श्रेष्ठ अशा महाजनांचा उपदेश, श्रवण, मनन करून वागण्याचें ठरविलें कीं, जगांतील लोकांची भीति न बाळगतां एकट्या परमेश्वरी

शक्तीला भिऊन अढळ अशा निश्चयानें आचरण करण्याचा प्रयत्न करावा. जी गोष्ट आपलेकडून घडेल, जो प्रत्येक उच्चार आपल्या मुखांतून निघेल, त्या सर्व प्रसंगीं पुढील विचार आपले मनांत जागृत ठेवाल काय? तो असा "मी व माझेकडून जें जें होत आहे, तें बरोबर आहे काय?" आणि याचें उत्तर होय म्हणून जर आलें तर त्यांत कितीही व्यत्यय आले तरी त्यांना न जुमानतां सतत दीर्घोद्योगानें, परिश्रमानें केल्यावांचून राहूं नका! वरील आपल्या सद्विवेक बुद्धीला विघ्नें आणण्यास आपले स्नेही, आप्त, इष्ट विरुद्ध होतील, उपहास करतील. इतकेंच नव्हें तर ते आपला त्याग–छळ करण्यास मागचा पुढचा विचार न करितां पुढें सरसावतील! तरी तो विचार मनांत येऊं देऊं नका! दीर्घोद्योग करा, कर्तव्याचा मार्ग सोडूं नका, परावृत्त होऊं नका म्हणजें झालें. सन्मार्गाचा त्याग करूं नका व दुष्ट प्रवृत्तींचा आश्रय घेऊन राक्षसी बनूं नका. सत्याचें सेवन आणि सन्मार्ग, नैतिक धैर्य आणि करारीपणा या जोड्या अंगीकृत कराव्यात. अशा आपल्या आचरणांत परमेश्वराचें सहाय्य आपल्यालाच आहे. जग आपणांस काय म्हणेल? कुटुंबांतील लोक काय म्हणतील याची फिकीर करण्याचें कारणच नाहीं!

जोंपर्यंत आपला मार्ग प्रामाणिकपणाचा आहे, हें आपले मनाला ठाऊक आहे! तोंपावेतों लोकांना आपलें

विषयीं काय वाटेल ? याची काळजी करण्याचें कारण नाहीं. जोपर्यंत आपण सत्य अशा मार्गानें नी सद्बुद्धीनें वागत आहोंत! व ती सांगेन तें एकनिष्ठेनें करीत आहोंत, तों-पावेतों लोकांचेंच काय? परंतु देवदेवतांचे भय बाळगण्याचें कारणच नाहीं. ज्यांचे मन शुद्ध, पवित्र त्याला धैर्यही दाखवितां येतें ! खोटया गुणांचा आश्रय घेऊन कर्तव्यकर्म करीत राहिलों तर तें दु:खाला नी नाशाला कारण झाल्या-शिवाय राहणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेवावे. आपण वरपांगीपणाचा आंव आणून आम्ही नीतिधैर्याचे पुतळे आहोंत ज्ञानांचे स्तंभ आहोंत, असें भासवींत असाल तर तें टिकावूं होणार नाहीं ! यासाठीं जें जें प्रामाणिकपणाचें असेल तेंच आपण करीत राहिलें पाहिजें.

आपण आपल्या मनाला, बुद्धीला एक प्रश्न विचारा बरें? कीं, मना, तूं खरोखरच प्रामाणिकपणें या जगांतील, व्यवहारांतील, कामें करतोस काय ? तर तें मन बुद्धी आप-णांस हेंच उत्तर देईल कीं, नाहीं ! व तें तेथें जमणार पण नाहीं. याला कारण बालपणापासून प्रामाणिक आचार, विचार नी उच्चारांचे वळण नाहीं व नसते "स्पष्ट वक्ता सुखे भव: " इतकें मात्र मुखांतून बोलायचें पण व्यवहारांतील प्रसंग आले असतां, असत्याचा बुरखा घेऊन पातिव्रत्याचे सोंग घ्याव-याचें! अशा वागण्यानें नैतिक धैर्य, ईश्वराचें सान्निध्य कसें बरें प्राप्त होणार ? नी आपले बंधू व भगिनींना कसें वळण लाव-

णार? याचा प्रत्येकानें विचार करावा. उच्चतर शिक्षण घेण्याचा हेतू जर कांहीं असेल तर तो एकच कीं ज्ञान संपादन करून आपले बंधू भगिनींना सन्मार्गाचें, नीतिचे, सुखासमाधानाचे रस्ते दाखून भलें होणेंविषयीं इच्छा ठेवणें. हेंच आपलें नैतिक धैर्यांतील कर्तव्यकर्माचा एक भाग होय. ह्या एकंदर गोष्टीचेंसार इतकेंच कीं परमेश्वराला भिऊन वागावें, आज्ञा पाळाव्यात, हेंच अखिल मानवी वर्गाचें कर्तव्य आहे. दुसरें असें कीं, 'प्रत्येक कर्माचा' प्रत्येक बऱ्या वाईट गोष्टींचा झाडा हा आपणांस आपलें कर्मानुसार द्यावा लागतो, नव्हें तर भोगणें प्राप्त असून ईश्वरी दरबार म्हणजेच जगत् यांत द्यावा लागतो, सुखदु:खाचे भोग भोगणें यच्चयावत् जीवांना प्राप्त असतेंच! म्हणून इहलोकींच्या आपल्या कर्तव्यकर्माकडे डोळेझांक करून चालणें शक्य नाहीं. माझें इतकेंच प्रेमानें, कळकळीनें आपणांस सांगणें आहे कीं, आजला जरी यावर श्रद्धा ठेविली नाहीं, तरी केव्हांना केव्हां, आयुष्यांत पश्चात्ताप झालेविना राहणार नाहीं हें पक्कें ध्यानांत आणून आयुष्यांतील सन्मार्गाचे रस्ते चुकवूं नका! मानवी वर्ग हा सर्वांत श्रेष्ठ असा आहे, यांतच ईश्वरी सान्निध्य मिळवितां येतें. इतकें सांगून या लेखांत जे जे दोष असतील ते सोडून नीतिन्यायाचे असतील तेंच ग्रहण करून घ्यावें व दोषांची क्षमा करावी.

॥ ॐ तत्सत् ॥

...ालय, ठाणें.
32369 वि: ...

# मदती केलेल्यांचे आभार

या पुस्तक प्रकाशनाचे कामांत खालील सद्गृहस्थांनी प्रोत्साहन देऊन मदती केल्या.

श्री. रावसाहेब जी. सी. फालक रावेर
श्री. रावसाहेब एल्. चावरे रावेर
श्री. सर्कलसाहेब एस्. डी. पल्लीवाळ रावेर
श्री. पोस्टमास्तर गोपाळराव बहादरपूरकर रावेर
श्री. सौ. रमाबाई दलाल रावेर
श्री. बाबूराव धर्मूशेट वाणी रावेर
श्री. विष्णूपंत नगरकर ठाणे
श्री. मुरलीधर बाबा पितळे आणि बंधू ठाणे
श्रीमति ताईसाहेब राऊत ठाणे
श्री. चंद्रकांत मंडलीक ठाणे
श्री. साठे साहेब ठाणे
श्री. चिंतामणराव देशमूख ठाणे
श्री. हट्टे ठाणे
श्री. भा. ह. देशमूख मुख्याध्यापक अमळगाव ता. अमळनेर
श्री. सौ. शारदाबाई पाटील ठाणे
श्री. बाळासाहेब शहाणे इंजिनियर दादर

या पुस्तक छापण्याचें कामांत इतर अनेक लोकानीं मदतरूपानें हातभार लावलेला आहे. त्यांची नांवें यथानुक्रमें इतरग्रंथप्रसिद्धी मधून करणार आहोंत. यापुढील ग्रंथांना सर्वांचें सहाय्य मिळावें अशी विनंती आहे.

आपला

**श्री नाथलहरी ऊर्फ तात्या**

क्रमांक ........................ नों. दि. ........................

# अभिप्राय

गुरुकृपाहि केवलं

ता. २२।९।१९४९

आशिर्वाद:– सोबतच्या लेखांत सुंदर विचार मांडले आहेत. त्याचा नित्य अभ्यास करून मनुष्यानें आपलें हित करून घ्यावें. सर्व साधनांत गुरुकृपा हीच खरी किमया आहे. ती साधली तर सर्व कांहीं सुरळीत होईन. प्रपंच व परमार्थात उत्तम साधन मिळून इहलोकींच मोक्ष प्राप्त होईल.

भाद्रपद व. १४ बुधवार शके१८७१ } **स्वामीयोगेश्वरानंदतीर्थ** शंकराचार्य मुक्काम पंचवटी नासिक सिटी.

श्री. तात्या सो. चरणी सा. दंडवत.

ग्रंथांतील मार्गदर्शन उत्तम प्रतीचें आहे.

संताचे बोल धरीं हृदयावरी ।

मुमुक्षा तेची मोक्ष असे भूवरी ।।

१३।११।१९५२

**साळी बंधु**

नेहरूनगर धुळें प. खान्देश.

# आगामी प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

| | | रु. | नये पैसे |
|---|---|---|---|
| १) | श्री सद्गुरु हाच परमात्मा | २ | ०० |
| २) | बोधवचनें ( संग्रह ) | १ | ५० |
| ३) | माझी आई व तिच्या आठवणी | २ | ०० |
| ४) | विवेकाचे बोल | २ | ०० |
| ५) | विचारलहरी | २ | ०० |
| ६) | ज्ञान–वैराग्य | १ | ५० |
| ७) | सुशिक्षित शिष्य व आत्मज्ञानी गुरु | २ | ०० |
| ८) | भक्तीचा गौरव नी भक्तांचा स्वधर्म | २ | ५० |
| ९) | मानवी शरीराचें महत्त्व | २ | ०० |
| १०) | जय जय रघुवीर समर्थ | २ | ५० |
| ११) | प्रारब्ध व प्रयत्न | २ | ०० |
| १२) | कर्मविचार | २ | ०० |
| १३) | भवितयोग | २ | ५० |

91800

REFBK-0011488